आमचे स्वर्गवासी सातार मंडळीचे आवडते मिशनरी रे. ब्रुस साहेब यांच्या संबंधानें दोन शब्द लिहिल्यावांचून राहवत नाहीं. यांनीं अमेरिकन मिशन संबंधांत सुमारें ४५ वर्षें प्रभूची सेवा निरनिराळ्या ठिकाणीं केली पैकीं सातार प्रांतासाठीं त्यांच्या आयुष्याचा बहुतेक काळ शुभवर्तमानाच्या प्रीत्यर्थ गेला.

त्यांस लेखनकला ही उत्तम रीतीनें साध्य असल्यामुळें कोलोकियन प्रेसच्या साधनानें त्यांनीं अनेक सुबोधित पत्रिका व उपयुक्त ग्रंथ छापून प्रसिद्ध केले यामुळें त्यांचें नांव सुप्रसिद्ध मिशनरींच्या मालिकेमध्यें गणलें आहे. त्यांनीं आरथवाईक व बिशप रे. कासमसाहेब ठाववाणी व रे. विठलराव मकासरे सातार मंडळीचे प्रिय व धर्मशील पाळक व इतर मिशन कामदार यांच्या सहाय्यानें शुभवर्तमानाच्या प्रसारासाठीं परिश्रम केला. आतां हेचि वर्ग सार्वकालीक जीवनाचा मुकुट पावण्यासाठीं प्रभूजवळ गेले आहेत.

रे. ब्रुससाहेबांचा स्वभाव नम्र, एकवचनी निश्चयात्मक व दीर्घ दृष्टीचा असून धर्मशीलतेनें व प्रभूच्या प्रेमानें भरलेला असा होता. प्रभु त्यांच्या सर्व प्रियांचें सांत्वन करो.

जेव्हां आमचे स्वर्गवासी मिशनरी रे. ब्रुस साहेब आजारामुळें बिछान्यावर सतत पडून असत व त्यांची अशक्तता दिवसानुदिवस जास्त जास्त वाटत लागली तेव्हां अहमदनगर येथील मिशन हायस्कूलचे प्रिन्सिपाल रे. एच. फ्यारबँक्स यांस त्यांच्या मदतीसाठीं पाठविलें होतें. त्यांनीं थोड्याच काळांत आपल्या सुशील स्वभावानें लोकप्रियता संपादन करून घेतली होती, म्हणून आम्ही त्यांचें अभिनंदन करितो.

नंतर आमचे सध्याचे आस्थेवाईक व मनमिळाऊ मिशनरी रे. व मिसेस् ली भउम साहेब यांच्या देखरेखी खालीं पुढील लिहिलेलीं कामें सुयंत्रीत चालू आहेत.

(१) आमची शाळबाथ शाळा नियमाप्रमाणें भजनालयामध्यें भरत असे तथापि प्लेगाच्या कारणामुळें, सध्यां स्टेशन स्कूलमध्यें प्लेगागमन होऊं पावेतों ही शाळबाथ शाळा व संध्याकाळच्या भक्तिप्रसंगी असावा असें मंडळीनें ठरावीलें त्या ठरावाप्रमाणें सदहु स्थळीं दोन्ही प्रसंग होतात. शाळबाथ शाळेचे पुढारी आपल्या धड्यांची चांगली तयारी करून मुलांमुलींस व लहान थोरांस आत्मिक लाभ करून देतात. शा. शाळेच्या चिटणीसाच्या रिपोर्टवरून समजतें कीं, शा. शाळेच्या दरमहाची सरासरी सुमारें ८० आहे व ५ शिक्षक व ३ शिक्षका शा. शाळेच्या धड्यांचें शिक्षण आपापल्या वर्गास देतात. या आठ वर्गांपैकीं एक हिंदु मुलांचा व एक हिंदु मुलींचा वर्ग सन्मान्य मिसेस् लीभउम साहेब व मंडळीचे नूतन पाळक आपल्या मंडळीतील भजनालयामध्यें अद्यापि चालवितात. शा. शा. तारेतील १९०९ सालाची; जमा

जमा	खर्च	शिल्लक.
रु आ पै	रु आ पै	रु. आ. पै
१४ - ४ - ०	३ - ० - ०	११ - ४ - ० आहे.

(२) शाळबाथ शाळा झाल्या नंतर इंग्रजी जाणणांसाठीं एक इंग्रजी शाळबाथ वर्ग सन्मान्य ली साहेबांनीं चालविला आहे व आनंदमानण्यासारखी एक गोष्ट आहे कीं, ह्या वर्गास शिक्षण देण्यासाठीं सरकारी युरोपियन अमलदारांस आमंत्रण देण्यांत आलें आहे व त्यांनीं ही त्या आमंत्रणाच्या आनंदानें स्विकार करून आपला मौल्यवान वेळ खर्ची घालून वर्गास आत्मिक लाभ करून दिल्हा आहे सध्यां सातारा प्रांताचे जडज मे. पामेर साहेब चालवितात ही आपणांस भूषणादायक गोष्ट होय.

(३) आमचे दर रविवारचे संध्याकाळचे भक्तिप्रसंग मंडळीचे ऑनरिंग पाळक रे. हरिबा गायकवाड यांनीं मोठ्या आस्थेनें चालविले व आम्हांस आत्मिक लाभ करून दिला त्याप्रमाणें दर मंगळवारच्या संध्याकाळच्या मंडळीचे प्रार्थनांचे समय नियमाप्रमाणें चालविले व तरुणांस कांहीं कांहीं प्रसंगाचे पुढारीपण देऊन त्यांस उत्तेजन दिलें व त्यांच्या द्वारें ख्रीस्ता साठीं सेवा करवून घेतली व भेटीच्या द्वारें ख्रीस्तासाठीं मंडळीतील भाऊबहिणींचा समाचार घेतला. आमचे पाळक नम्र व आत्मिक मनानें आम्हामध्यें राहून आमची सेवा केली म्हणून मंडळी त्यांचे अभिनंदन करिते.

(४) मिसेस् शेवंतीबाई आडाव कळवितात कीं दर बुधवारीं स्त्रियांची डॉर्कस सोसायटी सांयकाळीं मिसेस् ली यांच्या बंगल्यांत भरते. त्या सोसायटीमध्यें २१ सभासद आहेत. त्यांचें शिवणकाम नियमाप्रमाणें चालून शास्त्रवचनांनीं व गीतं गायनानें व आत्मिक उपयुक्त भाषणानें ही सोसायटी आपलें काम करते. या सोसायटीची

१९०९ सालची जमा	खर्च	शिल्लक.
रु. २९-४-९	रु. २३-३-९	रु. ६-१-०

(५) सातारा एथील ख्रिस्ती यत्न करणाऱ्या सभेचे अध्यक्ष सन्मान्य मि. आढाव कळवितात कीं, दर शुक्रवारीं संध्याकाळीं आमची ख्रिस्ती यत्न करणारी सभा आपल्या पोटशाखांसह आपलें काम वर्षभर करीत आली आहे. १९०९ सालीं एकंदर ४७ बैठका झाल्या त्यांत प्रार्थनांचे व कामकाजांचे प्रसंग झाले. सभासदांची संख्या १८ असून सभासद येथून गेल्यामुळें संख्या १७ आहे.

१९०९ सालाची थोरल्या सभेची:-

जमा	खर्च	शिल्लक
रु. १७-७-०	रु. ७-२-०	रु. १०-५-० आहे.

बालसभेच्या मुलांच्या शाखेंत सभासद १८ आहेत त्यांची:-

जमा	खर्च	शिल्लक.
रु. ५-६-०	रु. १-११-३	रु. ३-१०-९ आहे.

मुलींच्या शाखेंत सभासद १६ आहेत त्यांची:-

जमा	खर्च	शिल्लक.
रु. २८-१४-६	रु. २७-१-६	रु. १-१३-० आहे.

सभेचे काम नियमानुसार होत आहे व रे. व मिसेस् ली हीं बहुतेक सभांस हजर राहून फार मदत करतात त्याबद्दल सभा त्यांची फार आभारी आहे.

(६) दर शनिवारीं संध्याकाळीं शा.शा. शिक्षकांचा वर्ग रे. लीसाहेब व मि. दाविदराव ढालवाणी चालवितात व त्यामध्यें उपयुक्त माहिती देण्यांत येते. त्याचप्रमाणें उमेदवारांचा वर्ग रे. हरिबा गायकवाड, मि. त्रिंबकराव रहिवाळे व मि. हणमंतराव गायकवाड चालवितात. १९०९ सालीं ४ मुलें व ४ मुली मंडळीमध्यें मिळालीं.

(७) आमचे नूतन पाळक रे. प्रसादराव मकासरे १९०९ सालाच्या ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या तारखेस आमच्या आमंत्रणावरून मंडळीची सेवा करण्यासाठीं आले. मंडळीनें त्यांचें आगतस्वागत केलें व जुन्या ॲक्टिंग पाळकांस शेवटला निरोप दिला. व नूतन पाळकास प्रभूच्या मंडळीची सेवा करण्यासाठीं प्रसंग दिला म्हणून पाळक परमेश्वराची उपकारस्तुति करतात. मंडळीचीं जीं जी कामें चालू आहेत त्यांमध्यें पाळकास सेवा करण्यासाठीं नवीन उत्तेजन योजना । संकल्प व निश्चय आदिकरून गोष्टींच्या प्रेरणा देवाच्या आत्म्याच्या सहाय्यानें प्राप्त झाल्या प्रभु करो कीं, प्रभूच्या मंडळीचें आत्मिक गुणांचें सौंदर्य प्रभूच्या वैभवांत दिसो. आपल्या मंडळीची सेवा पत्करल्यानें आग्रा येथील जगांतील ख्रिस्ती यत्न करणाऱ्या परिषदास जाण्यासाठीं प्रसंग मिळाला, व तेणेंकरून त्यास आत्मिक लाभ झाला व मंडळीसही देतां आला याबद्दल मंडळी व नूतन पाळक मनापासून रे. व मिसेस् ली यांचे आभार मानितात.

१९०९ सालची ख्रिस्तजयंती लहान थोर धर्मकुटुंबांनीं आत्मिक लाभाची झाली. प्रभु करो कीं, आमच्या मंडळीचीं सर्व धर्मकुटुंबें हृदयानें एक जिवानें एक चित्तानें होवो. "जसें आमच्या प्रभूचें चित्त होतें तसें आमचेंहि होवो."

"जमा भाडें आपल्या हातातील व्यय पूर्ण आहे तरी दुसऱ्याहि पुष्कळ!" हे प्रभूचे वचन नित्य आमच्या हृदयीं राहो. १९०९ सालाच्या हिशोबाविषयः—

जमा	खर्च	शिल्लक
रु. १९५-८-३	रु. ६८-६-३	रु. १२७-२-० आहे.

मंडळीच्या चिटणीसाच्या वतीने
आपला नम्र पाळक

(Sd.) P.V. Macasare.

Communicants of Satara Church - 1910

१ शिवरामजी भोंसले
२ वेणाबाई कृष्णाजी भोंसले
३ विठोबा गुजाजी गायकवाड
४ सावित्राबाई वि· गायकवाड
५ दाविदराव कासमभाई दाळवाणी
६ कृष्णाजी पिराजी भोंसले
७ शेवंतीबाई हो. जाधव
८ जसुदाबाई
९ जमुनाबाई
१० सुज्ञानराव का· दाळवाणी
११ सखारामजी हणमू कांबळे
१२ अलिझाबेतबाई वि·मकासरे
१३ काशीबाई आबाजी तरटे
१४ गोविंदराव परशुराम भागवत
१५ जॉर्ज एच् ब्रूस
१६ निळकंठ का· दाळवाणी
१७ नानूबाई पर्वतराव कांबळे
१८ लिझीबाई पीटर अंद्रूज
१९ हरि सखाराम वंदसोडे
२० रत्नाकर का. दाळवाणी
२१ जॉन पीटर अंद्रूज
२२ बाबाजी लक्ष्मण काकडे
२३ बाबाजी कृष्णाजी भोंसले
२४ धोंडू बाबाजी भोंसले
२५ गंगू सखाराम
२७ मजी धोंडिबा कांबळे
२८ गोजरा विठोबा गायकवाड
२९ विठाबाई सखाराम गायकवाड
३० आनंद पर्वती कांबळे
३१ आबाबाई लक्ष्मण काकडे
३२ सकुबाई जोतिबा कांबळे
३३ भागूबाई सखाराम जगताप
३४ राही धोंडिबा कांबळे
३५ मालतीबाई ह· गायकवाड
३६ बाबूराव पिराजी जाधव
३७ हणमंतराव गायकवाड
३८ यमुनाबाई ह· गायकवाड

३९ धोंडू जोतीबा कांबळे
४० कोंडूबाई बाबूराव जाधव
४१ भिमा रावजी शिंदे
४२ राही ग्यानोबा गायकवाड
४३ भागू राभा
४४ मुक्ताबाई देवजी कांबळे
४५ भागू पांडू
४६ हरिबा धोंडिबा कांबळे
४७ हिरा सुलेमान
४८ केशव बाबाजी
४९ सायरस मकासरे
५० धोंड्या शेफडे
५१ आनंदी गणपत भोंसले
५२ लायनी कृष्णाजी
५३ रत्नाकर एच् गायकवाड
५४ सईबाई बापुजी भालेकर
५५ गळूबाई ना· थोरात
५६ पिरा जोतिबा शिंदे
५७ नाना जनोबा पवार
५८ मारुती लक्ष्मण काकडे
५९ कुंडलिक देवजी कांबळे
६० भाऊ जनोबा पवार
६१ आनंद सखाराम कांबळे
६२ गंगू पिराजी
६६ लायनी श्रावण कांबळे
६७ राधा गंगाराम कांबळे
६८ राजस ना· थोरात
६९ कृष्णाजी व्यंकोजी हिंवाळे —
७० फुलाबाई कृष्णाजी हिंवाळे
७१ सुमतीबाई शाहूराव गायकवाड
७२ चांदी सुलेमान मुलाणी
७३ ग्रेस एच्. गायकवाड
७४ गया नाना गायकवाड
७५ लायनी पर्वती कांबळे —
७६ आकू पर्वती कांबळे
७७ केशर पिराजी
७८ [illegible]सिंग बेलाजी

७९	भलो रमाजी
८०	बागलो पुंजाजी
८१	बेचर रण छोउजी
८२	श्रावण धोंडिबा कांबळे
८३	सुगंधराव लोंढे
८४	सिताबाई नंदी पोचेटी
८५	जाईबाई पि· जाधव
८६	रे· हरिबा गायकवाड
८७	यसाबाई ह· गायकवाड
८८	त्रिंबकजी हिंवाळे
८९	मायाबाई त्रिं· हिंवाळे
९०	भाऊराव लक्ष्मण गडगे
९१	वाळुबाई भा· गडगे
९२	बापुजी देठे
९३	सुंद्राबाई बा· देठे
९४	विठोबा गायकवाड (बुकसेलर)
९५	राहेलबाई वि· गायकवाड
९६	बाबाजी ना· थोरात
९७	वसंत ना· थोरात
९८	बाबू बापू
९९	महादू देवजी
१००	मालतीबाई आल्हाट
१०१	लिया सदोबा खंडागळे
१०२	बायजा धोंडिबा सोनावने
१०३	एस्तर बेचरलाल
१०४	भागुबा मगर
१०५	कोंडीराम
१०६	महादू भोजिबा
१०७	रंभा ग्यानोबा
१०८	धोंडू देवजी कमला धगी
१०९	जीआ सखाराम
११०	शाहूराव गायकवाड

सातारा मंडळींतील बाप्तिस्मा पावलेल्या लेंकरांची याद १९१०.
List of Baptized Children in Satara Church 1910

१ वामन विठोबा गायकवाड
२ जयवंत " "
३ रूथ मालती डेविडराव डालवाणी
४ वामन बापुजी पाटोळे
५ वसंत अर्नेस्ट आढाव
६ सारा बापुजी पाटोळे
७ लिजा सखाराम कांबळे
८ प्रभाकर गोविंदराव भागवत
९ वसंत आल्बर्ट डालवाणी
१० फ्रान्सिस पिटर ॲंड्रूज
११ मनोरमा ग्रेस सूर्यवंशी
१२ मालती मथुरा गो. भागवत
१३ मोझे बाबाजी काळसेकर
१४ गाब्रिएल पिटर ॲंड्रूज
१५ सुमंत व्युल्डसन डालेवाणी
१६ लिलावती हणमंतराव गायकवाड.
१७ गफूर हुसेन
१८ गुलाब "
१९ प्रेमा मॉड व्युलिस्टन ह. गायकवाड.
२० रेचेल शांतवनराव डालवाणी
२१ वसंत बापुजी पाटोळे
२२ वसंतिका आनंदराव शेकटकर
२३ शारदा एलन आढाव
२४ रत्नाकर विठोबा पेटारे
२५ डेविड बार्णबस ग्वाल्डबन्स
२६ मालन सावळेराम गायकवाड
२७ प्रभाकर एबिनेझर ह. गायकवाड
२८ योहान्न विठोबा पेटारे
२९ शांति " "
३० शामुवेल " "
३१ बें[illegible]न बार्णबस ग्वाल्डबन्स
३२ शांतवन कृष्णाजी हिंवाळे
३३ सरू " "
३४ बाबू " "
३५ शामुवेल " "
३६ राजस " "
३७ सात्विक " "
३८ सारा " "
३९ सुंदर कृष्णाजी हिंवाळे
४० प्रकाश विठोबा पेटारे.
४१ कमला फ्लोरा आढाव
४२ शामुवेल प्रेमचंद जयवंत सूर्यवंशी
४३ सारा हुसेन भाई
४४ चांदबी "
४५ महिबू "
४६ मेरी आबल्लोभाहि मालता बाबाजी वाघचौरे
४७ मार्था कमला बेंजामीन
४८ पद्मावती सेरा एम्ब. गायकवाड.
४९ सयाजी प्रतापराव गायकवाड
४८ मार्था बनू बेंजामिन
४९ प्रभाकर सुगंधराव लोंढे
५० प्रभाकर हरिबा कांबळे
५१ नरसिंग नंदी पोचेटी
५२ कमलावती देवजी कांबळे
५३ मनोहर त्रिंबकजी हिंवाळे
५४ विश्रांति " "
५५ नयनसुक " "
५६ प्रकाश " "
५७ सुवार्ता " "
५८ तृप्ति " "
५९ हिरालाल " "
६० गुलाब " "
६१ प्रेमचंद " "
६२ सुलोचना विठोबा गायकवाड.
६३ सालोमन " "
६४ मेरी मनोहरराव आढाव.
६९ शरत जेरिल आढाव.
७० सुमती आलिस गायकवाड.
~~७१ प्रभाकर हरिबा कांबळे.~~
७2 रुबी कमला डॅनेइराव
73 बेंजामीन मधुकर — " —
७४ शांतवन वाघळे
७५ फुलवंती — " —
७९ भास्कर हरिबा कांबळे.

(over)

७७ सामसन उर्फ चंद्रसेन मर्चिंडी

— १९१० — 1910

Minutes

४-१-१९१० या रोजीं स्टेशनस्कूल मध्यें सांयकाळीं ६ वाजतां मंडळीची बैठक पूर्वी ता. २-१-१९१० या रोजीं संध्याकाळीं जाहिरात दिल्याप्रमाणें भरली.

आरंभीं वाचकांनी मंडळीच्या आत्म नियंत्रीत पुस्तकांतून कारभारी चिटणीस व खजीनदार यांचीं कामें काय आहेत हें चांगल्या रीतीनें स्पष्ट करून दाखविलें. नंतर कामकाजाची बैठक व्हावी असें ठरलें.

पहिल्यानें मि. हणमंतराव गायकवाड व मि. त्रिंबकराव हिवाळे यांस कारभारी नेमिलें. मग मि. रत्नाकर गायकवाड यास चिटणीस नेमिलें; व पूर्वीचे खजीनदार बाबूराव जाधव यांस खजीनदार नेमून आत्म नियंत्रीत पुस्तकाच्या नियमाप्रमाणें मंडळीचे वरील कामगार व रे. हरिबा गायकवाड व मि. डोंगरराव डालवाणी यांस स्टांडिंग कमीटीचे सभासद नेमण्यांत आले. पुढें हरिबा गायकवाड यांनीं शाब्बाथ शाखेचे जुने पुढारी हेच यंदांही असावेत अशी इच्छा दर्शविली. याचवेळीं रत्नाकर गायकवाड यानें एक प्रश्न पुढें आणीला तो असा:- जे पुढारी नेमावयाचे ते मंडळींतीलच असावेत किंवा बाहेरचे असले तर चालतील. त्याला अनुकूल अशी माहिती वाचकांनीं इतर कांहीं मंडळ्यांची सांगितली. नंतर मि. हणमंतराव गायकवाड यांनीं अनुमोदन देऊन सांगितलें कीं जर असे हितचिंतक व ज्ञानीव ज्यांकडून मंडळीला बराच लाभ होईल असे कोणी असतील तर त्यांना नेमण्यास कांहीं हरकत नाहीं. नंतर बहुमतानें असे जर कोणी आहेत तर त्यांना शाब्बाथ शाखेचे पुढारी नेमण्यास कांहीं हरकत नाहीं असें ठरलें. नंतर आपले सन्माननीय वकील मि. जाधव यांस शाब्बाथ शाखेचे पुढारी नेमण्यांत आले. नंतर डोंगरराव डालवाणी यांस आसिस्टंट सुपरिंटेंडेंट व मि. हरिबा कांबळे यास सेक्रेटरी नेमण्यांत आले. नंतर खजीनदार यांस मंडळीच्या उपयोगासाठीं दोन पुस्तकें घेण्याची परवानगी दिली, व खजीनदाराचा हिशोब कारभाऱ्यांनीं तपासावा व सह्या कराव्यात असें ठरलें. शेवटीं रे. लीसाहेब यांनीं प्रार्थना करून मंडळी बरखास्त झाली.

१-२-१९१० या रोजीं स्टांडिंग कमीटीची बैठक संध्याकाळीं ६ वाजतां स्टेशनस्कूलमध्यें भरली. चिटणीसानें मंडळींतील सभासदांची याद वाचून दाखविली, नंतर ज्यांचीं नांवें या मंडळींत बरींच वर्षें आहेत परंतु वास्तविक त्यांचा या मंडळीशीं कसलाही संबंध नाहीं, अशीं नांवें या यादींतून त्यांस घरें पाहून त्यांची काय इच्छा आहे हें समजल्यावर कमी करावीत असें ठरलें.
त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:-

शिवरामजी भोसले.
जिजाबाई व. ठोंबरे.
अंजना धो. सूर्यवंशी.
रमाबाई सुदामा गायकवाड.
भागू रामा.
केशव बाबाजी.
सखूबाई बा. भालेकर
पिरा जोतिबा शिंदे
तुकाराम विश्रांती धोंडीबा.

गोजराबाई धोंडीबा सूर्यवंशी.
बेसीबाई विठ्ठलराव मकासरे.
अहरोन बाबाजी काबूसकर.
भीका रावजी शिंदे.
भागू पांडू
मायरस पि. मकासरे.
सावळाराम रामजी गायकवाड.
सुवान विठोबा पेटारे
गंगाधरराव होंडे

भाऊ इराप्पा लडगा.
जॉर्ज एच. बुस.
बिबीराबाई हुसेनभाई.
राही ज्याबाबा कांबळे.
हिरा सुलेमान.
धोंड्या शेगडे.
हिराबाई सा. गायकवाड.
भागूबाई विठोबा पेटारे.
जयवंत धोंडीबा सूर्यवंशी

२७-३-१९१०. या रोजीं मंडळीची बैठक नियमित ठिकाणीं सायंकाळीं ६ वाजतां नगर येथील वडील मंडळीच्या आमंत्रणाविषयीं विचार करण्यास बसली. मुख्य प्रश्न पुढें आणण्यांत यशवंतराव यानें माझें नांव या मंडळीच्या यादींत आहे किंवा नाहीं याचा विचार पुरा व्हावा असी विनंति केली. अध्यक्षांच्या सुचनेवरून सेक्रेटरीसानें मंडळीची यादी वाचून दाखविली; परंतु त्या यादींत त्याचें नांव नव्हतें. जरी त्याचें नांव या यादींत नव्हतें तरी त्याला मंडळींतील हक्क असावेत असी डोविडराव यानीं सुचना केली आणि त्यास पुष्टी करण्यार्थ रे. ली यानीं "ज्या माणसांच्या नांवावर नांवाच्या खुणा असून ज्यांचीं नांवें यादींतून कमी केली आहेत व कितीहि वर्षांनंतर जर ते या मंडळीच्या बैठकीला हजर असले तर त्यांना मत देण्याचा हक्क द्यावा असें ब्रूस साहेब यानीं मला सूचना केली होती म्हणून मंडळीनें सांगितलें. म्हणून केवळ याच सूचनेवरून जर कोणी असे माणसें या मंडळीशीं संबंध ठेवण्यास आलीं तर त्यांना हक्क द्यावा असें ठरविलें.

याच वेळीं सेक्रेटरीसानें त्याच्या सोईकरितां नांवाच्या यादीविषयीं एक प्रश्न विचारिला तो असा:- जर मंडळी ज्यांचीं नांवें या मंडळीच्या यादींतून बरीच वर्षांपैकीं कमी केलेलीं असून त्यांना मंडळीचा पूर्ण अधिकार देते व सर्व त्यांचीं नांवें मंडळीच्या पुस्तकांत आहेत असें कबूल करते तर नवीन याद तयार करतांना जे सध्यां येथें आहेत त्यांचींच नांवें यादींत घालून बाकीचीं नांवें न घातलीं तरी चालतील किंवा नाहीं. त्यावेळीं मंडळीनें सर्व नांवें घालण्याचें अगत्य नाहीं अशी परवानगी दिली.

नंतर मंडळी मुख्य कामाकडे वळली. बहुमतानें आमंत्रण पत्र करून डोविडराव यांस प्रतिनिधी म्हणून पाठवावयाचें असें ठरलें.

२७-३-१९१० या रोजीं शरत् सेसिल टी आठाव याचा बाप्तिस्मा रे. भास्करराव मकासरे यानीं स्टेशन स्कूलांत केला

१४-४-१९११. या रोजीं नियमित ठिकाणीं सांयकाळीं ६ वाजतां स्टँडिंग कमिटीची बैठक बसली. मुख्य काम:- आनंदराव यांची बहीण [illegible] ही विधवा असून व मंडळींत मिळालेली असून इनें हिंदुधर्माप्रमाणें हिंदु मनुष्याशीं लग्न केलें याविषयीं विचार करून योग्य शासन व्हावें. तिच्या आईला व तिच्या भावाला या गोष्टीविषयीं विचार पुरा करण्यास एक कमेटी नेमली व या कमेटीनें योग्य विचार पुरा करून ताबडतोब कळवावें असें ठरविलें.

२८-४-१९१०. या रोजीं नियमित ठिकाणीं सांयकाळीं ६ वाजतां स्टँडिंग कमिटीची बैठक बसली. नियमाअभावीं रे. आनंदराव हिवाळे यांस अध्यक्ष नेमण्यांत आलें. या वेळीं सर्वानुमतें ठराव पास आले ते येणें प्रमाणें:-

१ पाठशाळेची स्थापना येत्या मे महिन्याच्या १०व्या तारखेस व्हावी.

२ स्थापने संबंधीं व्यवस्था, पुढें लिहिल्या प्रमाणें ठरली.

(१) या कामासाठीं एकंदर खर्च रु. ४० पर्यंत करावा असें ठरलें.

(२) पुढील मंडळ्यांस व सन्मान्य बंधु व भगिनी यांस आमंत्रण पाठवावें.

१ मुंबई
२ पुणे (१) फ्री चर्च मेथाडिस्ट.
३ नगर (१) थोरली व कोंकणची.
४ सोलापूर
५ वडाळे.
६ राहुरी
७ देऊळगांव
८ पारनेर
९ सतिर
१० कोपरगांव
११ वाई
१२ कोरेगांव
१३ कोल्हापूर
१४ मिरज
१५ सांगली.

सन्मान्य बंधु व भगिनी.

१ रे. ह्यूम
२ " जेरस
३ " बिसेल
४ " फेअरब्यांक
५ " व्यालेनटाईन.
६ रे. हन्सबर्गर
७ " स्मिथ
८ " म्याकब्राईड
९ " मि. बर.
१० " ओलोक.
११ मिस बिसेल
१२ मिसेस ह्यूम.
१३ मिस ह्यूम
१४ श्रीमती पंडीतारमाबाई.
१५ रे. टिळक.
१६ रे. कुमरकर
१७ " केसकर.
१८ " नर्थोडी.
१९ " सोटीबा गायकवाड.
२० " सावळेरामजी साळवे.
२१ मि. टी. बी. जाधव. २२ रे. बळवंतराव उजगरे. २३ रे. खंडुजी हिवाळे. २४ रे. उमाप.
२५ रे. आनंदराव हिवाळे. २६ रे. हरिबा गायकवाड. २७ मे. क्यांबेल साहेब.

१-५-१९१०. या रोजीं सांयकाळीं [illegible] झाल्यानंतर मंडळीची बैठक बसली, आरंभीं चिटणीसानें स्टांडिंग कमेटीनें केलेल्या ठरावांचा खर्डा वाचून दाखविला. स्टांडिंग कमेटीनें केलेले सर्व ठराव अनुक्रमानें मंडळीनें पास केले.

८-५-१९१० या रोजीं सांयकाळीं ~~[illegible]~~ ६:३० वाजतां ~~बसली~~ मंडळीची बैठक बसली.
१ मंदिराची दुरुस्ती व्हावी असें ठरलें व त्यासाठीं २० पासून २५ रुपयापर्यंत खर्च करावा असें ठरलें.

१५-५-१९१० या रोजीं मि. कृष्णाजी ब्यं. हिवाळे यांस देवाज्ञा झाली.

२९-५-१९१०. या रोजीं सुमती आलीस हणमंतराव गायकवाड इचा बाप्तिस्मा रे. प्रसादराव मकासरे यांनीं केला.

Rev. Prasadrao Makasare's installation service

१७-५-१९१० ता. १६ मे १९१० या रोजीं रे. प्रसादराव मकासरे यांच्या स्थापने करितां आलेल्या आमंत्रित वडील वर्गाची बैठक स्टेशन स्कूल येथें सकाळीं १०॥ वाजतां बसली.

आरंभीं त्या बैठकीपुरते रे. ह्यूम साहेब यांस अध्यक्ष व रे. जॉन मलेलू यांस चिटणीस नेमण्यांत आले. प्रथम रे. प्रसादराव यांच्या स्थापने संबधाचे मंडळीचे ठराव त्यांस पाठविलेलीं पत्रें व त्यांकडून आलेलीं उत्तरें अध्यक्षाच्या सूचनेवरून मंडळीच्या चिटणीसानें वाचून दाखविलीं नंतर ते ज्या मंडळीचे सभासद होते त्या मंडळीचे शिफारस पत्र व ईश्वर विद्येच्या पाठशाळेची सनद तपासण्यांत आली. त्यांचा धार्मिकपणा, पाळक होण्याचा हेतु वगैरे-यां-विषयीं चौकशी करण्यांत आली. त्यांचें शास्त्रज्ञान, व त्यांचीं मतें सशास्त्र आहेत किंवा नाहींत याविषयीं प्रश्नोत्तरें झालीं. नंतर पाळकांनीं आपल्या अनुभवाचा एक उत्कृष्ट निबंध वाचून दाखविला. नंतर पंचायतीनें एकांतीं त्यांच्या लायकी विषयीं चांगला विचार केला व आपली संमति मंडळीस दिली व त्याच दिवशीं सांयकाळीं ४ वाजतां भक्ति मंदिरांत स्थापनेचा विधी करण्याचें सर्वानुमतें ठरलें.

स्थापनेचा अनुक्रम :—	आरंभीची प्रार्थना	रे. जॉन मलेलू
	वडील वर्गाच्या चिटणीसाचें भाषण	रे. जॉन मलेलू.
	शास्त्र वाचन	रे. नानाजी गायकवाड.
	गायन	" अनंत देवाला वाखाणा अपार"
	सार्वत्रिक उपदेश	रे. टिळक
	स्थापनेची प्रार्थना	रे. ली.
	गायन	" पाया हा मंडळीचा "
	पाळकास बोध	डॉ. ह्यूम.
	गायन	"पावक [illegible] येशूचा"

१७-५-१९१०

मंडळीस बोध .... रे. बिसेल
आशीर्वादाचा उजवा हात .... रे. सांठे
प्रार्थना (शेवटची) .... रे. हा. हिंवाळे
गायन ---- "ख्रिस्तार्पणमस्तु"
आशीर्वाद .... रे. मकासरे.

५-६-१९१०

या रोजीं मंडळीची बैठक रविवारची उपासना झाल्यावर बसली.

१ मंदिरांत उपासना व्हावी असें ठरलें, व सकाळच्या व संध्याकाळच्या उपासनेचा वेळ बदलण्यांत आला.

२ आंबाबाईला लागणारे सामान घेण्याची परवानगी दिली व रे. हरिभा यांना देवळाचे व्यवस्थापक नेमिले.

८-७-१९१०.

या रोजीं मंडळीची बैठक ५॥ वाजतां बसली.

१ आक्काबाई काकडे इच्यें घराला शाकारणें व मंदिराच्या पडवीस तक्त्या लावाव्या असें ठरलें.

२ पाळकास रे. ली यांच्याकडे काम करण्याची परवानगी द्यावी.

३ पाळकाचें कर्ज फेडण्यासाठीं कर्जाऊ ८० रुपये मंडळीच्या खजिन्यांतून द्यावेत असें ठरलें.

२६-७-१९१०.

या रोजीं मंडळीची बैठक ५॥ वाजतां बसली.

१ सरुबाईच्या लुगड्या साठीं रु. ३ पर्यंत मदत करावी असें ठरलें.

२ ख्रि. य. करणाऱ्या सभेचें मुंबई इलाख्याचें वार्षिक संमेलन साताऱ्यास व्हावयाचें करितां ४० रुपयांपर्यंत मदत करावी असें ठरलें.

९-८-१९१०.

या रोजीं मंडळीची बैठक ६ वाजतां बसली.

१ विठोबा पेटारे यांस आस्तगांव येथील मंडळींत मिळण्याची परवानगी दिली.

२ भागुजा मगर यास येथील मंडळींत ~~घेतलें~~ मुंबई येथील मंडळीच्या परवानगीवरून घेतलें.

३ आक्काबाई काकडे इस १ महिन्याची रजा दिली.

या रोजीं मंडळीची बैठक ६ वाजतां बसली

१ मि. आनंद कांबळे याची बहीण तायनी इच्या वाईट वर्तणुकी बद्दल तिला मंडळीनें बहिष्कृत केलें. हा ठराव सर्वानुमतें पास झाला.

२०-९-१९१०. या रोजीं मंडळीची बैठक ६ वाजतां बसली.

१ शाहूराव गायकवाड यांस मंडळींत घ्यावें अशी सूचना आली परंतु त्यांचें नांव दुसऱ्या मंडळींत असल्या कारणानें आपणांस त्यास मंडळीच्या नियमाप्रमाणें या मंडळींत घेतां येत नाहीं म्हणून त्यांना पश्चात्तापाचे स्वभावावरून व रे. ल्ही यांच्या साक्षीवरून त्यांस या रविवारीं प्रभुभोजन घेण्याची परवानगी बहुमतानें दिली व त्यानें सोलापूरच्या मंडळीस पत्र पाठवून या मंडळींत मिळण्याची परवानगी मागवावी, व नंतर तिकडची परवानगी आल्यावर त्यास या मंडळींत घ्यावें असें ठरलें.

२४-९-१९१०. या रोजीं संध्याकाळीं कोंडीराम, महादू जोतिबा, रंभा, धोंडू देवजी व जिजा सखाराम यांची परीक्षा घेण्यांत आली व सर्वानुमतें त्यांस मंडळींत घेण्याचें ठरलें.

२५-९-१९१०. या रोजीं संध्याकाळच्या उपासनेच्या वेळीं तीन ~~मुलांस~~ व मुलींस मंडळींत घेण्यांत आलें.

१५-११-१९१०. या रोजीं संध्याकाळीं ६ वाजतां मंडळीची बैठक बसली.

१ मिसाहेबांच्या सांगण्यावरून व गेट्स साहेबांच्या पत्रावरून सोलापूर येथील मंडळीस मि. शाहूराव यांच्याविषयीं ~~परवानगी~~ शिफारस पत्र पाठवून मि. शाहूराव यास या मंडळींत मिळण्याची परवानगी मागवावी असें ठरलें.

२ मालती बाई मकासरे इस सोलापूर येथील लेपर असायलमच्या मंडळींत मिळण्याची परवानगी दिली.

३ पाळकास सध्यां जें घर आहे त्यांत बरीच गैरसोय होते म्हणून दुसरें घर घ्यावें असें ठरलें त्याचें भाडें ~~अ~~ रु. ५ पर्यंत असावें असें ठरलें. नवीन घर घेण्यासाठीं तपास करण्यासाठीं रे. हरिबा गायकवाड मि. हणमंतराव व मि. त्र्यंबकराव यांची एक कमेटी नेमिली.

६-१२-१९१०. १ मि. शाहूराव यांस मंडळींत घेतलें.

२ पाळकाचें घर बदलण्याचा प्रश्न निघाला परंतु दंगाशाविषयीं योग्य बंदोबस्त केल्याशिवाय घर भाड्याविषयीं विचार करतां येत नाहीं असें ठरून दंगाशाची बरोबर व्यवस्था लावण्याकरितां पुढील कमेटी नेमिली.—

रे. हरिबा गायकवाड.
मि. हणमंतराव गायकवाड.
मि. त्र्यंबकजी हिंवाळे.
मि. जाधव.

११-१२-१९१०. या रोजीं कुमारी कमळा डेविडराव व बेंजामिन मधुकर डेविडराव आणि शांतवन व कुलवंती वाघले यांचा बाप्तिस्मा रे. प्रसादराव मकासरे यांनीं केला

अमेरिकन मिशन संबंधांतील सातारी मंडळीचा १९१० चा रिपोर्ट.

Report of Satara Church 1910

आमचे मंडळींत साल अखेरीस प्रभुभोजन घेणारे पुरुष
५१ स्त्रिया ५८ व बाप्तिस्मा पावलेली लेकरें ७८ आहेत. या सालीं ४ पुरुष व
२ स्त्री यांना मंडळींत घेण्यांत आलें, व १० लेकरांचा बाप्तिस्मा करण्यांत आला.
वाचक एकंदर १०० आहेत. तीन माणसें परवानगीपत्रानें इतर मंडळींत गेलीं
व चार परवानगीपत्रानें आमचे मंडळींत आलीं. या मंडळीचे संबंधांत
2 ६ ठिकाणीं ख्रिस्ती कुटुंबें राहतात. या सालीं १ मृत्यु आला व एकास मंडळींतून
1 बहिष्कृत करण्यांत आलें. मंडळीच्या उपासनेच्या सेवा येणें प्रमाणें:—
१ रविवारची शब्बाथशाळा. २ सायंकाळची उपासना. ३ मंगळवारची प्रार्थनेची
मंडळी. ४ बुधवारीं बायकांची सोसैटी. ५ शुक्रवारीं पत्रकारांची सभा. ६ शब्बाथ शाळेच्या
शिक्षकांचा वर्ग, व उमेदवारांचा वर्ग. या सालीं प्रभुभोजनाचे प्रसंग सहावेळां
करण्यांत आले. इत्यादि करून आपल्या मंडळीचीं कामें नियमाप्रमाणें करण्यांत आलीं.

१ शब्बाथशाळा:— आमची शब्बाथ शाळा मंडई येथील भजनालयांत नियमाप्रमाणें आमचे सन्मान्य पुढारी मि. टी. बी. आठवले यांनीं चालविली. या श. शाळेमध्यें एकंदर आठ वर्ग चालू असतात. प्रत्येक शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांस शक्त्यनुसार श. शाळेच्या धड्यांत शिक्षण देतो. गत वर्षीं श. शाळेच्या परीक्षेंत बरींच मुलें व मुली पास झालीं. एकंदर वर्षांत ३०० पुरुष ११८ स्त्रिया २१२ मुलें मुली होतीं. त्यांची सरासरी हजेरी ६० आहे. आमच्या श. शाळेचे पुढारी मि. टी. बी. आठवले यांनीं आपलें काम पद्धतशीर व ~~पद्धत~~वार रीतीनें केलें. श. शाळेची संस्थेनें व समुदायानें बाळ करून श. शाळेच्या धड्याच्या उदाहरणानें स्पष्ट उलगडा करून मुलांमुलींस धडा लावण्याचा ~~[illegible]~~ होईल असें शिक्षण देत असत. या श. शाळेच्या खात्यांतील जमा रु. आ. पै. २०-१-३ व खर्च रु. आ. पै. ३-१२-० शिल्लक रु. आ. पै. १६-३-३.

२:— श. शाळेसाठीं नंतर इंग्रजी जाणणारांसाठीं एक इंग्रजी वर्ग सन्मान्य मिशनरी रे. ली साहेब यांनीं चालविला आहे. त्यांच्याच शिवाय सरकारी वरिष्ठ कामगार मे. जज्ज गोपर साहेब व मे. डडजा पार्कर साहेब हे हा वर्ग घेत होते. पण त्या उभयतांची बदली झाल्यामुळें हा वर्ग, पुढारी रे. ली साहेब हे फार आस्थेनें चालवितात, या बद्दल आभार मानतों.

३:— आमची दर रविवारची सायंकाळचे भक्तिप्रसंग आमचे आस्थेवाईक पाळक हे मोठ्या आस्थेनें चालवीत आहेत, व आम्हांस आत्मिक ज्ञान करून देत आहेत. त्याच प्रमाणें दर मंगळवारीं सायंकाळीं प्रार्थनेची सभा नियमाप्रमाणें चालवितात, व तरुणांस कांहीं समयीं पुढारपण देऊन त्यांना उत्तेजन देत आहेत, व त्यांच्या आत्मिक सेवा करून घेत आहेत.

आमचे पाळक नम्र व धार्मिक मनाचे आम्हांमध्यें राहून आमची सेवा करतात. त्यांची एक अभिनंदनीय रीत आहे कीं, महिन्यांतून निदान एकदां तरी, प्रत्येक कुटुंबांचे घरीं उठून प्रार्थनेचा आनंदलाभ करून देतात, व भेटींच्या द्वारें विश्वासासाठीं बंधुभगिनींचा समाचार घेतात. यांची सातार मंडळीवर स्थापना तारीख १७ मे १९१० रोजीं झाली.

या स्थापनेस आलेल्या आमंत्रीत वडील वर्गाची बैठक स्टेशन स्कूल-मध्यें भरली. आरंभीं त्या बैठकीपुढें डॉ. ह्यूम साहेबांना अध्यक्ष व रे. जॉन मलेलू यांना चिटणीस नेमण्यांत आलें. प्रथमारंभीं रे. मकासरे यांचे स्थापनेसंबंधीं मंडळीचे ठराव, त्यांस पाठविलेलीं पत्रें व त्यांचीं त्यांच्याकडून आलेलीं उत्तरें अध्यक्षांचे सूचनेवरून मंडळीचे चिटणीस मि. रत्नकराव गायकवाड यांनीं वाचून दाखविलीं. नंतर रे. मकासरे ह्या मंडळीचे सभासद होते, त्यांचें त्या मंडळीचें निष्कासन पत्र व इंडियन मिशनच्या पाळकपणाची सनद हीं तपासण्यांत आलीं. त्यांना पाळक होण्याचा हेतु, धार्मिक स्वभाव वगैरे यांविषयीं चौकशी करण्यांत आली. त्याचें उत्तर देऊन, त्यांचीं मतें शास्त्रसंमत आहेत किंवा नाहींत यांविषयीं प्रश्नोत्तरें झालीं. नंतर पाळकांनीं आपल्या अनुभवाचा उत्कृष्ट निबंध वाचून दाखविला. नंतर पंचायतीनें त्यांच्या लायकीविषयीं चांगला विचार केला व आपली संमती मंडळीला दिली. त्याच दिवशीं सायंकाळीं सुमारें ४ वाजतां भक्ति मंदिरांत स्थापनेचा गंभीर विधि करण्यांत आला. स्थापनेचा अनुक्रम :——

१—: आरंभीची प्रार्थना रे. जॉन मलेलू यानीं केली.
२—: वडील वर्गाच्या चिटणिसाचे संभाषण रे. जॉन मलेलू
३—: शास्त्रवाचन रे. नानाजी गायकवाड.
४—: गायन (अनंत देवाजी वारसांना अपार.)
५—: सार्वत्रीक उपदेश. रे. टिळक
६—. स्थापनेची प्रार्थना रे. ली साहेब.
७—: गायन. " पाया हा मंडळीचा."
८— पाळकास बोध डॉ. ह्यूम साहेब
९—: गायन "पाळक प्रतिनीधी येशूचा."
१०—: मंडळीस बोध रे. बिसेल साहेब.
११— आशीर्वादाचा उजवा हात रे. साठे.
१२ शेवटची प्रार्थना रे. ए. डिनाके
१३ गायन " ख्रिस्तार्पणमस्तु."
१४ आशीर्वाद रे. प्रसादराव मकासरे

अशा प्रकारें स्थापनेचा विधि निर्विघ्नपणे पार पडला.

४— पत्करणारी सभा:— पत्करणाऱ्या सभेचे उपाध्यक्ष कळवितात कीं, ईश्वर कृपेनें १९४० सालांत आमच्या सभेस फारच लाभदायक झालें. एकंदर बैठका ४२ झाल्या प्रत्येक बैठकीचे वेळीं नियमित विषयांचें भाविक रीतीनें मातेपठन करण्यांत आलें. कुष्ठ बंधूंनीं आपापलीं कामें उत्तम प्रकारें केलीं. मुलांमुलींनीं समयोचित अशीं ठासकार वचनें म्हणून दाखविलीं. या सभेंत फारसा हारवा नाहींत पण ज्या थोड्या आहेत त्यांनीं आपापलीं, कामें फारच आस्थेनें केलीं. या वर्षी एक विशेष आनंद दायक गोष्ट घडली ती ही कीं, सभेच्या इतिहासांत इतःपर्यंत संमेलन येथें कधींच झालें नव्हतें, तें या वर्षी झालें. हें संमेलन मे. टी. बी. अढाव यांचे अध्यक्षतेखालीं, व मि. एन. के. डालवणी चिटणीस यांचे चिटणीसपणाचे कारकीर्दींत झालें. या संमेलनाकडून आम्हांस फारच आत्मिक लाभ मिळाले. एक मतानें काम करण्यास उत्तेजन मिळालें. या संमेलनासाठीं आम्हांस एकंदर २४७ रु.–१२ आ.–० पै. मिळविले लागले. व खर्च रुपये २३०–७ आ.–० पै. झाला. शिल्लक ११७–५ आ.–० पै. आहे. या कामीं मे. रे. व मिसेस त्री यांनीं व रे. आनंदराव हिवाळे यांचे रात्रंदिवस वगैरे सन्मान्य बंधु, सभेचे अध्यक्ष व सभासद यांनीं परिश्रम करून हा प्रसंग आम्हांस आत्मिक लाभाचा व ईश्वरी अनुभवाचा होण्यासाठीं भरपूर मदत केली म्हणून आम्ही त्यांचे आभार मानतों. संमेलनाखेरीज स्थानिक मंडळीस पाळकाच्या पगारासाठीं १० रुपये देण्यांत आले. सभासद एकंदर २३ आहेत. आमची सभा दर शुक्रवारीं सायंकाळीं सुमारें ७ वाजतां भरत असते.

५—— डॉर्कस सोसैटी:— मिसेस होपंतीबाई अढाव कळवितात कीं, आमची सभा दर बुधवारीं मिसेस त्री नडम साहेब यांचे बंगल्यांत भरत असते. सभासद एकंदर २८ आहेत. जमा रु. ४४–१२ आ.–० पै. खर्च रु. २८–१ आ.–० पै. शिल्लक रु. १६–११ आ.–० पै. आहे. मंडळीस पांच रुपये दिले.

६—— मुलांची बाल सभा:—— सभासद एकंदर १५ आहेत ४४ बैठका झाल्या. कमेट्या पुढील प्रमाणें:—— १ गायन कमेटी. २ आमंत्रण करणारी कमेटी. ३ मुलांस भांडणतंटी बोलूं न देणारी कमेटी. या कमेट्या आपापलीं कामें करितात. जमा ४ रु. ५–० पै. खर्च कांहीं नाहीं. शिल्लक रु. ४–५ आ.–० पै. आहे.

७—— मुलींची सभा:—— १९४० सालांत आरंभीं एकंदर १९ सभासद होते पण १६ दुसरीकडे गेले. नवीन दोन आले एकंदर ५ सभासद आहेत. जमा रु. २५–२ आ.–६ पै. खर्च रु. २५–२ आ.–६ पै. शिल्लक कांहीं नाहीं.

८—— दरशनिवारीं शा. शाळेच्या शिक्षकांचा वर्ग मे. [illegible] साहेबांनीं काढलेला आहे. तो मि. दादिराव [illegible] मोठ्या आस्थेनें चालवितात, व शा. शाळेच्या शिक्षकांना बराच फायदा करून देतात म्हणून त्या उपाध्यांचे फार आभार मानितों.

९—— उमेदवारांचा वर्ग:—— त्याच प्रमाणें शाळेकरी सायंकाळीं उमेदवारांचा वर्ग भरत असतो. तो वर्ग मि. टी. डी. हिवाळे. व मि. एच. जे. गायकवाड, व रे. एच. जे. गायकवाड. हे मोठ्या आस्थेनें चालवीत आले आहेत म्हणून त्यांचें अभिनंदन करितों.

१०—— मंडळीची संख्येमध्यें ख्रिस्ती सद्गुणांमध्यें व सेवेमध्यें वाढ व्हावी, व तिच्या संस्थेच्या द्वारें कांहीतरी ख्रिस्ती सेवा विधर्मिलोकांसाठीं करून घ्यावी म्हणून मिशनरी रे. ली साहेब व मिसेस लीमिडम साहेब, व आमचे स्वदेशीय मिशनरी रे. ए. एस. हिवाळे साहेब यांनीं उदात्त विचारांचीं आत्मिक वाढीचीं उत्तेजनाचीं अनेक भाषणें केलीं इतकेंच नव्हें तर मंडळीच्या बाह्य व अंतरंग सुस्थितीविषयीं द्रव्य द्वारां मदत केली आहे. म्हणून मंडळी त्यांचे मनापासून आभार मानते.

११—— सन्मान्य लीमडम साहेब या भगिनींनीं गायक मंडळीमध्यें पुढाकार घेऊन शा. शाळा, ईश्वरी उपासना, मंगळवारची प्रार्थनेची पोथी इत्यादि प्रसंगीं हजर राहून पुष्कळ मदत करतात, व शा. शाळा ईश्वरी उपासना हे प्रसंग अधिक शोभा दायक व्हावेत, म्हणून फूल पात्रें आणवून पुष्प गुच्छांनीं शोभा दायक करितात. म्हणून मंडळी त्यांचे आभार मानिते.

१२—— १९१० सालची ख्रिस्त जयंती लहान थोरांस धार्मिक कृत्यांनीं आत्मिक लाभाची झाली. त्याच प्रमाणें वॉच नाईट सर्व्हिस अध्यात्मिक लाभाची व्हावी. व प्रेम बंधूंचा स्नेह मेळा व्हावा म्हणून मिस न्युडंटबाई व रे. आनंदराव हिवाळे यांच्या प्रेमळ औदार्यानें, व रे. व मिसेस लीमिडम साहेबांच्या व नम्रतेच्या पंक्ती सेवेनें मधुपानभरवर अमोल्याप्रमाणें प्रसंग झाला, व कीर्तन भाषणें यांहीं करून उत्तेजना व मुक्तिच्या-चा प्रसंग होऊन मंडळी अत्यानंदात घरीं गेली. आमची प्रभुजवळ एवढीच विनंती आहे कीं, आमची मंडळी ख्रिस्ती सद्गुणांत वाढो!
व ख्रिस्तासाठीं ख्रिस्तामध्यें, ख्रिस्ताबरोबर सेवा करणारे व अनेक आत्म्यांस देवाच्या राज्यांत आणणारें साधन बनो!!

या सालची जमा $\overset{\text{रु. आ. पै.}}{६०५-६-१}$ व खर्च $\overset{\text{रु. आ. पै.}}{५८९-७-०}$. शिल्लक $\overset{\text{रु. आ. पै.}}{१५-१५-१}$
मागील ,, १२४-२-९

एकंदर शिल्लक. १४०-१-१०

सातारा मंडळीतील प्रभुभोजन घेणाऱ्या लोकांची याद. १९११. व १९१२

Communicants of Satara Church 1911/1912

× +	१	विर्वेतामजी भोसले.	३९	सावित्राबाई वी. जाधव.	
+	२	वेणाबाई कृष्णाजी भोसले.	४०	भिमा रावजी शिंदे.	×
	3	विठोबा गुजाजी गायकवाड.	४१	राही म्यानुबा कांबळे.	×
	४	सावित्राबाई विठोबा गायकवाड.	४२	भागु रामा.	?
	५	दाविदराव कासमभाई ढालवाणी.	४३	मुक्ताबाई देवजी कांबळे.	
	६	कृष्णाजी पिराजी भोसले.	४४	भागु पांडु.	?
	७	शेवंतीबाई टी. आढाव.	४५	हरिबा धोंडीबा कांबळे.	
×	८	जसुदाबाई.	४६	हिरा सुलेमान.	
×	९	जमुनाबाई. मरण पावली	४७	केशव बाबाजी.	?
	१०	सुजानराव का. ढालवाणी.	४८	सायरसराव बि. मकासरे.	
?	११	सखारामजी हणमु कांबळे.	४९	धोंड्या डोळकडे.	
	१२	आलिमाबेतबाई बि. मकासरे.	५०	आनंदी गणपत ~~भोसले~~ काकडे	
	१३	काशीबाई आबाजी तरडे.	५१	तायनी कृष्णाजी.	
	१४	गोविंदराव परशुराम भागवत.	५२	रत्नाकरराव एच. गायकवाड.	
	१५	जॉर्ज एच. बुस.	५३	जाईबाई पि. जाधव.	
	१६	निळकंठ का. ढालवाणी.	५४	सईबाई बापूजी भालेकर.	×
	१७	नानुबाई पर्वतराव कांबळे	५५	गकुबाई ना. थोरात.	×
× ×	१८	लिडियाबाई पीटर अँड्रुज.	५६	पिरा जोतीबा शिंदे.	
?	१९	हरी सखाराम वंदगोडे.	५७	Hindu नाना जनोबा पवार.	?
	२०	रत्नाकर का. ढालवाणी.	५८	मारुती लक्ष्मण काकडे.	
	२१	जॉन पीटर अँड्रुज.	५९	कुंडलीक देवजी कांबळे.	
	२२	बाबाजी लक्ष्मण काकडे.	६०	भाऊ जनोबा पवार.	
+	२3	बाबाजी कृष्णाजी भोसले.	६१	आनंदराव स. कांबळे.	
×	~~२४~~	+धोंडुबाई बाबाजी भोसले. मरण पावली.	६२	गंगु पिराजी.	
?	२५	गंगु वि. जोशी.	६३	तायनी श्रावण कांबळे.	
	२६	गजी धोंडीबा कांबळे.	६४	राधिका गंगाराम कांबळे	
	२७	गोजरा विठोबा गायकवाड.	६५	राजस ना. थोरात.	×
	२८	बिठाबाई सखाराम कांबळे.	६६	फुलाबाई कृ. हिवाळे.	×
	२९	आनंदराव पर्वती कांबळे.	६७	सुमती शाहुराव गायकवाड.	
	3०	आबाबाई लक्ष्मण काकडे.	६८	चांदी सुलेमान मुलाणी.	
	3१	सखुबाई जोतिबा कांबळे.	६९	ग्रेस हणमंतराव गायकवाड.	
?	3२	भागुबाई सखाराम जगताप.	७०	गया नानाजी गायकवाड.	
×	33	राही धोंडीबा कांबळे.	७१	आकु पर्वती कांबळे.	
×	3४	मालतीबाई हणमंतराव गायकवाड.	७२	केच्चर पिराजी.	
	3५	बाबू पिराजी जाधव.	७३	नारसिंग बेल्लाजी.	
	3६	हणमंतराव गायकवाड.	७४	भलो रमाजी.	gone
	3७	यमुनाबाई एच. गायकवाड.	७५	बागलो पुंजाजी.	
?	3८	धोंडी जोतीबा कांबळे	७६	बेच्चर रणछोडजी.	

१९११ व १९१२ सालची याद.

७७ श्रावण धोंडीबा कांबळे.
× ७८ सुगंधराव लोंढे.
७९ सितारा नंदी पोचेटी.
८० रे. हरीबा. गायकवाड.
८१ मसाबाई हरीबा गायकवाड.
+ ८२ त्र्यंबकराव हिंवाळे.
+ ८३ मायबाई त्र्यं. हिंवाळे.
+ ८४ भाऊराव लक्ष्मण गडगे.
+ ८५ बाळूबाई भाऊराव गडगे.
× ८६ बापूजी नारायण देठे.—
× ८७ सुंदराबाई बापूजी देठे.—
× ८८ विठोबा बाबाजी गायकवाड.
× ८९ राहीबाई विठोबा गायकवाड.
× ९० बाळाजी नारायण थोरात.
× ९१ वसंत नारायण थोरात.
× ९२ बाबु बापूजी भालेकर.
९३ माधव देवजी कांबळे.
९४ मालतीबाई आल्हाट.
९५ लिंबा सदोबा खंडागळे.
९६ बायजा महादू पाजी.
९७ एसार बेचर लाल.
९८ भागुबा पां. मगर.
९९ कोंडीराम पांडुरंग खडिदार.
१०० महादू जोतीबा. John B.
१०१ रंभा ग्यानुबा कांबळे.
× + १०२ कमलावती देवजी कांबळे.
× १०३ जिजा सखाराम कांबळे.
१०४ शाहूराव गायकवाड.
१०५ बलभीम लांडगे.
१०६ शेवंतीबाई पवार.
१०७ एकनाथराव साळवे.
१०८ लाडूबाई ए. हिंवाळे.
× + १०९ मि. से मुवेल सोआंस.
× + ११० मिसेस. सोआंस.
१११ मि. आर. कार ×
११२ सावित्राबाई. साळवे
११३ सुंदराबाई पंडित.
११४ मालनबाई. एस साळवे.

११५ गोजराबाई तुकाराम केसाव
११६ बळवंतराव. सिदोबा बावागिरी.
११७ विश्रामजी रावबा मिरपगार.
११८ जानकाबाई लांडगे.
११९ गंगारामजी तबाजी गायकवाड.
१२० प्रज्ञाबाई गंगारामजी गायकवाड
१२१ यशवंतराव धोंडीबा सूर्यवंशी
१२२ लिलावतीबाई यशवंतराव "
१२३ धनाजी सोनाजी चांदकर
१२४ शेवंतीबाई धनाजी चांदकर
१२५ आनंदराव मगर.
१२६ सिताबाई उंद्रे.
१२७ शांताशिला. हरिबा. गायकवाड.

१९११ व १९१२

बाप्तिस्मा पावलेलीं [illegible] करें

List of baptized Children in Satara Church 1911/12/1912

१ वामन विठोबा गायकवाड
2 जयवंत " "
3 रुथ मालती दाविदराव ढालवाणी.
४ वामन बापूजी पाटोळे.
५ वसंत अर्नेस्ट आढाव.
६ सारा बापूजी पाटोळे.
७ प्रभाकर गोविंदराव भागवत.
८ वसंत आल्बर्ट डी. ढालवाणी.
९ फ्रान्सीस पीटर अँड्रुज
१० मनोरमा ग्रेस सूर्यवंशी.
११ मालती मधुरागो. भागवत.
१२ मोसे बाबाजी काळसेकर.
१३ गाब्रियल पीटर अँड्रुज.
१४ सुमंत विल्सन ढालवाणी.
१५ लिलावती हणमंतराव गायकवाड.
१६ गफूर हुसेन.
१७ गुलाब "
१८ प्रेम हणमंतराव गायकवाड.
१९ रैचेल शांतवनराव ढालवाणी.
20 वसंत बापूजी पाटोळे.
२१ वसंतिका आनंदराव सेकटकर
२२ शारदा एलन आढाव.
23 रत्नाकर विठोबा पेटारे.
२४ डेव्हिड बाप्टिस्ट ग्वालबंस.
२५ मालन सखाराम गायकवाड.
२६ प्रभाकर हणमंतराव गायकवाड.
२७ योहान विठोबा पेटारे.
२८ शांति " "
२९ शमुवेल " "
३० बेंजामिन बाप्टिस्ट ग्वालबंस.
३१ शांतवन कृष्णाजी हिंगाके.
३२ सदु " "
३३ बापू " "
३४ शमुवेल " "
३५ राजस " "
३६ सात्विक " "
३७ तारा " "
३८ सुंदर " "
३९ सुमंत " "

४० प्रकाश विठोबा पेटारे.
४१ कमला फ्लोरा आढाव.
४२ शमुवेल प्रेमचंद जयवंत सूर्यवंशी
४३ सारा हुसेनबाई.
४४ चांदबी "
४५ महिबू "
४६ मेरी अँजेलो ज्योतिमाला बाबाजी.
४७ मार्था कमला बेंजामिन.
४८ प्रभावती सेरा एच. गायकवाड.
४९ सयाजी मल्हारराव गायकवाड.
५० मार्था वनु बेंजामिन.
५१ प्रभाकर सुगंधराव लोंढे.
५२ प्रभाकर हरीबा कांबळे.
५३ नरसींग नंदी पोचेटी.
५४ मनोहर त्र्यंबकराव हिंगाके
५५ विश्रांती " "
५६ नयनसुख " "
५७ प्रकाश " "
५८ सुभानी " "
५९ दृष्टी " "
६० हिरालाल " "
६१ गुलाब " "
६२ प्रेमचंद " "
६३ सुलोचना वि. गायकवाड.
६४ मेरी मनोहरराव आढाव.
६५ शारन सेसिल आढाव.
६६ सुमती आलेरा गायकवाड.
६७ भास्कर हरीबा कांबळे.
६८ रूबी कमला डेव्हिडराव.
६९ बेंजामिन मधुकर "
७० कुलवंती बाबालो.
७१ शांतवन "
७२ सुमित्र अक्रूराव गडगे.
७३ विष्णु. सखाराऊ.
७४ गोविंद.
७५ रश्मी [illegible] कुलगा
७६ भास्कर बी. जाधव.
७७ आरस्टीन, सांगावक.
७८ शांतशील भा. मगर

१९१२	७९	थामसन् उर्फ चंद्रसेन वर्मी.
	८०	मार्था- लीलावतीसो.
	८१	ओस्कर-यांचें लहान मूल. -
	८२	डेझी दाविदराव ढालवाणी
	८३	जेम्स सुज्ञानराव ढालवाणी
	८४	भास्कर प्रसादराव मकासरे
	८५	शारदा प्रसादराव मकासरे
	८६	उषा प्रसादराव मकासरे.
	८७	भास्कर दानियल दिवे.
	८८	जॉनसन दानियल दिवे.
	८९	कुसमावती दानियल दिवे.
	९०	कर्नेलियस दानियल दिवे.
	९१	विनायक बलभीम लांडगे.
	९२	मधूमली गंगारामजी. गायकवाड
	९३	मनोरमा एस. पवार.
	९४	मालती गंगाराम. गाय.
	९५	जयवंती. गं. गायकवाड
	९६	गोपाळ गं. गायकवाड.
	९७	शाहू गं. गायकवाड
	९८	दिनकर. गं. गायकवाड
	९९	डेविड धनाजी चांदकर
	१००.	शामुवेल धनाजी चांदकर
	१०१	दानिएल धनाजी चांदकर
	१०२	हेयहेज्केल. ध. चांदकर
	१०३	मंजूळा धनाजी चांदकर.
	१०४	शेवंती उर्फ सुलोचना बेचरलाल

दिसेंबर २८.

या रोजीं मागनिची पोथी झाल्यावर पुढील सालासाठीं कामगारांची नेमणूक कोणत्या रीतीनें व्हावी ? वगैरे यांविषयीं प्रश्नोत्तरें होऊन, शेवटीं रे. म. वि. मकासरे यांनीं एक नवीन नांवें दर्शविण्याची रीत चालू करण्याचें सुचविलें, कारण पूर्वीच्या पध्दतीनें बराच वेळ जाऊन पुष्कळ वादविवाद होतो. म्हणून चिठ्ठ्या टाकून नांवें सुचवावींत असें ठरविलें. याप्रमाणें पुढील कामगारांची निवडणूक केली:—

१:-सर्वानुमतें पूर्वींचे कारभारी असावेत असें ठरलें.

दे. पुजारी: १ मि. त्र्यंबकराव त्र्यं. हिंगणे. २ मि. हणमंतराव गायकवाड.

२:— बी. पी. जाधव यास चिटणीस नेमलें.

३:— खजीनदारासाठीं मि. बी. ल. गडगे व बी. पी. जाधव या दोघांचीं पुढें आलीं, पण त्यातींच निश्चय केली कीं, ज्याच्या कडे एक काम आहे त्याकडे दुसरें काम देऊं नये, व वेळेच्या संकोचामुळें बैठक बरखास्त केली.

सन १९११. 1911

जानेवारी १. या रोजीं मिस्टर भाऊराव गाडगे यांचा पुत्र सुमित्र याचा बाप्तिस्मा रे. म. वि. मकासरे यांनीं केला.

ता. ६-१२-१९१० या रोजीं जी कमेटी नेमली होती तिनें पैशां विषयीं चांगली चौकशी करून मंडळीस रिपोर्ट दिला कीं:- 'मंडळीला पाळकांच्या घरासाठीं पांच रुपये भाय देतां येणार नाहींत, पण ३ रुपये दर महा देण्याची शक्ति आहे, आणि पाळकांसाठीं तर घर पाहिजे आहे, आणि दर महा आणखी दोन रुपायांची गरज आहे व जर हे दोन रुपये मिळतील तर पाळकासाठीं पांच रुपयांचें घर भाड्यानें घेण्यास कांहीं हरकत नाहीं,' पण त्या दोन रुपायांची रक्कम आपणांस कशी मिळवितां येईल? वगैरे यांची चौकशी करण्यास पुढील कमेटी नेमली. कमेटींतील मेंबरांचीं नांवें येणेंप्रमाणें:- १ मिस् न्युजंट बाई, २ मि. एच. जे. गायकवाड. ३ मि. टी. डी. हिंवाळे. ४ रे. एच. जी. गायकवाड. ५ मि. बी. पी. जाधव. या सभासदांनी पैशां विषयीं चौकशी करून पाळकाच्या घराची दुरुस्ती करावी असें ठरलें.

-3-११. या रोजीं मि. यशवंतराव सूर्यवंशी याचा मुलगा सामसन (चंद्रसेन) याचा बाप्तिस्मा रे. मकासरे यांनीं केला.

ता. ४. ४. '११. I या रोजीं मंडळीनें राज्यारोहणासाठीं पांच रुपये वाटावेत असें ठरलें.

II यत्नकरणाऱ्या सभेकडून व दाक्षिण सोसैटी कडून मिळालेली रक्कम पाळकांच्या घराच्या दुरुस्तीसाठीं द्यावी असें ठरविलें.

ता. ११. ४. '११. I या रोजीं माळन बाई हरीबा गायकवाड यांना कोळशी येथील मंडळींत मिळण्यासाठीं परवानगीपत्र द्यावें असें सर्वानुमतें ठरलें.

II रे. पी. व्ही. मकासरे यांनीं आपला पगार वाढण्याविषयीं मंडळीला विनंती केली, पण मंडळींतील कित्येक भाऊ बहिणी या प्रसंगीं हजर नव्हत्या म्हणून व असें महत्वाचें जाहिरात दिल्यावांचून आपणांस करतां येत नाहीं, यासाठीं एक लेखी जाहिरात मंडळीमध्यें फिरवावी असें सर्वांच्या मतानें ठरलें, व मंडळीची बैठक बरखास्त झाली.

Pastor's salary

ता. १४. ४. '११. या रोजीं पाळकांच्या पगाराची वाटाघाट करण्यासाठीं पुनः बैठक बसली. प्रथम पाळकांनीं प्रार्थना केली, नंतर त्यांनीं माझा पगार वाढवावा म्हणून पुन्हां विनंती केली. मि. डी. के. टाळवाणी यांनीं अशी सूचना पुढें आणली कीं, ज्या अर्थीं हें काम पाळकाविषयीं आहे तर त्यांनीं या प्रसंगीं थांबूं नये. या गोष्टीला मिसेस न्युअंटबाईनीं अनुमोदन दिलें. नंतर हें काम चालविण्यास अध्यक्ष कोण असावा? असा प्रश्न पुढें आला. मि. यशवंतराव सूर्यवंशी यांनीं 'मि. डी. के. टाळवाणी हे अध्यक्ष असावेत' अशी सूचना केली, व या गोष्टीला मि. रघुनाथराव टाळवाणी यांनीं अनुमोदन दिलें. दुसरी सूचना मि. हणमंतराव यांनीं सूचना केली कीं, मि. त्र्यंबकराव व्ही. हिंगाळे हे अध्यक्ष असावेत, या सूचनेला बी. पी. जाधव यांनीं अनुमोदन दिलें. सर्वानुमतें मि. टाळवाणी हे अध्यक्ष झाले. अध्यक्षांनीं 'मागील बैठकींत जो ठराव झाला होता, तो वाचून दाखवावा' असें सांगितलें. नंतर जो ठराव

झाला होता तो चिटणिसानें वाचून दाखविला. अध्यक्षांनीं मिस. न्युजंटबाईसाहेबांस विचारलें कीं, आपणांकडे पाळकासाठीं जी रकम आलेली आहे, ती मंडळीच्या खजिन्यांत देण्यास काय अडचण आहे काय? बाईसाहेबांनीं म्हटलें कांहीं हरकत नाहीं. नंतर अध्यक्ष म्हणाले, ती रकम सुमारें किती वर्षें जाईल, कारण मंडळीला पाळकाचा पगार वाढविण्या इतकी शक्ति नाहीं. मिस. बाईसाहेब म्हणाल्या, ती रकम सुमारें तीन चार वर्षांपर्यंत जाईल (पुरेल). अध्यक्षानें म्हटलें जर ती रकम तीन चार वर्षांपर्यंतच जाईल तर पुढें काय करावयाचें? कारण आमच्या मराठीमध्यें अशी म्हण आहे कीं, "म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं, पण काळ सवकतो." मागें पुढें अडचण होऊं नये. मिसबाईसाहेबांनीं म्हटलें कीं, जी रकम पाळकासाठीं दुसरीकडून आम्हांस मिळाली, ती मला पाळकाला उघड देतां आली असती; पण तसें करणें मला बरें वाटलें नाहीं, म्हणून मीं मंडळींत ही गोष्ट काढली, कारण माझा विचार आहे कीं ही रकम मंडळीकडून पाळकास मिळावी; आणि पाळकाची फारच अडचण आहे, हल्लींचा पगार त्यांना कांहीं पुरत नाहीं; आणि ती रकम एकदम देणें मला बरें वाटत नाहीं. म्हणून मंडळीकडून त्यांना दर महा साहा साहा रुपये दिले असतां बरें होईल असें मला वाटलें.

अध्यक्ष म्हणाले, जी रकम आपण देणार आहांत, ती दिली असतां मंडळी स्वतंत्र होऊं शकेल काय?

मिस. बाईसाहेबांनीं म्हटलें, ही मंडळी अगदीं स्वतंत्र नाहीं, एकंदर दशांश सुमारें २०, २१ रुपये जमतो त्याचे बाकीचा पैसा मिशन देतें, तर आतांपासून मिशन तुम्हांस कांहीं देणार नाहीं; सर्वांनीं बरोबर दशांश द्यावा. अध्यक्ष म्हणाले, हल्लीं जो पगार पाळकास मिळत त्यापेक्षां कमी पगारांत किती मिशन कामगार आपापला निर्वाह करीत आहेत. मनुष्याला कितीही पैसा ज्यास्त दिला तरी तो त्याला पुरणार नाहीं; आज मला ५०० रुपये दिले तरी मला पुरणार नाहींत.

आम्हांस पाळकाचा पगार वाढविण्यास कांहींच हरकत नाहीं, पण पाळकाचें वर्तन जसें असावें तसें नाहीं, कारण ते मंडळींतील लोकांच्या घरीं जाऊन त्यांचा समाचार घेत नाहींत; आमच्या इकडे मुलें किती आजारी होतीं, त्यावेळेस मिशनचे लीमन साहेबांनीं किती सहाय्य केलें, आणि मिशनाकडून पाळकाला सहाय्य मिळतें म्हणून पाळक जसा संबंध ठेवावा तसा ठेवीत नाहींत.

बाईसाहेब म्हणाल्या, असें आहे तर मिशन आतां कांहीं सहाय्य करणार नाहीं. पाळकाचा पगार तुम्हींच कसेंही करून द्यावा वाई मंडळी लहान असून आपल्या पाळकाचा पगार स्वतांच देते, तसा तुम्हींही द्यावा. कित्येक भाऊ म्हणाले, पूर्वीं मिशनरींनीं 'आम्ही कांहीं तरी देऊं' असा ठराव केला आहे. बाईसाहेब म्हणाल्या केला असेल. मी एक पैसा देणार नाहीं;

कित्येक भाऊ म्हणाले लीनसाहेबांनीं तसा ठराव केला आहे.

बाईसाहेबांनीं म्हटलें, कीं साहेबांनीं माझ्यासाठीं कबूल केलें काय?
मी ती साहेब नाहीं. आतां मी कांहीं देणार नाहीं.

मि. नीळकंठराव ढालवाणी हे म्हणाले, पाळकाला इतरांपेक्षां थोडा ज्यास्त पगार असल्यास, त्यांची इतरांशीं तुलना करायाला नको.
बाईसाहेब म्हणाल्या, त्याला पुष्कळ खर्च असतो, कारण त्यांच्याकडे पाहुणे वगैरे येतात आणि दुसरा पुष्कळ खर्च असतो. मि. नीळकंठराव म्हणाले, पूर्वी असा ठराव आहे वाटतें, अशासाठीं पाळकाजवळ कांहीं रकम असावी.

अध्यक्षांनीं म्हटलें, पाळकांनीं मंडळींतील कोणा सभासदावर अपमान कारणाविषयीं विनंती केली होती काय? मि. हणमंतराव गायकवाड यांनीं म्हटलें एकदां पाळक आम्हां, कोठें रात्रीचे येऊन आम्हांस या संबंधानें विचारलें होतें, नंतर मि. हणमंतराव गायकवाड यांनीं सूचना केली कीं, ज्या अर्थीं हा पैसा पाळकासाठीं आलेला आहे व आपणांस कांहीं ज्यास्त दरमहा द्यावा लागत नाहीं, आणि असें हा पैसा आपणांस मिळत आहे, तर हा पैसा संपेपर्यंत पाळकाचा पगार वाढवावा. या सूचनेला मि. त्र्यंबकराव हिवाळे यांनीं अनुमोदन दिलें; पण बाईसाहेब म्हणाल्या, मी आतां जो पैसा आलेला आहे तो परत पाठवून देतें, तो मी आतां देत नाहीं. नंतर बी. पी. जाधव यांनें अशी सूचना केली कीं, पाळकास चाळीस रुपयांपर्यंत पगार वाढवावा कांहीं हरकत नाहीं.

बाईसाहेबांनीं म्हटलें, विचार करून ठरवा मी एक पैसा देणार नाहीं, आलेला पैसा परत पाठवून देईन. नंतर मि. नीळकंठराव ढालवाणी यांनीं अशी सूचना केली कीं 'जो पैसा मिशन देणार होतें, तो आलेला पैसा मिशनरींनीं घ्यावा' या साठीं एक कमेटी नेमावी आणि तिनें जाऊन विनंती करावी. या सूचनेला मि. कामकडे यांनीं पुष्टीकरण दिलें. नंतर सर्वांनुमतें ही कमेटी नेमण्यांत आली आणि तिच्यांत मि. डी. के. ढालवाणी, मि. एच. जे. गायकवाड, व मि. त्र्यंबकराव हिवाळे हे असावेत असें ठरलें नंतर बैठक उठली.

१८ एप्रिल '११. या रोजीं मिसेस शेवंतीबाई पवार यांना सर्वानुमतें सभासदमंडळींत घेतलें.

२३. ४. '११. या रोजीं रामभाऊ मढेकर यांचा, यांचें कुटुंब सखुबाई यांचा व यांचा मुलगा विष्णु व यांनींच सांभाळलेलीं दोन निराश्रीत मुलें, या सर्वांचा बाप्तिस्मा रे. ए. एस्. हिवाळे यांनीं स्टेशन स्कूल येथें केला.

२. मे. १९११. या रोजीं 'आबाबाईला कामावर ठेवावें किंवा नाहीं, कारण मंडळीजवळ पैसा नाहीं' असा विचार मंडळींत निघाला; पण ज्या अर्थीं बाईसाहेब येथें नाहींत त्या अर्थीं हा विचार पुढें

हा विचार तहकूब ठेवावा असें ठरविण्यांत आलें.

२८ मे. '११. या रोजीं बाबू जाधव याच्या मुलगा भास्कर याचा बाप्तिस्म रे. पी. व्ही. मकासरे यांनीं स्टेशन स्कूलमध्यें केला.

२० जून '११ १:— या रोजीं मिसेस हिंवाळे यांस जेऊर पेठेतील मंडळीच्या परवानगीपत्रावरून [illegible] मंडळींत घेतलें.

२:— आबाबाईच्या पगाराविषयीं प्रश्न पुढें आला पण त्या वेळीं बाईसाहेबांना अशक्तपणामुळें येतां आलें नाहीं, म्हणून पुनः हा प्रश्न तसाच तहकूब ठेवावा असें ठरलें.

२५ जून '११. या रोजीं आबाबाईच्या पगाराविषयीं प्रश्न पुनः पुढें आणला त्यांत मि. त्र्यंबकराव यांनीं अशी सूचना केली कीं, 'आबाबाईला दोन महिन्यांचा पगार द्यावा.' यास मि. हणमंतराव गायकवाड यांनीं अनुमोदन दिलें; व ज्या अर्थी तिच्या मुलांचें वर्तन वाईट आहे त्या अर्थी तिला कामावर ठेवूं नये असेंही ठरविलें; पण त्यांना अगोदर राजीनामा दिला पाहिजे अशी कित्येकांनीं शंका घेतली. म्हणून ज्या वेळीं बाईसाहेबांनीं हिंवाळेसाहेबांकडून आबाबाईला सूचना ठेवली तीच राजीनामा समजावा अशी सूचना मि. सूर्यवंशी यांनीं केली, या सूचनेस मि. ए. पी. कांबळे यांनीं अनुमोदन दिलें.

२२ ऑगस्ट '११. या रोजीं मि. शामुयल सोकन्स यांना व याचें कुटुंब शिवकाबाई व मुलगा आगस्टीन यांना सर्वानुमतें मंडळींत घ्यावें असें ठरलें.

१८ सप्टेंबर '११ या रोजीं तात्याराम मनोजी यांना देवाज्ञा झाली.

२५ सप्टेंबर '११. या रोजीं मिशनरींच्या कोर्टासाठीं स्थानिक मंडळींकडून कोण प्रतिनिधि पाठवावा या विषयीं प्रश्न पुढें आला. नंतर मि. डी. के. डालवाणी व रे. पी. व्ही. मकासरे या दोघांविषयीं दोन मतें पडलीं, पण सर्वानुमतें रे. मकासरे यांना नेमण्यांत आलें.

१० ऑक्टोबर '११. या रोजीं सर्वानुमतें असें ठरलें कीं पाळकारें नगरला मिशन कमिटीला जाण्यासाठीं ७ रुपये घ्यावेत. असें सर्वानुमतें ठरविण्यांत आलें.

३० '' या रोजीं धोंडूबाई भोरतके, यांना देवाज्ञा झाली.

२ नोवेंबर '११. या तारखेस मि. बाळाजी काळसेकर यांना देवाज्ञा झाली.

८ नोवेंबर '११. या दिवशीं मि. एकनाथराव साळवे यांस सर्वानुमतें शिंगवे मंडळीतील परवानगी पत्रावरून त्यास मंडळींत घेण्यांत आलें.

१२ नोवेंबर '११ या रोजीं मि. भार भगवंतराव यांची मुलगी शांतशीला इचा बाप्तिस्मा रे. पी. व्ही. मकासरे यांनीं केला.

१४. नोवेंबर या दिवशीं प्रार्थनेची मंडळी झाल्यावर मि. नविकेशरव ढोलवाणी यांना मंडळींत मिळण्याविषयीं परवानगी पत्र द्यावें, असी मि. एच. जे. गायकवाड यांनीं सूचना पुढें आणली, तिला मि. सूर्यवंशी यांनीं अनुमत दिलें. म्हणून असें ठरलें कीं, त्यांना परवानगी पत्र द्यावें आणि महिन्यांतून एकदां तरी त्यांना आपल्या मंडळीकडून एक पत्र पाठवीत जावें म्हणजे निकट संबंध त्यांच्याशीं कायम राहील.

२८ नोवेंबर '११. या दिवशीं सर्वानुमतें असें ठरलें कीं, मि. वयांबळ साहेब यांना आपल्या मंडळीकडून पानफुल व्हावें. पण त्यांना वेळ केव्हां वखतीं मिळेल या विषयींची चौकशी करण्याकरितां एक कमेटी असी सर्वांनीं ठरविलें, व त्या कमेटींत मि. डी. के. ढोलवाणी, मि. एच. जे. गायकवाड व भाऊराव गाडगे असे तिघे जण असावेत असें ही ठरविलें; व या कार्याला जो खर्च लागेल तो त्यांनीं मंडळींतून करावा असें ठरलें.

२०-११, '११. या रोजीं स्टेशनस्कूल मध्यें बैठक बसली. तीमध्यें पाळकाच्या घरांत उंदीर पडला होता, म्हणून त्यांना छप्पर घालण्या संबंधीं गोष्ट निघाली. सूचना मि. मार यांनीं केली. कीं त्यांच्या खर्चीं एक छप्पर घालावें; परंतु त्या कार्यास किंमत पडेल तरी त्याविषयीं बरीच चर्चा झाल्या वर सर्वानुमतें या छप्परास निदान पंधरा रुपयांपर्यंत रक्कम द्यावी असें ठरलें.

१९-१२-११ या दिवशीं मि. बाबुराव भोंसले यांचे लहान मुलाचा बाप्तिस्मा रे. मकासरे यांनीं केला.

३१-१२-११. या रोजीं मि. सोमनाथ यांच्या मुलीचा बाप्तिस्मा रे. मकासरे यांनीं केली. मुलीचें नांव मार्था लीलावती.

१९१२. 1912.

ज्यानेवारीं १६ मंगळवार रोजीं स्टेशनस्कूलमध्ये मंडळीच्या कामकाजाची बैठक भरुन तिंत जे ठराव झाले ते येणेंप्रमाणें

१ नियमित चिटणीस परगांवीं गेल्यामुळें दानिएल सूर्यवंशी यांस सर्वानुमतें तात्पुरता चिटणीस नेमण्यांत आले

ज्यानेवारीं ८ मंगळवार या रोजीं स्टेशनस्कूलमध्यें मंडळीची बैठक भरली व तिनें नवीन साळासाठीं कामदारांच्या नेमनुका केल्या. त्या येणेंप्रमाणें —:
चिटणीस —: प्रथम दोन नांवें दर्शवून नंतर त्यांच्या नांवाच्या चिठ्ठ्या टाकिल्या. त्यांत मिसेस शेवंतीबाई पवार यांच्या नांवाच्या चिठ्ठ्या ज्यास्त असल्यामुळें त्यास बहुमत्तानें चिटणीस नेमण्यांत आले.

खजिनदार —: सदर्हु प्रमाणें दोन नांवें दर्शवून त्यांच्याही नांवाच्या चिठ्ठ्या टाकिल्या. व बहुमतानें मागिल सालचे खजिनदार मि. भाऊराव गडगे हेच सांप्रत साली नेमिले.

हिशेब तपासनीस —: मि० दास यास मंडळीच्या बहुमत्तानें तपासनीस नेमिले.

कारभारी —: तेच कायम असावेत असें ठराविलें.

मागील सालच्या चिटणिसाचा राजीनामा मंडळीपुढें आला तो वाचून दाखवून नंतर त्यांचा राजीनामा पत्करण्यांत आला. या प्रसंगीं चिटणीस परगांवीं असल्यामुळें तात्पुरता चिटणीस मि. हणमतराव गायकवाड यास बहुमत्तानें नेमिले. व त्यानें तें काम चालविलें.

ज्यानेवारीं १६ मंगळवार रोजीं स्टेशनस्कूलमध्यें मंडळीच्या कामकाजाची बैठक भरुन तींत जे ठराव झाले ते येणेंप्रमाणें. —:
नियमित चिटणीस परगांवीं गेल्यामुळें दानिएल सूर्यवंशी यांस सर्वानुमतें तात्पुरता चिटणीस नेमण्यांत आले.
२ साताऱ्यास जे डेपुटेशन येणार आहे त्यांच्यासाठीं मंडळीकडुन कांहीं प्रसंग करावा असें सर्वानुमतें ठरलें. व या कार्यासाठीं सर्वानुमते एक कमेटी नेमण्यांत आली. तींतील सभासद येणेंप्रमाणें.

१ डेविडराव ढाळवाणी
२ रे. प्रसादराव
३ दोन कारभारी
४ रे. ढिंवाके साहेब
५ बाईसाहेब

व या कमेटीनें खर्चाची व सर्वकांहीं व्यवस्था करावी असे ठरले.

(३) देवळाच्या रखवालदाराचा ४॥ रुपये खर्च कांहीं दिवस बंद करावा अशी सूचना मंडळीपुढें आली होती परंतु कांहीं कारणामुळें या गोष्टीचा निकाल पुढें करावा असें ठरलें.

(४) नंतर चिटणीस व खजिनदार यांचे रिपोर्ट वाचन होऊन सर्वानुमतें ते पास करण्यांत आले.

ानेवारी २१ या रोजीं मागील सालचे खजीनदार व चिटणीस यांचे रिपोर्ट वाचन दुपारच्या उपासनेच्या प्रसंगीं मंडळीसमोर झाले.

ानेवारीं २३।२ मंगळवार रोजीं स्टेशनस्कूलमध्यें मंडळीच्या कामकाजाची बैठक भरली. तींत पुढील ठराव पास करण्यांत आले.

(१) नियमित चिटणीस परगांवीं गेल्यामुळें दानियल सूर्यवंशीं यांस तात्पुरता चिटणीस नेमण्यांत आले.

(२) ता १८/१/१२ या रोजीं डेप्युटेशनसाठीं जी कमेटी निवडली होती ती रद्द करून सर्वानुमतें नवीन कमेटी नेमण्यांत आली. तिंतील सभासद येणेंप्रमाणें.—:
१ रे. प्रसादराव २ मि० डेविडराव, ३ दानियल सूर्यवंशी; आणि दोन मिशनेरी.

जानेवारीं २८ शनवार या रोजीं सातारा एथें अमेरिकन मिशनाचे उइमेन बोर्डाचे सेक्रेटरी मिस् ल्यामसन व खजीनदार मिस् डे ह्यांचे आगमन झाले.
सदरहु दिवशीं थोडी विश्रांति घेऊन नंतर सुमारें पांच वाजतां कांहीं हिंदु कुलीन बाया व पार्शी बाया व इंग्रजी समजणाऱ्या कांहीं ख्रिस्ती बायां यांना मिस् न्युजंट बाईसाहेब यांच्या बंगल्यावर टीपार्टी झाली. त्याप्रसंगीं सुस्वर बाज्यावर कांहीं गाणीं झालीं. त्यांत विशेषेंकरून मिस् मथुराबाई जोशी ह्या सुशिक्षित बाईनें बाज्यावर वाजवून फारच मधुर वाणीनें कांहीं गाणी गाऊन दाखविली. तसेंच कांहीं पार्शी बायानींही उत्तम गाणीं गाईली.
नंतर मिस् न्युजंट बाईनीं आलेल्या पाहुण्यामंडळीस सदरहु बायांची ओळख करून दिली. त्यावरून त्यांना फारच संतोष वाटला. मग कांहीं पार्शी बाया यांनीं कांहीं कशिदा काढलेलीं कामें व शिवण दाखवून म्हटलें आम्ही आपल्या घरीं नेहमीं अशींच कामें करीत असतो.
आमच्या बाया घरीं रिकाम्या बसलेल्या कधींच आढळणार नाहींत.
नंतर पाहुण्यानीं आपलेंही शिवण त्यांस दाखविलें व उत्तेजन दायक भाषणें केलीं; व शेवटीं हा प्रसंग आनंदानें पार पडला. या प्रसंगीं सुमारें २५ बाया हजर होत्या. त्याच दिवशीं रात्रौ ८ वाजतां स्टेशन स्कुलांत प्रीति भोजन झालें. या प्रसंगीं पुरुष व स्त्रिया मिळून सुमारें ५० मंडळी हजर होती. आमची परमप्रिय पाहुणी मंडळीही या वेळीं विराजमान होती.

हाही प्रसंग प्रभूनें आनंदानें पार पाडला.

ज्यानेवारीं २८ या रोजीं नियमीत वेळीं नियमीत ठिकाणीं शाबाथ शाळा भरली. शाब्बाथ शाळेचे पुढारी आमचे प्रिय पाळक यांनी नेमाप्रमाणें शाब्बाथ शाळा चालवून नंतर आलेल्या पाहुणी मंडळीस बोलण्यास प्रसंग दिला. मग बोर्डाचे खजीनदार मिस. हे. यांनीं आबालवृद्धांस बोधपर व उत्तेजनदायक भाषण केलें. व त्यावरून सर्वांस संतोष झाला. त्यांचे भाषण विशेषेंकरून लहानलेंकरांस अधिक उत्तेजन प्राप्त व्हावें व तीं ख्रिस्ताच्या राज्याच्या वृद्धीस विशेष कारणीभूत व्हावीत असें होतें. नंतर एक गाणे गाऊन व आशिर्वाद मागून शाबाथ शाळा बरखास्त झाली. या वेळीं लहानथोर मिळून १२५ मंडळी हजर होती.
दुपारच्या प्रसंगः— दुपारीं ४॥ वाजता स्टेशन स्कुलांत उपासनेच्या प्रसंग झाला. प्रथम ईश्वरी स्तवन होऊन व गाणें गाऊन मग पाळकांनीं कांहीं शास्त्रभाग वाचून व प्रार्थना करून नंतर थोडेसें भाषण केलें. तें संपल्यावर एक गाणें झालें. शेवटीं पाळकांनीं म्हटले कीं, आमचे परमप्रिय मिस ल्यामसन यांचा पवित्र आत्म्यानें भरलेला निरोप आपण ऐकू व त्यापासून आपणांस आत्मिकलाभ प्राप्त करून घेऊं.

नंतर उइमेन बोर्डाचे सेक्रेटरी मिस ल्यामसन ह्या उठल्या. व त्यांचें मराठी भाषांतर करण्यासाठीं रे० आनंदराव हिवाळे साहेब हेही उभे राहिले. प्रथम त्यांनीं आभारदर्शकपर भाषण केल्यावर अमेरिकन उइमेन बोर्डाची मोटक माहिती सांगितली. नंतर देशपर्यटनाच्या अवलोकनाची संक्षिप्त माहिती दिली. व सांगितलें कीं, अमेरिकेंतील प्रयत्न व इंडियांतील प्रयत्न जो ख्रिस्ताच्या संबधानें चालू आहे तो एकच आहे असें माझ्या पहाण्यांत येत आहे. यावरून मला फारच आल्हाद वाटतो. तुमचा हा मोठा समाज पाहून मला मोठा आनंद झाला आहे.

खरोखर आम्ही सर्वांनीं ख्रिस्ताच्या राज्याच्या वृद्धिसाठीं नेटानें व काळजीपूर्वक यत्न केला पाहिजे. हें आम्हा प्रत्येकाचें कर्तव्य कर्म आहे. अशाप्रकारें उत्तेजनपर, चित्तवेधक व अंतःकरणास द्रव आणणारें भाषण केलें. व तेणेंकरून सर्वांस अतिशयित संतोष झाला. नंतर एक गाणें होऊन व आशिर्वाद मागून प्रसंग विसर्जन झाला.

ज्यानेवारीं २९ सोमवार या रोजीं सकाळीं नऊ वाजतां स्टेशनस्कुलांत एक स्पेशल त्यांच्या साठीं प्रसंग भरविला. प्रथम एक गाणें गावून नंतर पाळकांनीं कांहीं शास्त्रभाग वाचला, व प्रार्थना करून कामास आरंभ झाला.

पहिल्यानें पाळकांनीं थोडक्यांत भाषण केल्यावर मग ज्यांच्या कडे भाषणें दिलीं होतीं त्यांस बोलण्यास वेळ दिला.

भाषणांचें चार भाग केले होते. ते येणेंप्रमाणें:—
पहिला भाग:— मंडळीची मोटक माहिती सांगणें. हा भाग पाळकांकडे होता. दुसरा भाग:— डिस्ट्रिक्ट प्रांतांतील कामाची माहिती. मिसेस. हिवाळे यांच्याकडे होता.

तिसरा भाग :— शहरांतील स्त्रियांत उपदेशाचें काम कसें चालते याची हकिगत मिसेस् ढाळवाणी यांच्याकडे होती.

चवथा भाग :— बायबल उइमेनचें आसपासच्या खेड्यांत व शहरांत उपदेशाचें काम कसें चालते याची हकिगत मिसेस पवार यांच्याकडे होती

सदर्हु बोलणारांनीं बराच परिश्रम करुन आपापले विषय १ कागदावर लिहून आणिलें होतें. पहिल्यानें आमचे प्रिय पाळक यांनीं अतिशय श्रम करुन मंडळीची त्रोटक माहिती इंग्रजींत लिहून आणिली होती. ती सर्व हकिगत वाचून दाखविली व यांवरुन सर्वांस परम आनंद वाटला. दुसऱ्यानें मिसेस् हिंवाळे यांनीं आणिलेली हकिगत मुखोद्गत बोलून दाखविली. तीही सर्वांस आवडली. तिसऱ्यानें मिसेस् ढाळवाणी यांनीं आपली हकिगत मराठींत वाचून दाखविली ही हकिगत फारच चित्तवेधक असून सर्वांस संतोष देणारी होती.

चवथें मिसेस् पवार यांनींही आपली हकिगत इंग्रजींत लिहून ती तशीच वाचून दाखविली. व तीही सर्वांस फारच पसंत पडली. ह्या गोष्टी होत असतां मधून मधून गवयानें शिकविलेलीं गाणीं गाण्यांत आलीं. नंतर पाहुणी मंडळीस पुष्पहार घालण्यांत आले. या प्रसंगीं ढोरवाड्यातील हिंदु मुलामुलींनी सुंदर एक गायन गवयाच्या साह्यानें गाईलें. व स्वतःच्या हातानें बनविलेला एक एक सुंदर मूरमूऱ्यांचा हार पाहुणे मंडळीस दिला. यावरुन पाहुण्यांस व जमलेल्या मंडळीस फारच आनंद वाटला.

शेवटीं आभारदर्शक भाषण प्रथम उइमेन बोर्डाचे सेक्रेटरी मिस् ल्यामसन यांनीं केले. तसेंच खजीनदार मिस् ड. यांनींही तेंच भाषण केलें. व नंतर आशिर्वाद मागून प्रसंग विसर्जन झाला. मग सर्व मंडळी बंगल्यावर गेली व तथें मिस कोनबाई यांनीं मास्तर, शिक्षका, उपदेशक, किंडरगार्डनचा वर्ग, उपदेशकीन बाया दोन पाहुण्या मिस न्युजंट बाईसाहेब, हिंवाळे साहेब व त्यांचे कुटुंब यासहीत चित्रें काढिली. या प्रकारें या तिन दिवसातील सर्व प्रसंग अगदीं आनंदानें पार पडून सर्वांस अति लाभप्रत झाले.

फेब्रुवारीं १३।२।१२ मंगळवार या रोजीं स्टेशनस्कूलांत प्रार्थनेची उपासना झाल्यानंतर मंडळीच्या कांहीं कामासाठीं मंडळीची बैठक बसली. त्यावेळेस तिच्याकडून जीं कामें झालीं तीं येणेंप्रमाणें:— पहिलें काम साबिनाबाई साळवे, माळनबाई साळवे आणि सुंद्राबाई पंडित यांचे नगरमंडळीहून परवानगी पत्र आलें, तें मंडळींत वाचून दाखविलें. नंतर मि॰ हणमंतराव गायकवाड यानें सुचना दिली व त्याला अनुमोदन मि॰ यशवंतराव सूर्यवंशी यानें दिलें व बहुमतानें त्यांस मंडळींत घेण्यांत आलें. तसेंच गोजराबाई तुकाराम कसाब यांचेही सोलापूर मंडळीकडुन परवानगी पत्र आलें व तिलाही बहुमतानें मंडळींत घेण्यांत आलें.

दुसरें काम— स्ट्याडींग कमेटी मंडळीच्या बहुमत्तानें स्थापन्यांत आली. त्यांतील सभासद दोन कारभारी म्हणजे मि॰ हणमंतराव गायकवाड व मि॰ शामुवेल चिटनीस मिसेस् शेवंतीबाई पवार खजिनदार मि॰ भाऊराव गडगे व यांच्या मदतनीस मि॰ यशवंतराव सूर्यवंशी, पाळक व मि॰ डेविडराव ढाळवाणी व या कमेटीवर मिस् न्युंजर सर्वदा हजर रहातील असें मंडळीच्या बहुमत्तानें ठरविण्यांत आलें.

तिसरें काम — मंडळीपुढें नवीन कारभारी नेमण्यासंबंधानें विचार आला. त्याप्रसंगी एथील उभयता मिशनेरींनी मंडळीस अशी मसलत दिली कीं, त्या अर्थी भिंबकरावाचें सतत सातान्यांत राहणें होणार नाहीं व लवकरच त्यांना कामापरत्वें स्थलांतर करणें जरूर होणार आहे त्याअर्थी त्यांच्या ऐवजी दुसरा कायमचा व येथें राहणारा कारभारी मंडळीनें निवडावा. करितां बहुमतानें शाम्युएल सोअंस यांची कारभारी पणाच्या कामावर नेमणूक करण्यांत आली.

मा॰ २४/२/१२ शनिवार रात्रीं सुमारें ७ वाजतां स्टयाडींग कमेटी मिस न्युजंट बाईसाहेब यांच्या बंगल्यावर भरली त्या प्रसंगीं मि. सोअंस खेरीज करून सर्व मेंबर हजर होते.

प्रथम मंडळीचे पाळक हे अध्यक्षस्थानीं विराजमान होऊन प्रार्थना केली. नंतर कामास आरंभ झाला- — पहिलें काम पाळकांच्या घराला सफेती देण्याविषयीं ठरविलें. व त्या सफेती करितां चुन्याळा जो कांहीं खर्च लागेल तो मात्र मंडळीच्या खजीन्यातून द्यावा व मंडळीतील भावांनीं तें कार्य स्वतः अंगमेहनतीनें करावें असें ठरविलें.

दुसरें काम — स्टयाडींग कमेटी ही महिन्यातून एकवेळ भरवावी असें ठरविलें.

मार्च १० /१९१२ रविवार या दिवशीं डेझी दाविदराव ढाळवाणी, जेम्स सुज्ञानराव ढाळवाणी, भास्कर प्रसादराव मकासरे, शारदा प्र. मकासरे, उषा प्रसादराव मकासरे अश्या पांच बाळकांचा बाप्तिस्मा रे. एच.जी. बिसेल यांनीं केला.

पूर्वी ठरविल्या प्रमाणें ता २३ मार्च १९१२ या रोजीं बाईसाहेबांच्या बंगल्यावर स्टयाडींग कमेटीची बैठक बसली. त्या प्रसंगी स्टयाडिंग कमेटीचे प्रत्येक मेंबर हजर होते. आरंभी पाळकांनी प्रार्थना केली नंतर कामास आरंभ झाला. प्रथम मागील स्टयाडिंग कमेटीच्या बैठकीतील हकीगत वाचण्यात आली व ती सर्वानुमतें पसंत झाली-

स्टयाडिंग कमेटीपुढें असा प्रश्न आला कीं, मंडळीनें स्टयाडिंग कमेटीला आपल्या सर्व कार्यासाठीं निवडलेले आहे, त्या अर्थी मंडळीनें स्टयाडिंग कमेटीस सर्व लहानथोर कामांचा हक्क द्यावा. या संबंधानें अनेक रितीनें चर्वीचर्वण झालें व मिस कोनबाईनें अलिकडील मंडळ्यांची व्यवस्था अमेरिकेमध्यें कश्या रितीनें चालते याविषयींची ठोकळ व उपयुक्त माहिती दिली. व ही माहिती स्टयाडिंग कमेटीस ग्राह्य होऊन अश्या ठरावांचा प्रश्न मंडळीपुढें मांडावा असें ठरविलें. तो ठरावाचा प्रश्न येणें प्रमाणें —

ज्या अर्थी मंडळीनें आपली कामें करण्यासाठीं ही कमेटी नेमली आहे त्या अर्थी सर्व प्रश्नांच्या विचार व निकाल या कमेटीनेंच करावा व लावावा हें योग्य आहे कारण ही कमेटी पूर्णपणें विचार करुन व सर्व बाजू लक्षांत घेऊन व लोकांची मसलत घेऊन जें योग्य तेंच ठरवते. हल्ली सर्व कॉंग्रगेशनल मंडळ्यांत असलीच व्यवस्था होत आहे, म्हणून येथून पुढें आपल्याही मंडळीचीं सर्व कामें स्टयाडींग कमेटींतच ठरतील. व इतर भावांचें कांहीं म्हणणें असल्यास तें सेक्रटरी मार्फत विचार करण्यास या कमेटी पुढें येत जाईल.

२ रें काम पाळकांच्या घरासंबधानें- सध्या पाळक ज्या घरांत रहातात त्या घराची मुदत येत्या सप्तेंबरमध्यें पूर्ण होणार आहे व लौकरच तें घर पाळकास सोडावें लागेल म्हणून स्टयाडिंगकमेटीनें बाईसाहेबांच्या सूचनेवरुन असें ठरविलें आहे कीं, पाळकासाठीं दुसरें एखादें सोईस्कर घर पहाण्याच्या तजविजींत असावें.

३ रें काम- सध्या जो देवळाचा रखवालदार आहे तो लवकरच आपल्या ठिकाणीं जाणार आहे करितां देवळाच्या रखवालदारी साठीं दुसऱ्या मनुष्याची योजना करावी.

४ थें. खजीन्याच्या संबंधानें बाईसाहेबांच्या व्दारें फार चांगली मसलत स्टयाडींग कमेटीपुढें आली ती येणेंप्रमाणें- लहान लहान पॉकिटें तयार करुन त्या पॉकीटामध्यें प्रभूच्या मंडळीसाठीं जी कांहीं देणगी द्यावयाची आहे ती घालावी. व ती महिन्यातून एकदां तारांत टाकावी. म्हणजे खजीनदारांस घरोघरीं जाण्याचा व मागण्याचा त्रास होणार नाहीं. ही मसलत स्टयाडिंग-कमेटीस पसंत पडली व तत संबंधीं व्यवस्था करण्याविषयीं जबाबदारी बाईसाहेबांनीं आपणावर घेतली.

✓ स्टयाडींगकमेटीनें ज्या प्रश्नाच्या ठराव मंडळीपुढें मांडावा म्हणून ठरविलें होते त्या संबधानें पाळकानें ही गोष्ट मंडळीच्या सर्व सभासदास जाहीर केली आणि मंडळीची बैठक ता. २६ मार्च १९१२ मंगळवार या रोजीं व्हावी म्हणून अगाऊ कळविण्यांत आले. त्या प्रमाणें मंडळीची बैठक सदरहू तारखेस झाली व बहुमतानें असें ठरविण्यांत आलें कीं, ज्या अर्थी स्टयाडींग कमेटी मंडळीच्या लहानथोर कार्यासाठीं प्रतीनीधी या नात्यानें निवडली आहे त्या अर्थी स्टॅयाडिंग कमेटीनें जो प्रश्नाच्या ठराव मंडळीपुढें ठेवला तो बहुमतानें पसंत झाला.

मार्च ३१/१२ रविवार या दिवशीं भास्कर दानियल दिवे जॉनसन दानियल दिवे व कुसुमावती दानियल दिवे कर्नेलियस दानियल दिवे अश्या चार बाळकांचा बापतिस्मा रे॰ प्रसादराव विठोबा मकासरे यांनीं केला.

चिटणीस
शेवंतीबाई पवार.

डिसेंबर ३०/११ शनिवार या दिवशीं जमुनाबाई सातारा येथें मरण पावली.

चिटणीस
शेवंतीबाई पवार

ता.१५ जून १९१२ शनिवार दिवशीं ७॥ वाजतां मिशन बंगल्यांत स्टयाडिंग कमेटीची बैठक बसली. त्या प्रसंगीं स्टयाडिंग कमेटीचे सर्व सभासद हजर होते. आरंभी रितीप्रमाणें पाळकांनीं शास्त्र भाग वाचला व मि. डेविडराव ढालवाणी यांनीं प्रार्थना केली. व कामास सुरवात झाली. पहिल्यानें ता २३ मार्च या रोजीं जी स्टयाडिंग कमेटीचीं कामें झालीं होतीं, त्यांचा रिपोर्ट चिटणीसानें वांचून दाखविला. व वांचल्या नंतर तो बहुमत्तानें पसंत करण्यांत आला. ता २३ मार्च १९१२ या रोजीं जीं कामें अपुरी झालीं होतीं, तीं प्रथम स्टयाडिंग कमेटीच्या पुढें विचार करण्यासाठीं मांडली.

१लें काम — पाळकाच्याघरासंबंधानें कांहीं तजविज झाली आहे कीं, काय असा प्रश्न पुढें आणला. तथापि त्यासंबंधानें कांहीं तजविज झालेली दिसून आली नाहीं म्हणून या कामीं कमेटी निवडण्यांत आली. या कमेटीमध्यें मि. ढालवाणी व मि. सोन्स यांची नेमणूक स्टयाडिंग कमेटीच्या तर्फे झाली व त्यांनीं ५ रु पर्यंतचें पाळकास दुसरें घर मिळेल अशी व्यवस्था पहावी असें ठरविलें.

२रें काम — देवळाच्या रखवालदारासंबंधानें प्रश्न पुढें आणला. एप्रील, मे, महिन्यांत कायमचा रखवालदार मिळणें कठीण दिसूं लागलें. म्हणून सन्मान्य बाईसाहेबांनीं मिशनाची इमारत या नात्यानें तात्पुरती जुन्याच रखवालदाराची नेमणूक केली होती. व या प्रसंगीं त्यांनीं स्टयाडिंग कमेटीला असें सांगितलें कीं, कायमचा रखवालदार करणें असल्यास कमेटीकडे आहे. तथापि या कामीं माझी अशी मसलत आहे कीं, आबाबाईला देवळाच्या कामासंबंधानें जबाबदारी न देतां सर्वपरी मि. बाबाजी काकडे यास जबाबदार धरून आपलीं सर्व कामें करवून घ्यावीत. व अश्या रितीनें माझे व बाबाजी काकडे यांचे खाजगी भाषण झालें आहे.

करितां स्टयाडिंग कमेटीनें आपल्या मंडळीच्या दोन कारभाऱ्यांस त्यांच्याकडे पाठवून असें विचारावें कीं, येथून पुढें इतर कोणास जबाबदार न धरितां तुम्ही देवळाच्या कामासंबंधीची सर्व जबाबदारी घेऊन निघतील तीं कामें करण्यास तयार असल्यास तुम्हांलाच त्या कामीं नेमावें असा स्टयाडिंग कमेटीचा ठराव झाला आहे. करितां ही मसलत सर्वानुमत्तें पसंत झाली व या कामीं मंडळीच्या दोन कारभाऱ्यांस सदर्हू विचारपूस करण्यास नेमण्यांत आले.

३रें काम. — खजीनदारासंबंधानें — पूर्वीचे खजीनदार मिशनाच्या कामावर नसल्यामुळें त्यांना आपल्यागावीं जाणें भाग पडलें. तथापि त्यांनीं असें वचन दिलें होतें कीं, मी माझ्या गांवाहून दरमहा येऊन खजीन्याचें काम करीन. व बाकीच्या काळांत आमच्या सन्मान्य मिस कोनबाई मंडळीसाठीं मदत करतील. म्हणून त्यानें आपला सर्व खजीन्यांचा चार्ज मिस कोनबाईस दिला. व त्यांनीं उत्तम रितीनें मंडळीच्या खजीन्याचीं व्यवस्था आजपावेतों ठेविली आहे.

पूर्वीच्या खजीनदाराला कांहीं अडचणीमुळें दिलेल्या वचनाप्रमाणें वागतां आलें नाहीं व त्यानें रितीप्रमाणें मंडळीच्या खजीनदाराचा राजीनामाही दिला नाहीं यावरून असा समज झाला कीं, खजीन्याची जबाबदारी घेण्यास ते येतील. अश्या समजूतीवर आजपर्यंत हें काम चालत आलें आहे. परंतु आतां कोणीतरी खजीनदार असावा हा प्रश्न पुढें आला व स्ट्याडिंग कमेटीनें असें सुचाविलें कीं, मंडळीच्या कामदारांची नेमणूक मंडळीच करीत असते. या नेमाप्रमाणें खजीनदाराची निवड करण्याचा विचार मंडळीपुढें मांडावा असें ठरलें.

४ थें काम— आबाबाईचा अर्ज चिटणीसानें वांचून दाखविला. यासंबंधानें बराच खल झाला. व शेवटीं असें ठरविण्यांत आलें कीं, आबाबाईच्या अर्जाचें उत्तर द्यावें तें येणेंप्रमाणें— अर्जदार अबाबाईस स्ट्याडिंग कमेटीचे सलाम. वि॰ आपला पगारासंबंधाच्या अर्ज स्ट्याडिंग कमेटीस मिळाला. व कमेटीनें असें ठराविलें आहे कीं, आपला गेल्या वर्षाचा तीन ३ महिन्यांचा पगार मंडळीस देता येणार नाहीं. कारण आपल्याला काम सोडण्याविषयींची योग्य वेळीं नोटीस देण्यांत आली होती. व फिरून या कामीं आपला मुलगा बाबजी काकडे याची नेमणूक करण्यांत आली आहे. ही गोष्ट आपणांस व स्ट्याडिंग कमेटीस संतोषकारक आहे.

५ वें काम— मि॰ केचरलॉल व मि॰ बाघळा पुंजाजी व मि॰ गोविंदराव भागवत आणि सूज्ञानराव ढालवाणी यांचे अर्ज वाचण्यांत आले. या अर्जतील प्रत्येक मुद्याविषयीं स्ट्याडिंग कमेटीनें बारीक रितीनें चर्चा केली. ती सर्व चर्चा सविस्तर लिहिण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. तथापि संक्षिप्त रितीचा सारांष व मुख्य मुद्दे लिहीते ते येणेंप्रमाणें.— या अर्जामध्यें मुख्य दोन मुद्दे दिसून येतात.
१ला मुद्दा — ~~मंडळीचीं~~ मिशनाचें काम याविषयीं सन्मान्य बाईसाहेब यांची मसलत अशीं आहे कीं, मिशनेरी या कामाची योजना व व्यवस्था करीत आहेत आणि या पूर्वी केली आहे व त्यासंबंधीं स्ट्याडिंग कमेटीस विचार करितां येत नाहीं.
२ रा मुद्दा.— मंडळीचीं कामें— कबरस्थानाविषयींचा विचार यासंबधानें स्ट्याडिंग कमेटीचें असें म्हणणे आहे कीं, कबरस्थानाची योग्य व्यवस्था व्हावी म्हणून पाळकानीं हा विचार मंडळीपुढें ठेवावा व त्याविषयीं मंडळीतील भावांनीं खल करावा. करितां आठ दिवस अगोदर पाळकांनीं नोटीस द्यावी असें ठराविलें.

मंडळीतील तरुणांला मंडळीमध्यें कांहीं विशेष भाग देण्यांत आल्यानें तरुणांला भक्तीला येण्यास स्फूर्ती प्राप्त होईल अशी व्यवस्था करावी. या संबधानें ही बराच खल झाला, व विचारा अंतीं असें स्पष्ट झालें कीं, तरुणांसाठीं मंडळीची यत्न करणारी सभा व प्रार्थनेची मंडळी

व शाबाथ शाळा या तीन संस्था तरुणांस सेवा करण्यासाठीं व भक्तीची स्फूर्ती प्राप्त होण्यासाठीं योग्य व पुरेशीं साधनें आहेत.

चिटणीस
शेवंतीबाई पवार.

जून ता. २५ मंगळवार या रोजीं प्रार्थनेची पोथी झाल्यानंतर विशेष कामासाठीं स्टेशन स्कूलांत मंडळी भरली. प्रथम अध्यक्षानें प्रार्थना केल्यावर कामास आरंभ झाला. प्रथम अध्यक्षाने थोडक्यांत भाषण केले. नंतर बाईसाहेबांनीं मंडळीच्या खजीन्यांत किती शिल्लक आहे हें सांगून जर कोणाला पुस्तकें तपासण्याचें अगत्य असेल तर पाहिजेल त्यानें पुस्तकें तपासावीत. तथापि हिसेब चोख व बरोबर असल्यामुळें कोणालाही पुस्तकें तपासण्याचें अगत्य वाटलें नाहीं.

नंतर अध्यक्षानें खजीनदार असावा असा प्रश्न मंडळीपुढें आणला. तेव्हां मि. हणमंतराव गायकवाड यानें रे. हरिबा गायकवाड हे खजीनदार असावेत अशी सूचना पुढें आणली. त्याला मि. भागवत मगर यानें अनुमोदन दिलें. नंतर दुसरी सूचना मि. कुंडलीक कांबळे यानें मि. यशवंत राव सूर्यवंशी हे खजीनदार असावेत अशी सूचना केली व या सूचनेला मि. बळभीम लोंढे यानें अनुमोदन दिले.

मग अध्यक्षानें प्रथम दुसरी सूचना पुढें आणून बहुमत घेतलें परंतु याला बहुमत कमी पडलें; नंतर पहिली सूचना पुढें आणली तथापि ह्या सूचनेला दुसरीपेक्षां बहुमत ज्यास्त असल्यामुळें बहुमतानें रे. हरिबा गायकवाड यांना खजीनदार नेमण्यांत आलें.

दुसरी गोष्ट कबरस्थानाची व्यवस्था या संबंधानें होती. कबरस्थानाची व्यवस्था करण्याकरितां स्टयांडिंग कमेटीनें एक कमेटी नेमली होती. त्यांत मि. दाविदराव ढाळवाणी व मि. सुज्ञानराव ढाळवाणी हे होते. त्यांनीं याविषयीं व्यवस्था पहावी असा प्रश्न मंडळीपुढें आणला. त्यावेळेस मि. भागवत मगर यानें असें सांगितलें कीं, जर ही कमेटी स्टयांडिंग कमेटीनें नेमली तर ती आम्हालाही मान्य आहे. मग बहुमतानें असें ठरलें कीं, या कमेटीनें सदर्हु कामाची व्यवस्था करून नंतर मंडळीस रिपोर्ट करावा.

तिसरी गोष्ट — हिशेब तपासनीस. मि. दास हे हिशेब तपासनीस आहेत पण ते रजा घेऊन परगांवीं गेलें असल्यामुळें त्यांच्या जागीं एक तात्पुरता तपासनीस मि. यशवंतराव सूर्यवंशी हें असावेत अशी सूचना मि. हणमंतराव गायकवाड यांनीं केली व त्याला अनुमोदन मि. बळभीम लोंढे यानें दिले. व बहुमतानें मि. सुर्यवंशी यांना हिशेब तपासनीस नेमिलें. शेवटीं अध्यक्षानें प्रार्थना करून सभा बरखास्त झाली.

मं. चिटणीस
शेवंती एस. पवार.

ता. २९ शनिवार १९१२ या रोजीं मंडळीची स्टयाडिंग कमेटी मिशनाच्या बंगल्यांत सुमारे ६ वाजतां भरली. त्या प्रसंगी मि. डेविडराव ढालेवाणी खेरीज करून स्टयाडिंग कमेटीचे सर्व सभासद हजर होते. प्रथम अध्यक्षानें रितीप्रमाणें शास्त्र भाग वांचून प्रार्थना केली. व त्यानंतर कामास सुरुवात झाली. प्रथम ता. १५ जून १९१२ या रोजीचा स्टयाडिंग कमेटीच्या बैठकीचा रिपोर्ट वांचण्यात आला व तो सर्वानुमतें पसंत केला.

या बैठकीच्या वेळीं जीं जीं कामें कमेटीस सोपून दिली होती त्यांच्या रिपोर्ट देण्यासाठीं अध्यक्षानें कमेटीस विचारिलें.

पहिली कामिटी — मि. हणमंतराव व मि. सोन्स यांस देवळाच्या रखवालदारास स्टयाडिंग कामिटीच्या निरोप कळविण्यास सांगितले होते. त्याप्रमाणें त्यांनीं आपलें काम बजाविलें व स्टयाडिंग कामिटीनें या कमेटीच्या तर्फे जी अट देवळाच्या रखवालदारास केली होती ती त्यानें कबूल केली. करितां देवळाच्या रखवालदारास कायमच्या मंडळीच्या कामगार करण्याबद्दलच्या प्रश्न पुढें ठेवला व यासंबंधानें बराच खल झाला व शेवटीं बहुमतानें असें ठरलें कीं, जोंपर्यंत त्याचे वर्तन व काम योग्य आहे तोंपर्यंत तो मंडळीच्या देवळाच्या कामदार राहू शकेल. अशया अर्थाचें त्यांस उत्तर पाठवावें असें ठरलें. व त्याची देवळाच्या कामगिरीवर नेमणूक करण्यांत आली.

पाळकाच्या घरासंबंधाच्या कमेटीचा रिपोर्ट. त्या कमेटिनें असा रिपोर्ट केला कीं, अद्यापि घराचा शोध लागला नाहीं करितां स्टयाडिंग कमेटीनें या कमेटीस घराचा शोध करण्यासाठीं आणखी दिवस द्यावेत. त्याप्रमाणें ही गोष्ट सर्वानुमतें मान्य झाली.

कबरस्थाना संबंधाचा प्रश्न पुढें आला त्यासंबंधानें थोडासा खल झाला. तथापि स्टयाडिंग कामिटीनें जी कमेटी निवडली त्याच कमेटीची नेमणूक मंडळीनेही केली. व या कमेटीनें मंडळी त्यासंबंधानें शोध व माहिती मिळवून मंडळीस रिपोर्ट द्यावा व मंडळीनें त्याविषयीं विचार बेत ठराव करावेत असें ठरलें. शेवटीं अर्जदारांची उत्तरें देण्याविषयींच्या कच्चा खर्डा स्टयाडिंग कमिटीनें पास करावा म्हणून पुढें ठेवला. तीं उत्तरें येणेंप्रमाणें —

(१) मंडळींतील ऐक्यता हा प्रश्न फार मोठा आहे. ऐक्यता एकदम घडवून येत नाहीं किंवा एकदोघांच्याच साह्यानें ती होईल असें नाहीं. पुढारी या संबंधानें खटपट करीत आहेत. सर्व बंधूंनीं त्यांस मदत केल्यास इष्टफल प्राप्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं.

(२) देवळामध्यें ईश्वरभक्ति फलदायक होण्यास पाळक योग्य उपायांची योजना करीत होते व करीत आहेत.

(३) मंडळीच्या हिशोबाची चोख व्यवस्था लावण्यांत आली आहे व इतर कामकाजाची व्यवस्था हळू हळू लागत आहे.

(४) सोनापुराची व्यवस्था बरोबर नाहीं हें कमेटीच्या लक्ष्यांत येऊन चुकलें आहे. व त्यासाठीं स्वतंत्र कमेटी नेमून लवकरच समाधानकारक व्यवस्था लागेल अशी आशा आहे.

(५) देवळाच्या बाहेर उपदेशाचें काम शक्य तेवढ्या ठिकाणीं चालू आहे.

(६) मागासलेल्या लोकांसाठीं खटपट व योजना चालू आहेत व या बाबीमध्यें इत्तर ख्रिस्ती बंधुंनीं सुद्धां मदत करावी.

(७) चिटणीसाची वार्षिक नेमणूक मंडळीनें केली आहे व त्यासंबधानें कमेटीला कांहीं करितां येत नाहीं.

(८) आपल्या तरुणांनीं भक्तीप्रसंगाविषयीं कळकळ बाळगावी व त्यांस उत्तेजन व्हावें म्हणून त्यांस मंडळीची यत्नकरणारी सभा शाबाथ शाळा व प्रार्थनेची मंडळी ही तिन साधने आहेत

याप्रमाणें प्रत्येक प्रश्न व उत्तर यांचा खल होऊन व यांतील कांहीं शब्द व वाक्य खेरीज करून सर्वानुमतें तीं उत्तरें पास करण्यांत आली. व या प्रमाणें अर्जदारांस चिटणीसानें उत्तरें पाठवावीं म्हणून ठरविलें.

ता. १४/७/१९१२ या रोजीं मि० बळभीम लांडगे याच्या मुलगा विनायक बळभीम लांडगे याच्या बाप्तिस्मा रे० प्रसादराव मकासरे यांनीं केला. आणि या बाळाचा जन्म ता ६ मार्च १९१२ या रोजीं झाला.

ता. २३/७/१९१२ मंगळवार रोजीं पाळकांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें प्रार्थनेची पोशी झाल्यानंतर मंडळीची बैठक बसली. नेमाप्रमाणें पाळकानें प्रार्थना केली व प्रार्थना झाल्यावर चिटणीसानें मि० त्रिंबकराव यांचे परवानगी पत्र सातारा येथील मंडळीपासून मिळावें म्हणून त्यांनीं पाठविलेलें विनंती पत्र वाचून दाखविलें. सर्वानुमतें असें ठरविलें कीं, या विनंतीपत्रास असें उत्तर पाठवावें कीं, कांहीं दिवसांनीं आम्ही विचार करून उत्तर पाठवूं.

दुसरी गोष्ट. — स्मशानपूरी संबंधाचा रिपोर्ट नेमलेल्या कमिटीकडून मंडळीला करण्यांत आला. तो असा होता कीं, स्मशानपूरीची दुसरी जागा जी आहे ती संबंधानें मामलेदारास अर्ज करावा लागेल व त्यासंबधानें बरीच खटपट केल्या शिवाय ती जागा प्राप्त होणार नाहीं. व आपली जुनी स्मशानपूरी इची यथायोग्य व्यवस्था व बंदोबस्त करण्यासाठीं २०० शें रुपायाचा खर्च लागेल. हा रिपोर्ट ऐकल्यावर सर्वानुमतें असें ठरलें कीं, मंडळीला अनेक कामें करावयाची आहेत व ही ही गोष्ट खर्चाची आहे असल्यामुळें त्यासंबंधानें मंडळीनें विचार करावा.

ता. २७ आगस्ट १९१२

या रोजीं मि० बळवंतराव सिदोबा गिरी यांना सर्वानुमतें सातारा मंडळीमध्यें घेतले.

ता ३।९।१२ या रोजीं मि॰ विश्रामजी मिरपगार यांना सर्वानुमतें सातारा मंडळीमध्यें घेतलें.

ता. ६।७।१२ या रोजीं पाळकांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें मंडळीची बैठक होणार होती तथापि सन्मान्य मिसेस ली मडमसाहेब व त्यांचीं अपत्यें यांच्या प्रित्यर्थ स्वागतपर एक प्रसंग मं. प्रार्थनेच्या वेळीं करण्यांत आला. हा प्रसंग फार गंभीर व गोड व समाधान कारक असा झाला. व ईश्वरानें आपल्या संकेता प्रमाणें त्यांस देवराज्याची सेवा करण्यासाठीं परत आणलें. ही जी मंडळीची प्रार्थना प्रभूजवळ होती ती पूर्ण झाली.

हा गंभीर प्रसंग झाल्यामुळें मंडळीच्या पुढाऱ्यांस असें वाटलें कीं, अशा प्रसंगीं मंडळीची बैठक न होता ता. ८।७।१२ गुरुवार रोजीं सायंकाळीं ५ वाजतां कामाकाजाची बैठक करावी. हें ठिक होईल व चिटणीसानें नोटीस फिरविल्यास सदर्हू रोजीं काम करण्यांत यावें.

या सूचने अन्वयें ता. ८।७।१२ या रोजीं सायंकाळीं ५ वाजतां स्टेशनस्कूलांत मंडळीच्या कामाकाजाची बैठक भरविण्यांत आली. आरंभी पाळकांनीं प्रार्थना करुन कामास आरंभ केला. तो येणेंप्रमाणें—.

पूर्वीच्या बैठकीचें काम सुरळीतपणें पार पडलें नाहीं याबद्दल पाळकानें प्रथम दिलगीरी प्रदर्शित केली. तसेंच मि॰ दाविदराव दाळवाणी यांनींही आमचा व सन्मान्य बाईसाहेब यांचा व आपला परस्पर गैरसमज झाल्यामुळें दिलगीरी दाखविली. नंतर अशी सूचना करण्यांत आली कीं, पूर्वीच्या कामकाजाच्या बैठकींत मंडळीनें ज्या खजीनदाराची नेमणूक केली होती ती नेमणूक ते स्वत: हजर नसल्यामुळें रद्द करण्यांत यावी. व दुसरी सूचना मि॰ यशवंतराव सूर्यवंशी मंडळीचे खजीनदार होण्याविषयीं करण्यांत आली. व बहुमत्तानें मि॰ यशवंतराव हे मं. खजिनदार नेमण्यांत आले.

दुसरें काम— मि॰ त्रिंबकराव डिंबाळे व मि॰ बाबूराव भोसले यांची परवानगी पत्रें वाचण्यांत आली. व बहुमतानें असें ठरविलें कीं, त्यांना कोरेगांव मंडळींत मिळण्याची परवानगी द्यावी. व त्या संबंधानें नेमाप्रमाणें चिटणीसानें त्यांना पत्रें पाठवावींत.

पाळकांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें आगस्ट ता. २७।१९१२ या रोजीं मंडळीची बैठक झाली त्या बैठकीमध्यें असें ठरविण्यांत आलें कीं, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारच्या दोन्ही वेळच्या जमा शत उत्सवासाठीं मंडळीच्या खजीनदारानें मिसेस ली यांच्या तर्फे पाठवून द्याव्यात. २ री. गोष्ट. शब्बाथ शाळेच्या शाळापत्रिके बद्दलची २८ रुपायांची वर्गणी मंडळीच्या खजिन्यांतून शब्बाथ शाळेच्या शाळापत्रिकेच्या चालकांस पाठवावी.

३ री गोष्ट.— मि॰ बळवंतराव सिदोबा गिरी यांचे परवानगी पत्र वडाळे मंडळीच्या चिटणीसाकडून आले होते ते मंडळीपुढें वाचण्यांत

आले. व बहुमताने सातारा येथील मंडळींत सभासद होण्याच्या ठराव पास होऊन त्यास मंडळीमध्यें घेतलें.

ता. ३ सप्टेंबर १२ या रोजीं मंडळीची बैठक भरली होती. पाळकानें प्रार्थना करून कामास आरंभ केला. प्रथम मि. विश्रामजी भिरपगार यांचे परवानगी पत्र चिटणीसानें वांचून दाखविलें व त्यासही सातारा मंडळीचे सभा सभासद होण्याच्या ठराव पास होऊन मंडळीमध्यें घेतलें.

२ री गोष्ट. देवळाच्या रखवालदारानें खजिनदाराच्या तर्फे एक अर्ज पाठविला होता परंतु तो मंडळीपुढें वांचला नाहीं. कारण पाळकानें मसलत दिली कीं, कांहीं दिवसांमागें मंडळीनें ठरविलें कीं, मंडळीची बहुतेक कामें स्टयाडिंग कमेटीनें करावींत. या ठरावाप्रमाणें जेव्हां स्टयाडिंग कमेटीची बैठक भरेल तेव्हां या अर्जाचा निकाल होईल असे ठरविलें.

चिटणीस
शेवंतीबाई पवार

ता. ८/१०/१९१२ मंगळवार रोजीं पाळकांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें मंडळीची बैठक प्रार्थनेची मंडळी झाल्यानंतर स्टेशनस्कूलांत भरली. आरंभी पाळकांनी प्रार्थना करून कामाला सुरवात झाली. प्रथमतः मि. गंगारामजी गायकवाड यांचे सोलापूर मंडळीपासून आलेलें परवानगी पत्र वांचण्यांत आलें. आणि सर्वानुमतें असें ठरलें कीं, मि. गंगारामजी गायकवाड व त्यांचे कुटुंब सौभाग्यवती प्रज्ञाबाई गायकवाड यांस मंडळीमध्यें घ्यावे.

२ रें काम — मि. सोन्स व मि. डेविडराव ढाळवाणी यांनी आपल्या स्टयांडिंग कमेटिच्या मेंबरशीप सोडण्यासंबंधानें राजीनामे पाठविलें होते ते वाचण्यामध्यें आले. मि. सोन्स यांची योग्य कारणें मंडळीला दिसल्यावरून त्यांचा राजीनामा पत्करण्यांत आला व त्यांच्या ऐवजी स्टयाडिंग कमेटीचे मेंबर मि. गंगारामजी गायकवाड यांची नेमणूक मंडळीनें केली.

दुसरा राजीनामा यासंबंधानें मंडळीतील भावांनीं स्तब्धता दाखविली तरी त्यांचा राजीनामा याविषयीं कांहींच निकाल अद्यापि झाला नाहीं. करिता तो राजीनामा अद्यापि तसाच ठेवण्यांत आला आहे.

३ रें काम — सार्वजनिक ऐक्यांत आपल्या मंडळीनें सभासद व्हावें अशा संबंधाचा प्रश्न पुढें आला. त्यासंबंधानें बरीच वाटाघाट झाली व शेवटीं असें ठरलें कीं, मागेंच म्हणजे रे. ब्रुस साहेबांच्या कारकिर्दीत ही मंडळी स्थानिक-ऐक्य सभेला कां मिळाली नाहीं याचीं कारणें मिस न्युजरनें पत्रद्वारें सन्मान्य ब्रुस मडमसाहेबांला लिहून विचारावींत व त्यासंबंधानें माहिती मिळवावी. नंतर प्रार्थना होऊन सभा बरखास्त झाली.

चिटणीस
शेवंतीबाई पवार

ता.१३/१०/१९१२ रवीवार या रोजीं मि. गंगारामजी गायकवाड यांची मुलगी मधुमती गंगारामजी गायकवाड इचा बाप्तिस्मा रे. प्रसादराव मकासरे यांनी केला.

ता.८/१०/१९१२ मंगळवार रोजीं मि. गंगारामजी गायकवाड व सौभाग्यवती यशाबाई गायकवाड यांना सर्वानुमतें सातारा मंडळीमध्यें घेतलें.

ता.१५/१०/१२ या रोजीं चिटणीसानें जाहिरात फिरविल्याप्रमाणे मंगळवार रोजीं प्रार्थनेची बैठक झाल्यानंतर मंडळीची बैठक बसली. आरंभीची प्रार्थना झाल्यावर सन्मान्य बाईसाहेबांनी मंडळीपुढें असा प्रश्न ठेवला कीं, मला वाईहून असें पत्र आलें आहे कीं, ज्या अर्थी गेल्या वर्षी आमचे पाळक ह्या मिशनाच्या आइन्टसेशन कमिटीसाठीं गेले होते, व त्यांस बऱ्याच गोष्टी माहीत झाल्या आहेत त्या अर्थी मिशनाची अशी योजना आहे कीं, जुनेच प्रतीनिधी यंदाही पाठवावेत. या मिशनाच्या योजनेस अनुसरून बहुमत्तानें असें ठरलें कीं, यंदाही आमच्या पाळकांनी या आइन्टसेशन कमेटीसाठीं नगरास जावें. व त्यांच्या जाण्यायेण्याचा खर्च मंडळीने ८ रु द्यावा. शेवटीं प्रार्थना होऊन या वेळची बैठक संपली.

ता.१२/११/१९१२ मंगळवार रोजीं प्रार्थनेची बैठक झाल्यावर मंडळीची बैठक बसली. त्या वेळीं असें ठरविलें कीं, सन्मान्य डा. आबट व मिसेस आबट व मिस फ्यानसी यांच्या आगतस्वागतासाठीं मंडळीने ३ रु पर्यंत खर्च करून त्यांना फुलांची भेट द्यावी.

त्याप्रमाणे ता.१३/११/१२ बुधवारीं सायंकाळीं मंडळीतील अबालवृद्धांनी एकत्र जमून आलेल्या मिशनेरी पाहुण्यांचे आगतस्वागत रे. प्रसादराव मकासरे पाळकांच्या अध्यक्षते खालीं केलें.
याच वेळीं डा. आबट साहेबांनीं जमलेल्या मंडळीस "ख्रिस्त येशूचें चित्त होतें तसेंच तुमचेंही होवो" या वचनावरून फारच चित्तवेधक निरोप मंडळीस दिला. म्हणून मंडळीच्या वतीनें अभार मानण्यांत आले. शेवटीं डा. आबट साहेबांनीं आशीर्वाद दिला.

ता.११/११/१२ या रोजीं जसुदाबाईस देवाज्ञा झाली.

ता.१९/११/१२ मंगळवार या रोजीं पाळकांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें स्टेशनस्कूलांत मंडळीची बैठक बसली. आरंभीं प्रार्थना करून कामास सुरुवात झाली
१ ली गोष्ट - मि. डेविडराव दाळवाणी यांनीं कांहीं दिवसामागें स्टयाडिंगकमेटीला आपल्या सभासदपणाचा राजीनामा पाठविला होता. परंतु त्यांच्या त्या राजीनाम्यासंबंधानें पूर्वीच्या बैठकींत मंडळीनें विचार केला नव्हता म्हणून या रोजीं त्यांचा राजीनामा पत्करावा किंवा नाहीं ही गोष्ट मंडळीपुढें मांडली. आणि सर्वानुमतें असें ठरलें कीं, ज्या अर्थी त्यांनी राजीनामा पाठविला त्या अर्थी तो पत्करावा.

दुसरी गोष्ट यांच्या ऐवजी रे॰ हरिबा गायकवाड यांची स्टॅंडिंग कमिटीच्या सभासदासाठीं मंडळीनें नेमणूक केली.

३री गोष्ट - मि॰ सोन्स यांची कामानिमित्यें नगरास बदली झाली. व त्यांना कारभारीपणाचें काम करणें हें अशक्य आहे म्हणून त्यांच्या बदली मि॰ गंगारामजी गायकवाड यांना कारभारीपणाच्या कामासाठीं मंडळीनें निवडिलें.

४थी गोष्ट - प्रभूभोजनाच्या विधीसाठीं नवीन सेट सन्मान्य बाईसाहेबांच्या लिहीण्यावरून सन्मान्य ली मडम साहेबांनी बरीच खटपट करून व आपलें शद्ध खर्च करून फारच श्रमानें मिळवून आणला. या त्यांच्या परीश्रमानें मिळविलेल्या मोलवान देणगी बद्दल मंडळीनें त्यांचे फारच आभार मानिले. व या उभयता मिशनेरी बहीणींस अशी विनंती केली कीं, अमेरिकेच्या ज्या मंडळीनें आम्हासाठीं ही मोलवान देणगी दिली दिली आहे त्याबद्दल आपण आमच्या वतीनें त्यांना एक आभारदर्शक पत्र पाठवावें. शेवटीं रे॰ हरिबा गायकवाड यांनी प्रार्थना केली व ही बैठक आटोपली.

ता. २६/११/१२ मंगळवार या रोजीं पूर्वी नोटीस दिल्याप्रमाणें स्टॅंडिंग कमिटीची बैठक स्टेशनस्कूलांत भरली. आरंभी प्रार्थना झाल्यानंतर चिटणीसानें जुलै २८·१९१२ या रोजीची हकिगत वांचून दाखविली. ही हकीगत सर्वानुमत्तें पसंत झाली. नंतर अध्यक्षानें प्रथमत: स्मशानपूरीच्या खड्यासंबंधाच्या विचार स्टॅंडिंग कमेटीपुढें ठेविला. त्यासंबंधानें बराच खल झाला व शेवटीं असें ठरविण्यांत आलें कीं, आरंभी मंडळीच्या खजिन्यातून पैसा घेऊन स्मशानपूरींत खड्डे तयार करावेत. व पाळकांनी मंडळीपुढें असा विचार ठेवावा कीं, ज्या घरीं मयत होईल त्यांच्या घरच्या माणसांनीं खड्ड्याचा पैसा द्यावा त्याशिवाय स्मशानपूरींत प्रेत पुरण्याची सोई लागणार नाहीं. हा एक विचार, किंवा मयताच्या घरच्यांस एकदम पैसा देणें कठीण होईल करितां मंडळीच्या प्रत्येक सभासदानें दरमहा दोन आणे प्रमाणें नियमीत वर्गणी देऊन व त्याचा खजिना वेगळा ठेऊन याच कामीं खर्ची घालून सर्व सिद्धता मंडळीच्या कारभाऱ्यांच्या द्वारें नेमाप्रमाणें करावी. हे दोन्ही विचार मंडळीपुढें ठेवण्यांत यावेत असा ठराव स्टॅंडिंग कमेटीनें या बैठकींत केला. व तो ठराव मंडळीपुढें मांडावा अशी सूचना पाळकास करण्यांत आली.

दुसरी गोष्ट मंडळीच्या पुस्तकातील सभासदांच्या यादीची सुधारणा. ह्या यादीसंबंधानें स्वत: सन्मान्य बाईसाहेबांनी मेहनत घेऊन अशी यादी तयार केली कीं, जे आमच्या मंडळीच्या सहवासांत आहेत त्यांची परवानगी पत्रें आणण्याची तजवीज व्हावी. व जे मंडळीच्या यादीमध्यें आहेत, तथापि कामानिमीत्यें परस्थळीं आहेत त्यांस चिटणीसानें पत्रव्यवहार करून त्यांचा रुकार घेणें. अशा दोन्ही यादींची कामें या डिसेंबरच्या अंत होऊन नवीन यादी करण्यात यावी. करितां १ल्या यादीच्या कामासाठीं रे. हरिबा गायकवाड व मि. गंगारामजी गायकवाड यांची निवडणूक करण्यांत आली. व दुसऱ्या यादीसंबंधानें चिटणीसानें पत्रव्यवहार करून त्याची सोय लावावी असें ठरविण्यांत आले.

तिसरी गोष्ट — ऐक्यासंबंधानें अध्यक्षानें कांहीं कांहीं ठोकळ गोष्टी सांगितल्या. व ऐक्याची स्थापना कशीं करावी ~~क~~ पैशाच्या आधार कोणत्या प्रकारें प्राप्त होईल या संबंधानें खल झाला व अध्यक्षानें सार्वत्रीक ऐक्याचा संक्षीप्त असा रिपोर्ट दिला कीं, सार्वत्रीक ऐक्यानें मिशनाची जी संयुक्त सभा अक्तोबर ता. ३१ या रोजीं भरली होती त्यांत असा विचार निघाला कीं, पाळकांचे दशांश आम्हास मिळावेत. दुसरी गोष्ट सार्वत्रीक ऐक्याच्या परवानगीवांचून कोणत्याही मंडळीची स्थापना व कोणत्याही मनुष्याची दिक्षा करण्यांत येऊं नये. या गोष्टीसंबंधानें मिशनाच्या संयुक्त सभेमध्यें बराच खल होऊन बहुमतानें असें ठरले कीं, पाळकांचे दशांश सार्वत्रिक ऐक्यास द्यावेत. आणि कोणत्याही मंडळीची स्थापना किंवा कोणाची दिक्षा त्यांच्या हुकमाशिवाय करूं नये. असा अधीकार मिशनाच्या संयुक्त सभेनें दिला. आदिकरून हकीगत सांगितल्यावर स्टँडिंग कमेटीतील भावांनीं असा विचार केला कीं, प्रथमत: ही गोष्ट मंडळीस अशा रितीनें कळवावी कीं, वांई, सातारा व कोरेगांव या ३ मंडळ्यांचे स्थानिक ऐक्य व्हावे असा ठराव झाला आहे. व हा ठराव मंडळीपुढें ठेवावा असें ठरलें. शेवटीं रे. हरिबा गायकवाड यांनी प्रार्थना केली व ही बैठक अटोपली.

ता. ३/१२/१२ मंगळवार रोजीं पाळकांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें मंडळीची बैठक स्टेशनस्कूलमध्यें बसली. आरंभी अध्यक्षानें प्रार्थना केल्यानंतर कामाला सुरवात केली. प्रथम चिटणीसानें मि. धनाजी चोदकर यांचे परवानगी पत्र कोरेगांव मंडळीनें पाठविलेलें ते वांचून दाखविलें. व त्यांना आपल्या मंडळीचे सभासद होण्याविषयीं ठराव पास झाला

दुसरें काम — मंडळीच्या स्टँडिंग कमेटीनें दोन ठराव केले होते. ते येणेंप्रमाणें. १ला ठराव सातारा एथील मंडळीनें सातारा, वांई, व कोरेगांव यांचे स्थानिक ऐक्य व्हावे व नगर एथील सार्वत्रीक ऐक्याचे सभेंत प्रवेश व्हावा असा ठराव केला.

व दुसरा ठराव स्मशानपूरीतील खड्डे यांची वर्गणी मंडळीच्या सभासदापासून म्हणजे ज्याच्या घरीं मयत होईल त्याच्यापासून एकदम ५॥ रु बील मंडळीच्या तर्फे त्यांस पाठवावे. व त्या बिलाचा पैसा त्यांनी चुकता करावा. किंवा प्रत्येक महिन्याला मंडळीच्या सर्व सभासदा पासून दोन दोन आण्याप्रमाणें वर्गणी उकळावी, व याचा एक निराळा फंड तयार करुन त्यासंबंधीं व्यवस्था लावावी.
हे दोन्ही ठराव पसंत करण्यासाठीं मंडळीपुढें मांडण्यांत आले. व सदहू पहिला ठराव पास झाला व सातारा मंडळीनें वांई व कोरेगांव मंडळीस कळवावे कीं, आम्ही स्थानिक ऐक्याची स्थापना करण्यास ईच्छीत आहोंत. आपली संम्मती काय आहे अश्या संबंधानें पत्रद्वारें रुकार द्यावा. व हें कार्य चिटणीसानें करावे असें ठरविलें.

दुसरा ठराव असा पसंत करण्यांत आला कीं, महिन्याच्या आरंभी मंडळीच्या प्रत्येक सभासदापासून दोन आण्याप्रमाणें वर्गणी उकळावी. व जे वर्गणी देणार नाहींत, त्यांस रितीप्रमाणें खड्याचा बिल खजिनदारानें प्रसंगीं करावा. व पैश्यांची उकळणी करावी. तथापि तूर्त मंडळीच्या खजिन्यातून खड्डे तयार करावेत. असें ठरलें. व या कामीं मंडळीचे खजिनदार मि. सूर्यवंशी यांसच या फंडाचे खजीनदार होण्याविषयीं मंडळीनें नेमणूक केली. शेवटीं रें. हरिबा गायकवाड यांनीं प्रार्थना केली. व या बैठकीचे काम अटोपलें.

ता. १०/१२/१२ मंगळवार रोजीं पूर्वी जाहिरात दिल्याप्रमाणे मंडळीच्या कामासाठीं स्टेशन स्कूलांत बैठक बसली. आरंभी प्रार्थना केल्यावर कामास सुरुवात झाली. अध्यक्षानें असें सांगितलें कीं, ज्यांची परवानगी पत्रें आलेली आहेत त्यांस मंडळीमध्यें घेणें व ज्यांनी परवानगी पत्रें मागविली आहेत त्यांस शिफारस पत्र देणें करितां चिटणीस आलेली पत्रें वाचून दाखवितील त्याप्रमाणे सर्व पत्रें मंडळीपुढें वाचण्यांत आली. ज्यांना मंडळीनें शिफारस पत्रें दिली, त्यांची नांवे येणेंप्रमाणें मि. भाऊराव गडगे व सौ. वाळुबाई गडगे. सईबाई बापूजी भालेकर व मिस् मालतीबाई ह. गायकवाड. दाजीबा पिराजी जाधव व सौ. कमळाबाई जाधव यांस वांई व कोरेगांव या मंडळीमध्यें परवानगीपत्रावर हुकूम मिळण्याची शिफारसपत्रें द्यावी असें सर्वानुमतें ठरलें.
परवानगीपत्राच्या द्वारें ज्यांना सातारा मंडळीमध्यें घेतलें त्यांचें नांव येणेंप्रमाणें मि. आनंदराव मगर यांस सर्वानुमतें सातारा एथील मंडळीमध्यें घेण्याचें ठरविलें. मि. बाबूराव भालेकर यांचे पत्र असे आले कीं मी अद्यापि सोलापूर मंडळीशीं संबंध ठेवीत नाहीं याचा अर्थ कोणत्या रितीचा आहे हें सांगता येत नाहीं. तथापि मंडळीनें असें ठरविलें कीं, या ईसमास असें लिहावें कीं, सोलापूर मंडळीशीं आपण संबंध ठेवा व पुढें आपणांस सातारा एथील मंडळीपासून परवानगीपत्र

मागण्याविषयीं इच्छा होईल आणि मिशनाच्या नवीन ठरावाप्रमाणें आपण गेल्या दिवसांपासून एक वर्षाची मुदत भरेपर्यंत आपलें नांव मंडळींत ठेवण्यांत येईल. त्याचप्रमाणें मिसेस फुलाबाई हिंवाळे यांचेही नांव एक वर्षपर्यंत सातारा मंडळीमध्यें राहूं द्यावे असे ठरविलें.

3 रें काम मि. दानिएलराव दिवे व त्यांचे कुटुंब यांचा अर्ज मंडळीपुढें ठेवण्यांत आला. व मंडळीनें असें ठरविलें कीं, ज्या अर्थी हें कुटुंब ११ वर्षपर्यंत कोणत्याही मंडळीशीं सहभागी नव्हते त्या अर्थी त्यांस मंडळीच्या पद्धतीप्रमाणें त्यांची परिक्षा स्टॅंडिंग कमेटीनें घ्यावी व त्यांचा ख्रिस्ती अनुभव पाहून मंडळीचे सभासद मंडळीच्या कराराप्रमाणें करावें. शेवटीं अध्यक्षानें प्रार्थना केल्यावर मंडळीची बैठक बरखास्त झाली.

ता. १६।१२।१२ सोमवार रोजीं मिशनबंगल्यांत स्टॅंडिंग कमेटीची बैठक बसली. आरंभी शास्त्रभाग वांचून प्रार्थना केली व कामाला सुरवात झाली. स्टॅंडिंग कमेटी जमण्याचा उद्देश असा होता कीं, मि. दानिएल दिवे यांचा अर्ज मंडळींत वांचण्यांत आला व मंडळीनें असें ठरविलें कीं, मि. दानिएल दिवे व त्यांचे कुटुंब यांची परिक्षा स्टॅंडिंग कमीटीकडून घ्यावी. व त्यासंबंधीचा रिपोर्ट स्टॅंडिंग कमीटीनें आम्हाला करावा. म्हणून हें कार्य करण्यासाठीं सुरवात झाली. आरंभी मि. दानिएल दिवे यांस असा प्रश्न केला कीं, आपला ख्रिस्ती अनुभव सांगा. त्याच प्रमाणें सुवार्तबाईसही प्रश्न करावेत म्हणून अध्यक्षानें विचारपूस केली. हें कार्य झाल्यानंतर ह्या उभयतांस असा निरोप दिला कीं, आतां आपण आपल्या घरीं जावें व स्टॅंडिंगकमेटीचा निरोप पाळकांच्या तर्फे आपणांस समजेल. त्यानंतर स्टॅंडिंग कमीटीने असा ठराव केला कीं, सदर्हू कुटुंबास धर्मशिक्षणासाठीं दोन महिन्यांची मुदत द्यावी. व नंतर त्यांस मंडळीमध्यें घेण्याविषयींचा ठराव मंडळीस जाहीर करावा. शेवटी प्रार्थना होऊन ही बैठक आटोपली.

ता. २२।१२।१२ या रोजीं मि. बेचरलाल यांची मुलगी शेवंती उर्फ सुलोचना बेचरलाल हिचा बापतिस्मा रे. प्रसादराव मकासरे यांनी केला.

अमेरिकन मिशन संबंधांतील सातारा एथील ख्रिस्ती मंडळीच्या इ. स. १९१२ सालच्या वार्षिक रिपोर्ट.

Report of Satara Church for 1912

या सालाच्या अखेरपर्यंत प्रभुभोजन घेणारे पुरुष ४८ स्त्रिया ७२ आणि बाप्तिस्मा पावलेली लेंकरें १०३ एकंदर संख्या २२३ आहे. या सालामध्यें ११ लेंकरांचा बाप्तिस्मा करण्यांत आला. ३ माणसे परवानगी पत्रानें इतर मंडळींत मिळाली १३ माणसे परवानपत्राच्या द्वारें आपल्या मंडळींत आली वाचक सुमारें १०० आहेत. मंडळीच्या संबंधांत ४ ठिकाणीं ख्रिस्ती कुटुंबें राहतात. या सालांत २ मृत्यू झाले. मंडळीमध्यें एकंदर क्याटिक्युमेन ८ आहेत.

मंडळीच्या उपासनेच्या संस्था:— शाब्बाथ शाळा, रवीवारची संध्याकाळची भक्ति, मंगळवारची प्रार्थनेची पोथी, शुक्रवारीं यत्न करणारी सभा व तिच्या शाखा, शनिवारीं शा. शा. शिक्षकांच्या वर्ग व उमेदवारांच्या वर्ग इत्यादि संस्था नियमाप्रमाणें चालू आहेत. ह्या वर्षांत प्रभुभोजनाचे प्रसंग सुमारें ६ वेळां करण्यांत आले.

शाब्बाथ शाळा:— ही शाब्बाथ शाळा आमच्या मंडळीचे पाळक नियमानें, व मोठ्या उत्सुकतेनें व पद्धतशीर रितीनें चालवीत आहेत. यांच्या अध्यक्षतेखालीं या शाब्बाथ शाळेची या वर्षीं संख्येमध्यें अभ्यासामध्यें व सद्गुणामध्यें बरीच वाढ झाली आहे. असें रिपोर्टवरून दिसून येतें. या शाब्बाथ शाळेतील लोकांची सरासरी सुमारें ७५ वर आहे व दानपात्रांतील जमा रु. १८ आ. ८ पै. ११ आहे. या वर्षीं शाब्बाथ शाळेच्या वार्षिक परिक्षेस बरेच उमेदवार बसले होते. त्यापैकीं दोरवाडी एथील शाळेची परधर्मी लेंकरें या परिक्षेस बसून त्यांनीं तोंडी चांगली उत्तरें दिलीं व त्यांतील १७ मुलांनीं सरटीफिकीटें मिळविली आहेत ही फारच आनंदाची गोष्ट होय. या मंडळीच्या संबंधांत एकंदर ५ शाबाथ शाळा चालू आहेत, त्या येणेंप्रमाणें - स्टेशनस्कूल येथें ख्रिस्ती मुलांमुलींच्या शाब्बाथ शाळेचे एकंदर ८ वर्ग चालू आहेत. दोरवाडीं येथें मुलें व मुली मिळून सुमारें १०० आहेत. ६ शिक्षक तेथें काम करितात. मंडई एथील शा. शाळेंत एकंदर मुलें व मुली मिळून ६० च्या वर संख्या आहे. व तेथें ३ शिक्षक काम करितात. करंजे येथें सुमारें २० मुलें आहेत. त्या ठिकाणीं २ शिक्षक नियमाप्रमाणें शाब्बाथ शाळा चालवितात. सातारा कँप येथें १२ मुलें आहेत व एक शिक्षक तेथें काम करितो.

या सर्व शाब्बाथ शाळा नियमाप्रमाणें चालतात व त्या शाळेचे सुपरिन्टेंडट सन्मान्य मिशनेरीबाई मिस न्यूंजर ह्या दररवीवारीं प्रत्येक शाब्बाथ शाळा असें महिन्यांतून या सर्व शाबाथशाळेची देखरेख मोठ्या दक्षतेनें करितात. व त्यांस लागणारी साधनें व चित्रें पुरवून मनापासून त्यांची मदत करितात.

दर रविवारच्या भक्तीप्रसंग आमच्या मंडळीचे पाळक हे नियमाप्रमाणें चालवीत असतात व कधीं कधीं हा भाग ते सन्मान्य बंधूसही चालविण्यास सांगत असतात. आमचे पाळक खिस्ताच्या राज्यांत या मंडळीचे पाऊल अधिक पुढें पडावें, म्हणून होईल तितका प्रयत्न करून, आपल्या उत्तम उपदेशाच्याद्वारें सतत जागृत ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात.

यत्नकरणारी सभा ही नियमाप्रमाणें दर शुक्रवारीं स्टेशनस्कूलमध्यें चालत असते. या सभेमध्यें एकंदर सभासद २० आहेत. व या वर्षाची जमा १६ रु होती. पैकीं खर्च १० रु झाला व शिल्लक ६ रु आहे या सभेच्यावतीनें दोन शा. शाळेस मदत होत आहे. या वर्षी या सभेच्या तर्फे मंडई येथील जुन्या देवळांत म्याजीक ल्यांटर्नची चित्रें दाखविण्याच्या एक प्रसंग करण्यांत आला. या यत्न करणाऱ्या सभेच्या शाखा दोन आहेत. १ली मुलांची बालसभा- या सभेमध्यें सन्मान्य बाईसाहेब स्वतः हजर राहून त्यांच्याकडून भक्तीप्रसंग व प्रार्थनेचे प्रसंग व सहानुभूतीचें कृत्यें व घेणें यापेक्षां देणें अधिकरून ख्रिस्ती सद्गुणांची उत्तम क्रिया करविण्यासाठीं सभेला धडे करितात. ही अभिनंदनीय गोष्ट असून कित्तादायक आहे. या बालसभेचें सभासद एकंदर ७० आहेत. व हिची या वर्षाची जमा रु ३१ पै ६ होती. पैकीं खर्च १५रु झाला व हल्लीं शिल्लक .६ रु ६ पै २६ आहे. या सभेनें शताब्दोत्सवासाठीं २५ रु देण्याचे ठरविलें आहे व त्या पैकीं १२॥ रु या फंडाला पाठविलें असें त्यांच्या रिपोर्टवरून समजते. त्याचप्रमाणें मिसेस हिवाळे आपल्या मुलींच्या विश्वासू बालसभेमध्यें हजर राहून त्यांच्याकडूनही उत्तम भक्तीप्रसंग करवितात. व त्यांच्यामध्येंही कांहींतरी ख्रिस्ती सेवा घडावी म्हणून सतत त्यांचे प्रयत्न चालू आहेत. आणि ही विश्वासू बालसभाही शताब्दोत्सवाच्या कार्यासाठीं कांहींतरी शिवणाचें काम दर शनिवारीं नियमानें करून या फंडासाठीं कांहीं रक्कम पाठविण्यासाठीं प्रयत्न करीत आहे

प्रार्थनेच्या मंडळीचे प्रसंग मंगळवारीं नियमाप्रमाणें होतात. या प्रार्थनेच्या मंडळीचे पुढारीपण मंडळीतर्फे कित्येक बंधु मोठ्या अस्थेनें करितात. या प्रार्थनेच्या प्रसंगीं अनेक अस्थेवाईक प्रार्थना करण्यांत आल्या. व ख्रिस्ती अनुभव सांगण्यांत आले.

व या प्रार्थनेच्या मंडळीच्या द्वारें ज्या ज्या गोष्ट आम्ही आपल्या प्रभूजवळ मागितल्या त्यांतील कांहीं गोष्टी यथासांग व यथाप्रसंगीं प्राप्त झाल्या. म्हणून आम्ही प्रभूची स्तुति करितो.

शाब्बाथ शाळेच्या शिक्षकांच्या वर्ग कांहीं दिवस सुयमीतपणें चालला होता. व मध्यंतरी मि० ढालवाणी यांच्या विशेष जरूरीच्या कामामुळें बंद होता. तथापि हा वर्ग नियमीतपणें चालूं ठेवावा म्हणून होतां होईल तितक्या रितीनें ते प्रयत्न करितात. ते आपलें काम संभाळून मंडळीच्याही मदत करितात, म्हणून मंडळी त्यांची आभारी आहे.

उमेदवारांच्या वर्ग— या वर्गात उमेदवारांस आत्मीक शिक्षण व शास्त्रसंबंधीं विशेष माहिती व मंडळींत प्रवेश होण्यासंबंधाचें अवश्य असणारें शिक्षण आमच्या मंडळीचे अनुभवीक पाळक रे० हरिबा गायकवाड व मंडळीचें कारभारी मि० हणमंतराव गायकवाड व आमचे पाळक हे तिघे जण हा वर्ग घेत असतात. यंदा त्या वर्गात बहुतेक बोर्डिंग खेरीजकरून मंडळींतील ख्रिस्ती कुटुंबातील मुला मुलींचा भरणा आहे. कांहीं ख्रिस्ती कुटुंबांची बदली झाल्या कारणामुळें जे उमेदवार तयार होते, त्यांना मंडळीमध्यें घेण्याची सवड झाली नाहीं. आतां हा वर्ग नियमाप्रमाणें चालून आपलें कार्य करील अशी मोठी आशा आहे.

यंदा आम्हांस कांहीं विशेष आत्मीक प्रसंग मिशनेरी बंधुच्या व बहिणींच्या आगमनानें प्राप्त झाले याबद्दल आम्ही परमेश्वराचे अभिनंदन करितो. आणि विशेष आनंद मानण्याची गोष्ट ही आहे कीं, जेव्हां जेव्हां हे मिशनेरी बंधु व बहिणी सातारा मुक्कामीं आले तेव्हां तेव्हां त्यांनीं आपल्या भेटीचा लाभ आम्हां ख्रिस्ती लोकांसच दिला असे नाहीं, तर आर्थर हॉलमध्यें व न्युस्कूल मध्यें व्याख्यानांच्या द्वारें परधर्मी सुशिक्षित लोकांसही दिला.

या १९१२ सालामध्यें रे० हिवाळेसाहेब यांनीं मंडळीस विशेष प्रसंगीं व नेहमीच्या रवीवारच्या प्रसंगीं बोधामृत पाजिलें व मंडळीशीं सहानुभूती व ख्रिस्ताची प्रिती बोलण्यानें व करण्यानें दाखवून मंडळीचे सहाय केलें याबद्दल मंडळी यांचे व त्यांच्या कुटूंबाचे अभिनंदन करिते.

गेल्या वर्षामध्यें मंडळीची अंतर्गत व बाहेरील सर्व कामें सन्मान्य बाईसाहेब यांनीं मोठ्या धैर्यानें व नेटानें व कुशलपणानें पार पाडिली. मंडळीच्या शाब्बाथ शाळेच्या बाबतींत, संध्याकाळच्या उपासनेमध्यें, व मंडळीच्या इतर सर्व शाखांमध्यें होईल तितक्या स्फूर्ति देऊन कांहीं कांहीं विशेष प्रकारची ख्रिस्ती सेवा मंडळीकडून व तिच्या शाखांकडून करवून घेतली. व मंडळीच्या सर्व कार्यांत सहानुभुति दाखवून ख्रिस्ताच्या प्रीतीनें व उदात्त विचारानें व हिताचिंतक हेतूनें मंडळीचे कल्याण पहात आल्या आहेत. यावरून मंडळी त्यांचे अत्यंत अभारी आहे. दुधांत साखर पडल्याप्रमाणें आमच्या सन्मान्य लि मडमसाहेबांचें आगमन झालें आहे यावरून आम्ही प्रभूचे अभार मानितो. व याच गोष्टीची अपेक्षा सन्मान्य बाईसाहेब व मंडळी करीत होती ती प्रभूच्या साह्यानें पूर्ण झाली.

सन्मान्य बाईसाहेबांवरती मिशनाच्या कामाची व मंडळीच्या कामाची जबाबदारी भारी होती, ती जबाबदारी मिसेस ली मडमसाहेब यांच्या येण्यानें अधीक सुलभ व सुसाध्य झाली आहे.
या उभयतां मिशनेरी बहिणींकडून मंडळीच्या सर्व कार्यांत एक विचार व एकच धोरण पाहून आम्हां सर्वांस आनंद वाटतो.

आम्ही प्रभूचें अभिनंदन करितों कीं, स्वर्गवासी सन्मान्य ली साहेब यांच्या मनांत सातारप्रांताच्या शुभवर्तमानाच्या कार्यासाठीं जे उदात्त विचार सिद्धीस जावे म्हणून त्यांची महत्वकांक्षा होती, ती, ते ह्या जगांत नसल्यावरून नाहींशी न होतां, सिद्धीस जावी व शुभवर्तमानाचें काम मोठ्या सपाट्यानें चालूं असावें, व विशेषेंकरून व्हाईटप्लेनचर्चचा असा निरोप आला होता कीं, जरी सन्मान्य ली साहेब हे आम्हांस सोडून गेले, तरी त्यांचे काम तसेंच पुढें चालूं राहील, अशा दूजोरांनी आम्हां सर्वांस अधिक उमेद प्राप्त झाली आहे.

आमच्या मंडळीची सर्व लहानथोर कामें अधिक चांगली व्हावीत, म्हणून पाहुणे या नात्यानें मिस कोनबाई यांनीं पुष्कळ ख्रिस्ती सेवेंत मंडळीची मदत केली. यावरून मंडळी त्यांचें आभारी आहे.

अलिकडील ख्रिस्त जयंतीच्या प्रसंग ख्रिस्ताच्या प्रीतीचा दर्शक झाला यावरून मंडळी मनापासून प्रभूचे अभिनंदन करिते.

1913

१९१३ साल. सातारा मंडळीतील प्रभुभोजन घेणाऱ्या लोकांची याद. १९१३

List of Satara Ch. Communicants 1913

१ प्रसादराव विठ्ठल मकासरे.
२ वेणाबाई कृष्णाजी भोसले.
३ विठोबा गुणाजी गायकवाड.
४ सावित्राबाई विठोबा गायकवाड.
५ दाविदराव कासमभाई ढालवाणी.
६ कृष्णाजी पिराजी भोंसले
७ शेवंतीबाई. टी. आढाव.
१० सुज्ञानराव. का. ढालवाणी.
११ सखारामजी हणगु कांबळे.
१२ अलिसाबेतबाई वि. मकासरे
१३ काशीबाई आबाजी तरटे
१४ गोविंदराव परशुराम भागवत.
१६ निळकंठराव. का. ढालवाणी.
१७ नानूबाई पर्वतराव कांबळे
१९ हरी सखाराम बंदसोडे. ×
२० रत्नाकरराव का. ढालवाणी.
२१ जॉन पीटर ॲंड्रुज. ×
२२ बाबाजी लक्ष्मण काकडे.
२५ गंगूबाई. वि. जोशी.
२६ गजी धोंडीबा कांबळे. ×
२७ गोजराबाई विठोबा गायकवाड.
२८ विठाबाई सखाराम कांबळे.
२९ आनंदराव पर्वती कांबळे.
३० आबाबाई लक्ष्मण काकडे
३१ सखुबाई जोतीबा कांबळे. ×
३२ भागुबाई सखाराम जगताप.
३३ राही. धोंडीबा. कांबळे.
३५ बाबूराव. पिराजी जाधव.
३६ हणमंतराव. गायकवाड
३७ यमुनाबाई. एच गायकवाड
३८ धोंडी जोतीबा कांबळे.
३९ सावित्राबाई. बी. जाधव.
४० भिमा रावजी शिंदे. ?
४२ भागू रामा. ?
४३ मुक्ताबाई देवजी कांबळे.
४४ भागू पांडु. ?

१९१३. साल

४५	हरिबा धोंडीबा कांबळे.
४६	हिरा सुलेमान.
४७	केशव बाबाजी. ?
४८	सायरस. वि. मकासरे.
४९	धोंड्या शेफर्ड. ?
५०	आनंदी गणपत काकडे.
५१	तायनी कृष्णाजी.
५२	रत्नाकरराव एच्. गायकवाड.
५३	जाईबाई पिराजी जाधव.
५६	पिरा जोतीबा शिंदे. ?
५८	मारुती लक्ष्मण काकडे
५९	कुंडलीक देवजी कांबळे.
६०	भाऊराव जनोबा पवार.
६१	आनंदराव. स. कांबळे.
६२	गंगू पिराजी.
६३	तायनी श्रावण कांबळे.
६६	फलाबाई. कृ. हिंवाळे.
६७	सुमतीबाई शाहूराव गायकवाड.
६८	चांदी सुलेमान मुलाणी. X
६९	ग्रेस हणमंतराव गायकवाड.
७०	गया नानाजी गायकवाड.
७१	आंकु पर्वती कांबळे.
७२	केच्चर पिराजी
७३	तारसिंग बेलाजी. ?
७५	वागलो पुंजाजी
७६	बेच्चर रणछोडजी.
७७	श्रावण धोंडीबा कांबळे.
७८	सुगंधराव लोंढे. ?
७९	सितामा नंदी. पोचेटी.
८०	हरिबा गायकवाड
८१	यसाबाई हरिबा गायकवाड
९२	बाबू बापुजी भालेकर.
९३	माधव देवजी कांबळे. ?
९४	मालतीबाई. शि. आल्हाट.
९५	लिया सदोबा खंडागळे
९६	बायजा महादू पाजी.
९७	एस्तेर बेचरलाल.
९८	भागुशा. पां. मगर.
९९	कोंडीराम पांडुरंग छीडदार.

१९१३ साल. सातारा मंडळीतील प्रभुभोजन घेणाऱ्या लोकांची याद. १९१३

१००	महादु जोतीबा. ? gone	
१०१	रंभा ग्यानुबा कांबळे.	
१०२	कमलावती दाजीबा जाधव × ?	
१०३	जिजा बाबाजी भोसले. ?	
१०४	शाहूराव गायकवाड.	
१०५	बळभीम लांडगे.	
१०६	शेवंतीबाई पवार.	
१०७	एकनाथराव साळवे.	
१०८	ताईबाई ए. हिवाळे.	
१०९	मि॰ शामुवेल सोअंस. × gone	
११०	मिसेस् सोअंस. × gone	
१११	~~भागुबा मगर~~	
११२	सावित्राबाई. ए. साळवे.	
११३	सुंदराबाई पंडित.	
११४	मालनबाई. एस. साळवे. × gone	
११५	गोजराबाई. तुकाराम. कसाब.	
११६	बळवंतराव सिदोबा नवागिरी. × gone	परवानगी ~~पत्र~~ दिलें.
११७	विश्रामजी रावबा मिरपगार.	
११८	जानकाबाई लांडगे.	
११९	गंगारामजी तबाजी गायकवाड.	परवानगी पत्रानें कोरेगांव मं. गेले. जुलै सन १९१३.
१२०	मनाबाई गंगारामजी गायकवाड.	
१२१	यशवंतराव धोंडीबा सूर्यवंशी.	
१२२	लिलावतीबाई सूर्यवंशी.	
१२३	धनाजी सोनाजी चांदकर.	परवानगी पत्रानें कोरेगांव मंडळींतून आले.
१२४	शेवंतीबाई धनाजी चांदकर.	
१२५	आनंदराव मगर.	
१२६	सिताबाई उंद्रे	
१२७	शांताशिला हरिबा गायकवाड. ×	
१२८	मी. आनिरळराव दिवे.	
१२९	सौ. सुवार्ताबाई दिवे.	
१३०.	लिलावत्ती गायकवाड.	
१३१.	तारा के. हिवाळे.	
१३२.	मनोरमा पवार,	
१३३	गिता फणसाळकर	
१३४	मालती गायकवाड	
१३५	मालन भागवत.	
१३६	राजस के. हिंवाळे	

✓ १३७ बायजा भोसले.
✓ १३८ गुलाब शेख. हुसेन
✓ १३९ सात्वीक हिंवाळे.
✓ १४० प्रभाकर भागवत.
✓ १४१ डेविड चांदेकर.
✓ १४२ विल्सन दिवे.
✓ १४३ वामन के. गायकवाड.
✓ १४४ चंद्रिकाबाई गायकवाड
१४५ मि. जोजेफ. पिल्ले

बापतिस्मा पावलेली लेंकरें. १९१३.

List of Baptized Children 1913.

१ वामन विठोबा गायकवाड
२ जयवंत ,, गायकवाड.
३ रूथ मालती दाविदराव ढाळवाणी. gone
√ ५ वसंत अर्नेस्ट आढाव.
४ वामन बापुजी पाटोळे. × gone
६ सारा बापुजी पाटोळे. × gone
७ प्रभाकर गोविंदराव भागवत. ✓
८ वसंत आल्बर्ट डी. ढाळवाणी. gone
९ फ्रान्सीस पीटर ॲंड्रूज. × gone
१० मनोरमा ग्रेस सूर्यवंशी.
' ११ मालती मथुरा गो. भागवत ✓
१२ मोसे बाळाजी काळसेकर. gone
१३ गाब्रियल पीटर ॲंड्रूज. × gone
१४ सुमंत विल्सन ढाळवाणी. gone
१५ लिलावती हणमंत गायकवाड. ✓
√ १६ गफूर हुसेन.
√ १७ गुलाब हुसेन. ✓
√ १८ प्रेमा हणमंतराव गायकवाड.
१९ रेचेल शांतवनराव ढाळवाणी. gone
२० वसंत बापुजी पाटोळे. gone
२१ वसंतिका आनंदराव शेकटकर. gone
√ २२ शारदा एलन आढाव. ?
२३ रत्नाकर विठोबा पेटारे. × gone
२४ डेविड बार्णबस ग्वालवंस × gone
२५ मालन सावळेराम गायकवाड. gone
√ २६ प्रभाकर हणमंतराव गायकवाड.
२७ योहान्न विठोबा पेटारे. × gone
२८ शांति ,, ,, × gone
२९ शमुवेल ,, ,, × gone
३० बेंजामीन बार्णबस ग्वालवंस × gone
३१ शांतवन कृष्णाजी हिंवाळे gone
३२ सरु कृष्णाजी हिंवाळे. × gone
३३ बाबू ,, ,, gone
३४ शमुवेल दामू ,, ,, gone
३५ राजस ,, ,, gone
३६ सात्विक ,, ,, ✓
३७ तारा ,, ,, ✓

बापतिस्मा पावलेली लेकरें १९१३.

√३८ सुंदर कृष्णाजी हिंवाळे.
√३९ सुमंत कृष्णाजी हिंवाळे.
४० प्रकाश विठोबा पेटारे. gone
√४१ कमला फ्लोरा आढाव. ?
४२ शमुवेल प्रेमचंद जयवंत सुर्यवंशी
४३ सारा हुसेनभाई × gone to Wai
४४ चांदबी हुसेनभाई × " "
४५ महिबू ,, × " "
४६ मेरी अबलो ज्योतिमाला बाबाजी. × gone
४७ मार्या कमला बेंजामिन × gone
४८ प्रभावती सेरा एच गायकवाड. × gone
४९ सयाजी प्रतापराव गायकवाड. × gone
५० मार्या बनू बेंजामीन. × gone
५१ प्रभाकर सुंगधराव लोंढे. × gone
५२ प्रभाकर हरिबा कांबळे. × gone
५३ नरसिंग नंदी पोचेटी. × gone
६३ सुलोचना बि. गायकवाड. gone
६४ मेरी मनोहरराव आढाव. × gone
६५ शरत सेरिल आढाव.
६६ सुंमती ऑलीस एच. गायकवाड.
६७ भास्कर हरिबा कांबळे. × gone
६८ रुबी कमळा डेविडराव. gone
६९ बेंजामीन मधूकर " gone
७० फुलवंती वागलो.
७१ शांतवन वागलो.
७३ विष्णू रामभाऊ × gone
७४ गोविंद × gone
७५ रामभाऊचा दुसरा मुलगा. × gone
७६ भास्कर बी. जाधव.
७७ अगस्टीन सांगवा. gone
७८ शांतशील. भा. मगर.
७९ सामसन उर्फ चंद्रसेन सुर्यवंशी.
८० मार्या लिलावती सोमंस × gone
८१ भोसल्याचे लहान मूल ?
८२ डेझी दाविदराव. ढालवाणी. gone
८३ जेम्स सुज्ञानराव. ढालवाणी. gone
८४ भास्कर. प्रसादराव. मकासरे.

बापतिस्मा पावलेली लेंकरें १९१३

८५ शारदा प्रसादराव मकासरे.
८६ उषा प्रसादराव मकासरे. चार्लस दिवे.
८७ भास्कर दानियल दिवे.
८८ जॉनसन दानियल दिवे
८९ कुसुमावती दानियल दिवे.
९० कर्नेलियस दानियल दिवे. × वारला. ता.२६ ऑगस्ट १९१३.
९१ विनायक बलभीम लांडगे gone
९२ मधूमती गंगारामजी गायकवाड × gone
९३ मनोरमा एस. पवार. V
९४ मालती गंगाराम गायकवाड V
√ ९५ जयवंती गंगाराम गायकवाड.
√ ९६ गोपाळ गंगाराम गायकवाड
९७ शाहू गं. गायकवाड. × gone
९८ दिनकर गं. गायकवाड. × gone
९९ डेविड धनाजी चांदकर. V
√ १०० शामुवेल धनाजी चांदकर
१०१ दानियल धनाजी चांदकर
१०२ यहेज्केल ,, चांदकर
१०३ मंजूळा धनाजी चांदकर
१०४ शेवंती उर्फ सुलोचना बेचरलाल.
√ १०५ पुरुषोत्तम प्रसादराव मकासरे
√ १०६ वसंत प्रसादराव मकासरे
√ १०७ सुंदर ,, ,,
√ १०८ भास्कर ,, ,,
√ १०९ मनोरमा प्रसादराव मकासरे
√ ११० रत्नमाला प्रसादराव मकासरे. २।१२।४१ उषा
१११ सोनू केचरलाल
११२ मालन बाबूराव जाधव.
√ ११३. चार्लस डानिएल दिवे.
√ ११४. सोनू नानाजी साळवे.
√ ११५. दौलत नानाजी साळवे.
√ ११६. गंगू गोधाजी जाधव
√ ११७. आनंदी नानाजी साळवे.
११८ डायना जयवंतराव भाकरे
११९ जेम्स उ० हिरालाल दानिएल सूर्यवंशी
१२० वसंत बाबुराव जाधव
१२१ प्रकाश शिवाजी भोंसले

१२२ भास्कर नारायण मनोलकर

~~१२३ गंगू योधाजी जाधव~~

१२४ विमला प्रसादराव मकासरे

१२५ कृपा दाजीबा जाधव

१२६ सुमित्र आनंदराव मगर

१२७ जाई आनंदराव मगर

१२८ रत्नमाला धनाजी चांदेकर

१२९ प्रिस्किला दानिएल ढिवे.

१३० पांडुरंग आनंदराव मगर

१३१ वामन शामुवेल नानाजी कांबळे.

Minutes 1913

तारीख ५ ज्यानु. १३. या दिनीं प्रभुभोजन झालें.

ता. १४ ज्यानु. १९१३ यादिवशीं मिस. सुशीला हरिबा गायकवाड इसम सर्वानुमतें परवानगी पत्रानें सातारा मंडळींत घेतलें.

याच दिवशीं मि. जोसेफ२।०   यांस त्यांच्या परवानगी पत्रावरून सातारा एथील प्रभुच्या मंडळींत घेतले. व तसेंच सुशीला हरीबा या मुलीसही परवानगी पत्रावरून सातारा मंडळींत घेतलें.

ता. १४ जानु. १९१३. या दिनीं मंडळीची बैठक स्टेशनस्कूलमध्यें बसली. त्यावेळीं स्थानिक ऐक्यासंबंधीं वाईहून पत्र आल्यावरून तत्संबंधीं बरीच चर्चा होऊन तो विचार पुढें ढकलण्यांत आला.

याच दिवशीं नगरहून सार्वत्रिक ऐक्याचें नवीन ठराव (पैशांच्या वाढीसंबंधानें) आलेल्या पत्राचा विचार करण्यांत आला पण कांहींच ठराव न करितां ती गोष्ट पुढें ढकलण्यांत आली.

ता. ३ फेब्रु. १९१३. १. या दिवशीं मिशन बंगल्यांत स्टांडिंग कमेटीची बैठक बसली. तेव्हां असा ठराव करण्यांत आला कीं, मि. शिवरामजीनें मंडळीसमोर पाप कबुलीचें एक वाक्य बोलून नंतर त्याच प्रसंगीं त्यांना मंडळींत घ्यावें. परंतु जो वेळ त्यांना सोईचा वाटेल त्या दिवशीं हें व्हावें. हा निरोप सदई इसमास मि. गंगारामजीनें सांगावा. असें ठरलें.

२. स्थानिक ऐक्याच्या स्थापनेकरितां विचार करण्यास व भावांची अनुकूलता मिळविण्यास एक कमेटी नेमली ती पुढीलप्रमाणें:- १. रे. हरिबा गायकवाड, रे. प्रसादराव मकासरे. ३. मि. गंगारामजी गायकवाड.

३. चर्च फंडाविषयी. याविषयीं पुष्कळ ऊहापोह होऊन हा विचार मंगळवारी मंडळीपुढें ठेवावा व नंतर यासंबंधीं मंडळीचें धोरण काय आहे, तें पाहून नंतर पुढील सोमवारीं पुन्हां बैठक भरवावी असें ठरून बैठक आटोपली.

ता. ४ फेब्रु. १९१३. या रोजीं पूर्वीं ठरल्याप्रमाणें चर्च फंडाविषयीं विचार मंडळीपुढें काढिला, त्यासंबंधीं बराच ऊहापोह होऊन असा ठराव करण्यांत आला कीं, मंडळींतील प्रत्येक इसमाच्या घरीं जाऊन स्मशानफंडाविषयीं त्यांचें म्हणणें काय आहे हें ऐकून घेऊन नंतर त्याचा रिपोर्ट मंडळीस कळवावा, असें ठरून हें कृत्य करण्यास खालीं नमूद केलेली कमेटी नेमण्यांत आली. १. रे. हरिबा गायकवाड. २. रे. प्रसादराव मकासरे. ३. मि. हणवतराव गायकवाड. ४. मि. धनाजी चांदकर.

११ फेब्रु. १९१३. या दिवशीं मि. शिवरामजीस मंडळींत घेण्याविषयीं स्टयांडिंग कमेटीनें ठरविलेल्या ठरावास मंडळीनें अनुमोदन देऊन तो ठराव पसंत केला. (ता. ३ फेब्रु. १९१३)

४ मार्च १९१३. या दिवशीं मंडळीची बैठक बसली, त्यावेळीं स्थानिक ऐक्य स्थापण्यासाठीं येणाऱ्या पाहुण्याचा पाहुणचार करण्यासाठीं एक कमेटी नेमण्यांत आली व तिच्यातर्फे मंडळींतील भावांच्या घरीं, पाहुण्यांची व्यवस्था व्हावी; व प्रत्येक पाहुण्याबद्दल मंडळीच्या खजिन्यांतून ।= प्रमाणें खर्च द्यावा असें ठरलें. ती कमेटी येणेंप्रमाणें:— रे. प्र. वि. मकासरे. रे. हरीबा गायकवाड. मि. गंगारामजी गायकवाड.

ता. ५ मार्च १९१३. या दिनीं मि. प्रेमानंदराव तुकारामजी देठे यांचा लग्नविधि कुमारी शांतशिला हरीबा गायकवाड इजशीं रे. प्रसादराव वि. मकासरे यांनीं लाविला.

८ मार्च १९१३. या दिवशीं रे. प्र. वि. मकासरे आणि रे. हरीबा गायकवाड यांनीं मि. मारुतराव खंडोबा जाधव यांचा लग्नविधि कुमारी यमुनाबाई तुळशीरामजी साठे इच्याशीं लाविला.

९ मार्च १९१३. रे. प्र. वि. मकासरे यांनीं सोनू केचरलाल या मुलीचा बाप्तिस्मा केला. याच दिवशीं रे. डॉ. ह्यूमसाहेब आणि रे. तुकारामजी नथोजी यांनीं "प्रभुभोजन" हा विधि केला.

९,१० मार्च १९१३. या रोजीं प्रांतिक ऐक्य झालें. Aikya Sabha — 1913 Mar. 9-10

ता. २४/३/१३. वांई मंडळीचें पत्र सातारा मंडळीस आलें, म्हणून त्यासाठीं मंडळीची बैठक मिशन शाळेंत बसली व असें ठरलें कीं, वांई एथील पाळकाप्रित्यर्थ दिक्षेच्या उत्सवास मंडळीच्या वतीनें जाणाऱ्या प्रतिनिधींस खर्चासाठीं चार रुपये द्यावे असें ठरून, त्या कामीं जाण्यास जे भाऊ नेमिले ते सदरीं दाखल केल्याप्रमाणें:— रे. प्र. वि. मकासरे. रे. ह. गायकवाड मि. हनवतराव गायकवाड व मि. गंगारामजी गायकवाड.

ता. २७/३/१३. सन्मान्य भाऊ रामकृष्णपंत हे यत्नकरणाऱ्या सभेच्या वतीनें एथें येऊन त्यांनीं मंडळीस व यत्नकरणाऱ्या बांधवांस पुष्कळ उत्तेजीत केलें.

१८ मे. १९१३ या रोजीं रे. प्र. वि. मकासरे यांनीं मालन बाबूराव जाधव या मुलीचा बाप्तिस्मा केला.

१५ जून १९१३ या दिवशीं प्रभुभोजनाचा संस्कार करण्यांत आला. रे. प्र. वि. मकासरे यांच्याकडून.

२४ जून १३ चंद्रिकाबाई गायकवाड इस परवानगी पत्रानें सातारा मंडळींत घेतलें.

ता. २३ ऑगष्ट १३ या रोजीं स्टयांडिंग कमेटीची बैठक स्टेशन स्कूलमध्यें भरली होती. पाळकानें पूर्वीं जाहिरात दिल्याप्रमाणें सदर्हू कमेटीनें मंडळींत मिळणाऱ्या उमेदवारांची परीक्षा घेतली. व सर्वांनुमतें असें ठरविलें कीं ही हकिगत मंडळीच्या पुढें ठेवून, मंडळीच्या ठरावांप्रमाणें उमेदवारांना मंडळींत घेण्याचा विधि करण्यांत यावा.

ता. २४/८/१९१३ नियमांप्रमाणें रविवारीं सकाळीं मंडळीपुढें उमेदवारांना मंडळींत घेण्यासंबंधीं गोष्ट ठेवण्यांत आली. तेव्हां मंडळीच्या बहुमतानें

असें ठरलें कीं, आज दुपारीं ह्या उमेदवारांच्या संबंधानें पाळकानें हा गंभीर विधि करावा. असें ठरलें.

ता २४ ऑगष्ट १३ याच दिवशीं दुपारीं प्रभुभोजनाचा गंभीर विधि रे. प्र. वि. मकासरे यांनीं केला व त्याच वेळीं खालीं नमूद केलेले उमेदवार मंडळीत घेण्यांत आले, त्यांचीं नावें येणेंप्रमाणें:-

१. मि. दानिएलराव दिवे. २. सौ. सुवार्ताबाई दिवे
3. कु. लिलावती गाइकवाड. ४. कु. तारा के. हिंवाळे
५. " मनोरमा एस. पवार. ६ " गीता फणसाळकर.
७. " मालती जी. गाइकवाड. ८ " मालन जी. भागवत.
९. " राजस के. हिंवाळे. १० " बायजा भोसले.
११. गुलाब एच. शेख. १२. सात्वीक के. हिंवाळे.
१३ प्रभाकर भागवत. १४. डेविड चांदेकर.
१५. विल्सन दिवे. १६ वामन के. गायकवाड.

ता. २६ ऑगष्ट १३ या दिवशीं कर्नेलियस दानिएल हा मुलगा मृत्यु पावला.

ता. १६ सप्टें. १९१३. या दिवशीं मंडळीसमोर पाळकानें अशी सूचना आणिली कीं, मुक्तिफौजचे मिशनरी बंधु आपल्या देवळांत देवळांत भक्तीचा प्रसंग करण्यासाठीं परवानगी मागतात, तर त्यावर मंडळीनें असें ठरविलें कीं, त्यांना देवळांत भक्ति करण्यास परवानगी द्यावी.

ता. १९ सप्टेंबर १९१३ ता. १९ सप्टेंबर सन १९१३ या दिवशीं स्टॅंडिंग कमेटी भरण्यांत आली. प्रथम पाळकानें प्रार्थना करून कामास आरंभ केला; व ज्या गोष्टी ठरविल्या त्या खालीं नमूद केल्याप्रमाणें:-

१. मि. सावळारामजी विठ्ठल पाठारे यांनीं पाठविलेलें पत्र वाचण्यांत आलें. नंतर त्यांच्यासंबंधींचें वांई मंडळीहून आलेलें पत्र वाचण्यांत आलें, व त्यावरून असा ठराव केला कीं, मि. सावळारामजीनें सन्मान्य बंधु मि. जेकब बापुजी यांचेकडून शिफारस पत्र घेऊन यावें व नंतर त्यांच्या विश्वासाची परीक्षा कमेटीनें घेऊन तो विचार मंडळींत ठेवावा. हें वृत्त कळविण्यासाठीं मि. सावळारामजीस चिटणीसानें पत्र पाठवावें.

२. याच प्रसंगीं शतकोत्सवाप्रीत्यर्थ मुंबईस व अहमदनगरास जाणाऱ्यांची वेगवेगळी याद करण्यासाठीं एक कमेटी बहुमतानें नेमण्यांत आली, ती येणेंप्रमाणें:- १. मि. दानिएलराव सूर्यवंशी.

✓ मि. दानिएल दिवे यांच्या मुलाचा मृत्यु ता. २५।८।१३ रोजीं झाला.

District Aikya

सातारा प्रांताच्या स्थानिक ऐक्याची बैठक होण्यासंबंधानें आमंत्रण आल्यावरून ता. 30 सप्टेंबर सन १९१३ या रोजीं पाळकाच्या सांगण्यावरून मंडळीची बैठक झाली. रितीप्रमाणें चिटणीसानें स्थानिक ऐक्याचें आमंत्रण पत्र वांचून दाखविलें व पाळकानें असा आशय पुढें ठेविला कीं, या स्थानिक ऐक्याच्या सभेला पाळक व प्रतिनिधी पाठवावे. सर्वानुमतें असें ठरलें कीं, पाळक व मंडळीचे चिटणीस बळवंत नवागीरी शिवाय मि. ज्ञानिरळराव सूर्यवंशी व मि. हणवंतराव गायकवाड यांनीं प्रतिनिधी या नात्यानें सभेस जावें. व या कार्यासाठीं जाण्यायेण्याचा खर्च जितका लागेल तितका मंडळीच्या खजिन्यांतून घ्यावा.

२. शास्त्र प्रसारक मंडळीची मागणी या संबंधाचा आशय पाळकानें मंडळीपुढें ठेविला, व सर्वानुमतें असें ठरलें कीं पांच रूपये मंडळीच्या खजिन्यांतून या कामासाठीं पाठवावें. शेवटीं मि. डोवडराव ढाळवाणी यांनीं प्रार्थना केल्यावर मंडळीची बैठक बरखास्त झाली.

तारीख ९/१२/१३ या रोजीं मंडळीची बैठक बसली. मंडळीचा चिटणीस येथें नसल्यामुळें तात्पुरता चिटणीस मि. बी. पी. जाधव यास करण्यांत आलें. नंतर पूर्वीचे चिटणीस मि. बी. एस्. गिरी यांचा राजीनामा वाचून दाखविला. तो सर्वानुमतें पत्करण्यांत आला. व त्यास वडाळें येथील मंडळींत मिळण्याची परवानगी दिली. नंतर चिठ्या टाकून मंडळीचे कारभारी नेमण्यांत आले. रे. हरिबा गायकवाड यास बहुमतें मंडळीचे कारभारी असें ठरविण्यांत आलें. मग चिटणीसाचीही निवड चिठ्या टाकूनच झाली. बहुमतें मि. नानाजी कांबळे हे चिटणीस असावेत असें ठरलें. पण त्यांचें नांव मंडळींत नसल्यामुळें त्यास 1913 अखेरपर्यंत मात्र चिटणीस निवडण्यांत आलें.

ता: १६/१२/१३ मंडळी बसली. मग मि. नानाजी कांबळे यांचे सोलापुराहून आलेलें परवानगी वाचून दाखविलें. सर्वानुमतें तें परवानगी पत्र मंडळीनें पत्करिलें व मि. नानाजी कांबळे यास सातारा येथील मंडळींत घ्यावें असें ठरलें. मग सोलापुराहून दुसरें आलेलें पत्र वाचून दाखविलें. त्याचा आशय असा होता कीं, सोलापूर येथील मंडळी स्थापून ५० वर्षे झालीं. या साठीं एक प्रसंग होणार आहे. या प्रसंगासाठीं साताऱ्याहून पाळक व प्रतिनिधी यावें असें होतें. मग ही खर्चाची गोष्ट आहे. म्हणून या गोष्टीवर आठ दिवस विचार करावा अशी मिसेस न्युजेंटनें सूचना दिली. बहुमतें ती गोष्ट ८ दिवस पर्यंत थांबवावी असें ठरलें.

मग ख्रिस्तजयंती संबंधानें एक जेवण असावें. असा प्रश्न स्थांडिंग कमेटीपुढें आला होता तेव्हां कमेटीनेंच ठरविलें होतें कीं, मंडळीपुढें हा प्रश्न आणावा. म्हणून मंडळीपुढें ही गोष्ट आणिली. तर मंडळीनें ठरविलें कीं, या साठीं एक कमेटी नेमावी. व त्या कमेटींत रे० हरिबा गायकवाड, मि० डानिएल सूर्यवंशी व मिसेस शेवंतीबाई पवार हे असावेत असें ठरलें. यांनीं ~~मंडळी~~तील भावांचा विचार घ्यावा कीं, जेवण करावें किंवा नाहीं? व यासाठीं वर्गणी ~~काय~~ काय करावी?

२३/१२/१९१३ या रोजीं जेवणासबंधानें व्यवस्था करणारी जी कमेटी नेमली होती, तिच्या मेंबरांनीं रिपोर्ट दिला, या रिपोर्टवरून जेवणाचा बेत रहित झाला. मग सोलापुरास पाळकानें अगर प्रतिनिधीनें त्यांच्या आमंत्रणावरून जावें किंवा न जावें असा विचार पुढें आला. बहुमतें असें ठरलें कीं चिटणीसानें सोलापूर येथील मंडळीस एक पत्र पाठवावें कीं "तुम्हासाठीं व मंडळीसाठीं आम्ही प्रार्थनेंत आठवण ठेवूं ईश्वरानें आपल्या मंडळीस जास्त आशीर्वाद द्यावा म्हणून त्याची सतत प्रार्थना करूं." एका दिवसासाठीं पाळकानें अगर प्रतिनिधीनें जाऊं नये.

अमेरिकन मिशन संबंधांतील सातारा येथील ख्रिस्ती मंडळीची १९१३ सालाची हकीकत.

Report of Satara Church - for 1913

आमच्या मंडळीमध्यें प्रभुभोजन घेणारे पुरुष ६१ व स्त्रिया ८५ एकूण १४६ आहेत. यंदां मंडळीमध्यें मिळालेले पुरुष ७ व स्त्रिया ९. मंडळींतील लोक पांच स्थळीं राहतात. वाचणारे पुरुष व स्त्रिया मिळून १०० आहेत. यंदां परवानगी पत्रानें गेलेले ८ व परवानगी पत्राच्याद्वारें मंडळींत घेतलेले ११. मंडळींत बाप्तिस्मा पावलेलीं लेंकरें ११७ आहेत. यंदां २ लेंकरांचा बाप्तिस्मा झाला. बाप्तिस्मा पावलेल्या लेंकरांपैकीं मंडळींत मिळालेले १४. ह्या वर्षीं एकच मृत्यु झाला.

मंडळीच्या उपासनेच्या संस्था:- शाब्बाथशाळा, रविवारची संध्याकाळची भक्ति, मंगळवारची प्रार्थनेची मंडळी, शुक्रवारची संध्याकाळची यत्न करणारी सभा, मुलांमुलींची बाल सभा, शाब्बाथ शाळेचा शिक्षकांचा वर्ग, उमेदवारांचा वर्ग व गायक वर्ग इत्यादि नेमाप्रमाणें चालू आहेत.

शाब्बाथ शाळा:- या संस्थेचे पुढारी आपल्या मंडळीचे पाळक रे० पी. डी. मकासरे हे आहेत. शाब्बाथ शाळेंतील विद्यार्थी व शिक्षक नेमाप्रमाणें येऊन आपापलीं कामें चांगलीं करितात. शाब्बाथ शाळेचे पुढारी मुलांमुलींच्या मनांत शाब्बाथ शाळेचा धडा चांगला ठसेल अशा रीतीनें सांगतात व तेणेंकरून मुलांमुलींना शाब्बाथ शाळेचा धडा चांगला समजून ईश्वरी समक्षतेंत आपण राहावें म्हणून प्रयत्न करितात. या शाब्बाथ शाळेस मिसेस ली. ह्या मनापासून झटतात. विद्यार्थी वर्ग व शिक्षकवर्ग यांनीं आपापलीं कामें अधिक उत्तेजनानें करावींत म्हणून उपाय योजितात. याबद्दल मंडळी त्यांचें अभिनंदन करिते. तसेंच मल्हार पेठेच्या शाळेमध्यें व मंडईमध्यें शाब्बाथ शाळा चालतात. मल्हारपेठेच्या शाब्बाथ शाळेचे पुढारी मि. डी. डी. सूर्यवंशी हे आहेत. हे व त्या शाब्बाथ शाळेच्या संबंधांतील असलेले शिक्षक मनापासून काम करितात. विद्यार्थ्यांच्या संख्येचें सरासरीचें मान ९० आहे. त्या वर्षीं १० मुली व २२ मुलगे युनियन संडेस्कूलच्या परीक्षेस बसले होते. त्यांपैकीं ३० जणांनीं

सर्टिफिकेट्स मिळविलीं म्हणून आनंद वाटतो. या शाब्बाथ शाळेस मिस न्युजंट चित्रद्वारें मदत करितात. मंडईंतील शाब्बाथ शाळेचे पुढारी वडील पाळक रे॰ हरिबा गायकवाड हे आहेत. पुढारी व आणखी तीन शिक्षक हे शाब्बाथ शाळेचें काम उत्सुकतेनें करितात. ह्या शाब्बाथ शाळेमध्यें शाब्बाथ शाळेच्या पत्रिकेवरून धडे शिकविण्यांत येतात. व त्यांना प्रश्न केले असतां त्यांचीं उत्तरें चांगलीं देतात. व सुवर्णवचन मुखपाठ म्हणतात म्हणून आनंद वाटतो. विद्यार्थ्यांच्या संख्येच्या सरासरीचें मान ९० आहे. या शाब्बाथ शाळेस मिस न्युजंट जात असतात. व ती शाब्बाथशाळा मोठ्या भरभराटीस यावी म्हणून फार प्रयत्न करितात व कळकळ बाळगतात. म्हणून मंडळी त्यांचे आभार मानिते.

रविवारची संध्याकाळची भक्ति:- आमचे रविवारचे प्रसंग आमच्या मंडळीचे पाळक रे॰ पी. डी. मकासरे हे नियमाप्रमाणें चालवितात. त्यांचे उपदेश फार आत्मीक लाभाचे व उत्तेजनदायक असतात. मंडळीचें पाऊल ख्रिस्ती जिण्यांत व शुभवर्तमानाच्या सेवेंत पुढें असावें म्हणून त्यांचे प्रयत्न असतात. तसेंच मंगळवारची प्रार्थनेची मंडळी ते आस्थेनें चालवितात. या प्रार्थनेच्या प्रसंगीं अनेक आस्थेवाईक प्रार्थना करण्यांत येतात, व ख्रिस्ती अनुभव सांगण्यांत येतात. मधून मधून या प्रार्थनेच्या मंडळीचें पुढारीपण मंडळींतील कांहीं बंधु करितात.

ख्रिस्ती यत्न करणारी सभा:- ही अगदीं नेमानें चालते. या सभेचे अध्यक्ष मि. डी. के. ढालवणी व सेक्रेटरी मि. डी. डी. सूर्यवंशी हे आहेत. ते आपापलीं कामें नियमीतपणानें करितात. व तींतील सभासद अनेक प्रकारें सभेमध्यें भाग घेऊन सभेस मदत करितात. ह्या सभेच्या आत्मीक वाढीसाठीं मिस न्युजंट व मिसेस् ली ह्या मनापासून कळकळ बाळगतात. व सभेस उत्तेजन देतात.

मुलांची बालसभा:- दर रविवारीं शाब्बाथ शाळा संपल्यानंतर भरत असते. या सभेचे मसलतगार व व्यवस्थापक मिस न्युजेंट आहेत. या सभेच्या सभासदांकडून सभेचीं सर्व कामें नियमीतपणें करून घेतात. व मुलेंही प्रत्येक आठवडीं आपापला भाग चांगल्या तयारीनें व दक्षतेनें करितात. ह्या सभेच्यामार्फे शतकोत्सवासाठीं २५ रुपये, बायबल सोसायटीसाठीं ५ रुपये व नॅशनल सोसायटीसाठीं ३ रुपये एकूण 33 रुपये पाठविण्यांत आले.

मुलींची बालसभा:- ही दररविवारी मिसेस हिंवाळे यांच्या बंगल्यांत त्यांच्या अध्यक्षतेखालीं भरत असते. मुली आपापला भाग चांगल्या तयारीनें करून जातात. मिसेस हिंवाळे या सभेसाठीं झटतात व मुलींस उत्तेजनपर गोष्टी सांगून सभेची आत्मीक गुणांत वाढ व्हावी म्हणून प्रयत्न करितात.

उमेदवाराचा वर्ग:- आमच्या मंडळीचे कारभारी वडील पाळक रे॰ हरीबा गायकवाड व मि॰ एच. जे. गायकवाड हे या वर्गाला धर्मसंबंधी शिक्षण उत्तम तऱ्हेनें देतात. वरचेवर आमच्या मंडळीचे पाळक त्या वर्गात जाऊन धर्मसंबंधाच्या ठोकळ व मुख्य विषयासंबंधानें माहिती देतात. ह्या सालीं या वर्गांतून मुलें व मुली मिळून १४ मंडळीमध्यें घेतले गेले.

शाब्बाथ शाळेच्या शिक्षकांचा वर्ग:- हा वर्ग मि. डी. के. ढालवणी दर मंगळवारीं घेत असतात. व त्यासंबंधानें शाब्बाथ शाळेंतील मुलें व मुली

यांस ज्या रीतीनें स्पष्ट धडा होईल, अशा रीतीनें शाब्बाथ शाळेंतील धड्याचा सार देतात. या त्यांच्या साह्याबद्दल मंडळी त्यांचे अभिनंदन करिते.

गायक वर्ग:- आमचे रविवारचे प्रसंग अधिक भक्तीशीलतेचे व्हावे म्हणून शिक्षक व शिक्षिका व मंडळींतील इतर भाउ यांच्या साह्यानें मिसेस ली बराच त्रास सोसून, काळजीपूर्वक रीतीनें आणि नेमानें गायनांची सिद्धता करून आमच्या मंडळीस मदत करितात, याबद्दल मंडळी त्यांचे आभार मानिते.

विशेष प्रसंग:- ह्या वर्षी दोन झाले. एक सातारा येथें मार्च तारीख ९ व १० या रोजीं झाला. त्या प्रसंगीं वांई, सातारा व कोरेगांव या मंडळ्यांचें स्थानिक ऐक्य स्थापण्यांत आलें. या प्रसंगासाठीं वांई, कोरेगांव येथील शिक्षक व शिक्षिका, उपदेशक व उपदेशिका सातारा मुक्कामीं हजर होत्या. या विशेष प्रसंगासाठीं आमचे नगरचे वडील मिशनरी रे॰ डा॰ ह्युम व रे॰ तुकारामजी नयोजी हेही हजर होते. या प्रसंगासाठीं धर्मशीलतेसंबंधीं विषयांची योजना यथासांग केली होती. ज्यांच्याकडे भाषणें होतीं त्यांनीं चांगली तयारी करून आम्हांसर्वांस आत्मीक लाभ व उत्तेजन दिलें. स्थानिक ऐक्याचा हेतु ख्रिस्ती ऐक्यामध्यें व मंडळीच्या कार्यमध्यें व शुभवर्तमानाच्या सेवेमध्यें अधिक जिव्हाळ्याचा व्हावा म्हणून आमचे लोकप्रिय व वडील मिशनरी रे॰ डा॰ ह्युम साहेब यांनीं उत्तम रीतीनें स्पष्टीकरण केलें. व स्थानिक ऐक्याची स्थापना केली.

दुसरा प्रसंग:- स्थानिक ऐक्यानें ठरविल्याप्रमाणे उरतडे मुक्कामीं झाला. या प्रसंगासाठीं वांई, सातारा व कोरेगांव येथील मिशनरी मंडळ, मंडळ्यांचे पाळक व प्रतिनिधि, पुढारी बंधु व भगिनी हजर होत्या. त्या वेळीं मंडळ्यांचे रिपोर्ट वाचण्यांत आले. ज्यांच्याकडे भाषणें होतीं तीं चांगलीं चरकदार असून उत्तेजन दायक होतीं. या सभेच्या वतीनें अमंत्रीत रे॰ इमामपक्षवारा यांनीं फारच मार्मिकतेचें, मोठ्या गंभीरपणें भाषण केलें. त्या प्रसंगीं मिसेस सिब्ली, व मिस गॉर्डन यांनीं जमलेल्या सर्व पाहुण्या मंडळीचें आदरातिथ्य केलें. एकंदर तो प्रसंग मोठ्या आत्मीक लाभाचा झाला.

नाताळाचे प्रसंग:- सकाळचा एक व सायंकाळीं एक, ख्रिस्ती जयंतीच्या उत्सवानें भरलेले होते. मुली, मुलें व शिक्षक व शिक्षिका यांनीं आपापल्या खेळण्याकडून ख्रिस्तजयंतीचा आनंद प्रदर्शित केला.

मिस न्युजेंट व मिसेस ली ह्या या मंडळीची आत्मीक गुणांत वृद्धि व्हावी व ख्रिस्ती जिण्यांत इचें पाऊल पुढें असावें म्हणून पुष्कळ प्रयत्न करितात. व रे॰ ए. एस. हिंवाळे आपलें काम संभाळून मंडळीची मदत करितात. मंडळीच्या जबाबदारीचें जूं भारी जोखमीचें आहे. हें जूं मिस न्युजेंट सुयंत्रितपणें चालवितात म्हणून आनंद वाटतो. मंडळीसंबंधीं त्यांचे जे बेत असतील ते ईश्वर सिद्धीस नेवो. व हें काम करण्यासाठीं त्यांस अधिक शक्ति देवो.

मंडळीचा चिटणीस.
नाना टी. कांबळे

३०/१२/१९१३ मंडळीची बैठक बसली. त्यावेळीं चिटणीसाकडून वार्षिक रिपोर्ट वाचण्यांत आला. या रिपोर्टांत खालील गोष्टी असाव्या १ जन्म कोण कोणाचा झाला? २ बाप्तिस्मा झालेल्यांची (मुलांची तारीख) मंडळीच्या बुकांत नमूद करावी. हा रिपोर्ट पंचामार्फत तयार करून मंडळीपुढें यावा. या पंचांत रे० पी. श्री. मकासरे. रे० हरिबा गायकवाड. मि० हणमंतराव गायकवाड व मि. नानाजी कांबळे हे असावेत. मग खजिनदाराकडून रिपोर्ट वाचण्यांत आला. मग जेवणासंबंधी म्हणजे नवीन वर्षासाठीं जेवण व्हावें. या संबंधी जी कमेटी नेमली होती. तिनें रिपोर्ट दिला. यावरून असें बहुमतें ठरलें कीं, जेवणाचा विचार रद्द करावा.

२८/१/१९१४ या रोजीं सभेची बैठक बसली. आरंभीं रे० ह० गायकवाड यांनीं प्रार्थना केली व कामास सुरवात झाली. प्रश्न हा होता कीं, "रविवार तारीख ८-ची जमा ख्रिस्ती यत्न करणाऱ्या सभेस द्यावी. बहुमतें तें ठरलें. दुसरा प्रश्न हा होता कीं सेंटनरी फंडासाठीं महिन्यांतील एक आठवडा द्यावा. तो कोणता आठवडा असावा. म्हणून बराच विचार झाला. शेवटीं हा प्रश्न स्थांडींग कमेटीनें पुढें घ्यावा. व स्थांडिंग कमेटी ठरवील त्याप्रमाणें करावें.

३/२/१९१४. मंडळीची बैठक बसली. त्यावेळीं सेन्टनरी फंडासाठीं स्थांडींग कमेटीनें ठरविल्याप्रमाणें दरमहा २ रुपये; म्हणजे जून अखेरला १२, व डिसेंबर अखेरला १२ एकूण २४ रुपये द्यावेत. व ती रक्कम उच्च प्रतीच्या शिक्षणासाठीं. ही रक्कम उच्च प्रतीच्या शिक्षणासाठीं असावी म्हणून चिटणीसानें सेन्टनरी फंडाचे चिटणीस यास पत्र पाठवून सांगावें. त्याच वेळीं फेब्रुवारीची १२ तारीख हि. सेंटनरी फंडासाठीं स्मारक म्हणून मानिली जावी; तर तो दिवस कसा घालवावा? या गोष्टीवर असा विचार झाला कीं बागेंत फिरावयास जावें, व तेथें कांहीं तरी फलाहार व्हावा. तर त्या प्रसंगीं कोण कोण येणार? याविषयीं माहिती मिळावी म्हणून मि० धनाजी चांदकर व मि० हणमंतराव यास कमेटीचे सभासद नेमिले. मग पाळकाचा पगार वाढवावा व तो किती वाढवावा हा प्रश्न पुढें आला. मिस् न्युजेंटबाईसाहेबांनीं या विषयीं म्हणजे मंडळींतील पैशाविषयीं व पाळकाच्या घराविषयीं बरेंच स्पष्टीकरण केलें. यासाठीं एक कमेटी नेमावी. व कमेटीनें मंडळींतील सर्व खर्च व बारीक सारीक कामें पाहून पाळकास पगार वाढवावा असें ठरलें. या कमेटींत १ मिस् न्युजेंटबाईसाहेब. २ रे० हरिबा गायकवाड ३ मि० धनाजी चांदकर ४ मि० यशवंतराव सूर्यवंशी हे असावेत असें ठरलें.

१०/२/१९१४ या रोजीं मंडळीची बैठक बसली. आरंभीं मि० सूर्यवंशी यांनीं प्रार्थना केली. मग कामास आरंभ झाला. मग पाळकाचा पगार वाढवा. या संबंधानें जी कमेटी नेमली होती तिनें आपला रिपोर्ट मंडळीला सांगितला. यांनीं मंडळींतील सर्व गोष्टी पाहून मोठ्या विचारानें ठरविलें कीं पाळकास दरमहा ३ रुपये द्यावेत. हा कमेटीचा विचार मंडळीस पसंत झाला. व पाळकास दरमहा ३ रुपये प्रमाणें जो पगार आहे यापेक्षा जास्ती द्यावेत असें ठरलें. दुसरी गोष्ट १२ तारखेस सरकारी बागेंत फिरावयास जायाचें. याप्रसंगीं जो फलाहार व्हायाचा त्यासंबंधाचा खर्च काय असावा? व याची व्यवस्था काय करावी? तर याची व्यवस्था अशी झाली कीं, १ रुपाया मुलांची बालसभा यांजकडून. १ रुपाया

मुलींच्या सभाकडून, व २ रुपये मोठ्या सभेकडून. व ११ रुपये मंडळीकडून. असे १५ रुपायांपर्यंत खर्च व्हावा. मुलांसाठीं रसपान व्हावा. व इतरांसाठीं चहा व कांहीं फळफळावळ व्हावें. हे प्रसंग दोन व्हावेत. म्हणजे सकाळीं ११ वाजेपासून १२ पर्यंत. यत्न करणाऱ्या सभांसाठीं. ४ पासून ५ पर्यंत मंडळीसाठीं. ५ पासून ६ पर्यंत चहासाठीं. व्यवस्थापक कमेटी असावी असें ठरल्यावरून मि॰ धनाजी चांदकर व मि॰ सूर्यवंशी हे या कमेटीचे सभासद असावेत असें ठरलें.

४/१/१९१४. तारीख ४ माहे ज्यानुएरी १९१४ या रोजीं मि॰ जयवंतराव भाकरे यांची मुलगी डायना हिचा बाप्तिस्मा मंडळीचे पाळक रे॰ प्रसादराव मकासरे यांजकडून झाला.

१५/२/१९१४ या रोजीं मि॰ डानिएलराव सूर्यवंशी यांचा मुलगा जेम्स उर्फ हिरालाल व मि॰ बाबुराव जाधव यांचा मुलगा वसंत यांच्या बाप्तिस्म्याचा विधी मंडळीचे पाळक रे॰ प्रसादराव मकासरे यांनीं केला.

२४/२/१९१४ या रोजीं मंडळीची बैठक बसली. आरंभीं धनाजी चांदकर यांनीं प्रार्थना केली मग कामास सुरुवात झाली. मग स्थानिक ऐक्याच्या चिटनीसाकडून आलेलें पत्र वाचण्यांत आलें. या पत्राचा आशय असा होता कीं "स्थानिक ऐक्याची बैठक उरतडें मुक्कामीं होणार आहे. या ऐक्यास सातारमंडळीकडून दोन प्रतिनिधी पाठविण्यांत यावेत. व जितक्यांस येतां येईल तितक्यांस येण्याचें आमंत्रण आहे. मग उंतड्याच्या ऐक्यासाठीं प्रतिनिधी मि॰ डानिएलराव सूर्यवंशी व मि॰ हणमंतराव गायकवाड हे नेमण्यांत आले. तसेंच त्यासाठीं म्हणजे प्रतिनिधी व उरतड्यास जाऊं इच्छिणाऱ्यांसाठीं दोन बैलगाड्यांचा खर्च मंडळीनें द्यावा असें ठरलें.

८/३/१९१४ या रोजीं रे॰ इमामबक्ष बावा यांनीं खालीं लिहिलेल्या छेकरांचा बाप्तिस्मा केला:- १ प्रकाश शिवाजी भोंसले. २ भास्कर नारायण मनोलकर. ३ गंगू गोधाजी जाधव. ४ विमला प्रसादराव मकासरे.

२९/३/१९१४ या रोजीं रे॰ प्रसादराव मकासरे यांनीं रत्नमाला धनाजी चांदकर इचा बाप्तिस्मा केला.

१४/४/१९१४ या रोजीं मंडळीची बैठक बसली. त्यावेळीं मि॰ दादाजी सगळगीळे यांचें परवानगी पत्र चिटणीसानें वाचून दाखविलें. मग त्यास बहुमतें म्हणजे दादाजी सगळगीळे यास मंडळींत घ्यावें असें ठरलें.

१९१४ साल. सातारा मंडळीतील प्रभुभोजन घेणाऱ्या लोकांची याद. १९१४

List of Satara Church Communicants 1914

१ प्रसादराव विठ्ठल मकासरे.
२ वेणाबाई कृष्णाजी भोंसले
३ विठोबा गुजाजी गायकवाड
४ सावित्राबाई विठोबा गायकवाड
५ दाविदराव कासमभाई दालवणी
६ कृष्णाजी पिराजी भोंसले
७ शेवंतीबाई टी. आढाव
१० सुजानराव का. दालवणी
११ सखारामजी हणगु कांबळे
१२ आलीसाबेतबाई वि० मकासरे
✓ १३ काशीबाई आबाजी तरेरे
१४ गोविंदराव परशराम भागवत
१६ निलकंठराव का. दालवणी
१७ नानूबाई पर्वतराव कांबळे.
20 १९ रत्नाकरराव का. दालवणी
२२ बाबाजी लक्ष्मण काकडे
२३ गंगुबाई वि. जोशी ✓
२७ गौजराबाई विठोबा गायकवाड
२८ विठाबाई सखाराम कांबळे
२९ आनंदराव पर्वतराव कांबळे
३० आवाबाई लक्ष्मन काकडे
३२ भागुबाई सखाराम जगताप
३३ राही धोंडीबा कांबळे वारली नागरास.
३५ बाबुराव पिराजी जाधव
३६ हणमंतराव गायकवाड
३७ यमुनाबाई एच. गायकवाड
३९ सावित्राबाई बी. जाधव
४३ मुक्ताबाई देवजी कांबळे
४५ हरिबा धोंडीबा कांबळे ✓
४६ हिरा सुलेमान शेख
४८ सायरस वि० मकासरे
५० आनंदी गणपत काकडे
५१ तायनी कृष्णाजी ✓
५२ रत्नाकरराव एच गायकवाड
५३ जाईबाई पिराजी जाधव
५८ मारुती लक्ष्मण काकडे
५९ कुंडलीक देवजी कांबळे

६०	भाऊराव जनोबा पवार	
६१	आनंदराव स. कांबळे	कोरेगांव मंडळींत मिळण्याची परवानगी दि
६२	गंगू पिराजी	
✓ ६३	तायनी श्रावण कांबळे	
६६	फुलाबाई कृष्णाजी हिंवाळे ✓	
६७	सुमतीबाई शाहूराव गायकवाड	
६९	ग्रेस हणमंतराव गायकवाड	
७०	गया नानाजी गायकवाड	
७१	आकू पर्वती कांबळे	
७२	केचर पिराजी	
७५	वाघळा पुंजाजी	
७६	बेचर रणछोडजी	
७७	श्रावण धोंडीबा कांबळे ✓	
७९	सिताम्मा नेट्टी पोचारी	
८०	हरिबा गायकवाड	
८१	येसाबाई गायकवाड	
९२	बाबु बापुजी भालेकर	
९४	मालतीबाई रि. अल्हाट	
९५	लिया सदोबा खंडागळे	
९६	बायजा महादू पाजी ?	
९७	एस्तेर बेचरलाल	
९८	भागुबा पां. मगर	
९९	कोंडीराम पांडुरंग छीडदार	
१०१	रंभा ग्यानोबा कांबळे	
१०२	कमळावती दाजीबा जाधव	
१०४	शाहूराव गायकवाड	
✓ १०५	बळभीम लोंढे	
१०६	शेवंतीबाई पवार	
१०७	एकनाथराव साळवे	
१०८	ताईबाई ए. हिंवाळे	
११२	सावित्रीबाई ए. साळवे	
११३	सुंद्राबाई पंडीत	
✓ ११५	गोजराबाई तुकाराम कसाब	
११७	विश्रामजी रावबा सिरपगार	वांई मंडळींत मिळण्याविषयींचें परवानगी प दिलं. ६/१०/१४
✓ ११८	जानकाबाई लोंढे	
१२१	यशवंतराव धोंडीबा सूर्यवंशी	
१२२	लिलावतीबाई सूर्यवंशी	
१२३	धनाजी चांदेकर	
१२४	शेवंतीबाई चांदेकर	
१२५	आनंदराव मगर	

१९१४ साल सातारा मंडळींतील प्रभुभोजन घेणाऱ्या लोकांची याद. १९१४

1914

१२७ सिताबाई उंद्रे
१२८ दानियलराव द्विवे
१२९ सुवार्तबाई द्विवे
१३० लिलावतीबाई ह. गायकवाड
१३१ लारा कृष्णाजी हिंवाळे
१३२ मनोरमा पवार
१३३ गिता फणसाळकर
१३४ मालती गायकवाड
१३५ मालन भागवत
१३६ राजस कृष्णाजी हिंवाळे
१३७ बायजा भोंसले
१३८ गुलाब हुसेन शेख
१३९ सात्विक कृष्णाजी हिंवाळे
१४० प्रभाकर गोविंदराव भागवत
१४१ डेविड धनाजी चोहकर
१४२ विल्सन दानिएलराव द्विवे.
१४३ वामन कैरोबा गायकवाड
१४४ चंद्रिकाबाई गायकवाड
१४५ मि. जोजेफ पिले
१४६ नानाजी टी. कोंबळे
१४७ दादाजी सं. सगळगिळे.
१४८ गणू भिवा डिके.

१९१४ सालांत बाप्तिस्मा पावलेल्या लेंकरांचीं नांवें.

Baptized in 1914

१	आयना जयवंतराव भाकरे.	ता. ४/१/१४
२	जेम्स हिरालाल दा॰ सूर्यवंशी.	१५/२/१४
3	वसंत बाबुराव जाधव	१५/२/१४
४	प्रकाश शिवाजी भोसले	८/३/१४
५	भास्कर नारायण मनोलकर	८/३/१४
६	गंगू गोधाजी जाधव	८/३/१४
७	विमला प्रसादराव मकासरे.	८/३/१४
८	कृपा दाजिबा जाधव	२७/९/१४
९	सुमित्र आनंदराव मगर	२७/९/१४
१०	जाई आनंदराव मगर	२७/९/१४
११	प्रिस्किला दानियल दिवे	१८/१०/१४
१२	रत्नमाला धनाजी चांदेकर	२९/३/१४

तारीख ११-५-१४ या रोजीं मंडळीची बैठक बसली. मंडळीचा चिटणीस सुटीला गेल्यामुळें तात्पुरता चिटणीस मि॰ आनंदराव कांबळे यास नेमिलें. नंतर सा. सा. ऐक्याचें चिटणीसाचें आलेलें पत्र वाचून दाखविण्यांत आलें त्याप्रमाणें मि॰ गंगारामजीच्या दिक्षेसाठीं प्रतिनिधी मिसेस ताईबाई हिंवाळे या सातारा मंडळीच्या तर्फे निवडल्या गेल्या. याचवेळीं पाळक व प्रतिनिधी यास सदरहू प्रसंगास जाण्यायेण्यासाठीं गाडीभाडें सुमारें २॥ रुपायापर्यंत द्यावें असें ठरलें.

तारीख १३/५/१४ या रोजीं विशेष अगत्याच्या कामासाठीं कमेटी बसली. त्यावेळीं मि॰ आनंदराव कांबळे यास तात्पुरता चिटणीस नेमिले. त्यावेळीं एक गाडी करावी. व तिचा खर्च मंडळीच्या खजिन्यांतून करावा (कोरेगांवास जाण्यासाठी) अशी सूचना आली. ती बहुमतें पास झाली. खर्च ३ रुपये करावा. मि॰ हणमंतराव गायकवाड व मि॰ दानियलराव सूर्यवंशी हे प्रतिनिधी असावेत. हेंही बहुमतें ठरलें.

तारीख ८/८/१४ मंडळीची बैठक बसली. आरंभीं पाळकांनीं प्रार्थना केली. नंतर कामास आरंभ झाला. मग चिटणीसानें कोरेगांव व शिवथर येथून आलेलीं पत्रें वाचून दाखविलीं. त्याचा आशय असा होता कीं, 'परवानगी पत्र पाठवून द्यावेंत.' मग असें ठरलें कीं, चिटणीसानें त्यांचीं नांवें मंडळीच्या बुकांत पाहावीत. व नांवें असल्यास चिटणीसानें कोरेगांवच्या मंडळीच्या चिटणीसाकडे पाठवून द्यावेंत.

मि॰ बळवंतराव यास परवानगी पत्र पाठविलें.

मि॰ आनंदराव कांबळे यास कोरेगांव मंडळींत मिळण्याविषयीं परवानगी पत्र दिलें.

तारीख ३/९/१४ या दिवशीं मंडळीची बैठक स्टेशनस्कूलमध्यें भरली. आरंभीं रे॰ मकासरे यांनीं प्रार्थना केली व कामास सुरुवात झाली. पहिला प्रश्न हा होता कीं, युरोपामध्यें जी लढाई चालू आहे त्यासाठीं म्हणजे आपली सहानुभुति दाखविण्यासाठीं आपल्या मंडळींतून कांहीं तरी पैसे पाठवावेत. विचारांतीं असें ठरलें कीं, तारीख ६ या रोजची जमा म्हणजे रविवारची तारांतील जमा जी येईल ती तिकडे पाठवावी. व बहुमतें तें ठरलें. दुसरा प्रश्न हा होता कीं, बैबल सोसैटीसाठीं नियमाप्रमाणें म्हणजे नेहमीं जें पाठवीत असतों त्याप्रमाणें आतांही कांहीं पाठवावें. मग रे॰ हरिबा गायकवाड यांनीं सूचना केली कीं, नेहमींप्रमाणें या सोसायटीसाठीं आपण पांच रुपये पाठवावेत. बहुमतें तें ठरलें. शेवटीं मंडळीच्या पाळकांनीं प्रार्थना केली. व बैठक बरखास्त झाली.

तारीख २०/९/१४ या रोजीं रे० प्रसादराव मकासरे यांनी खालीं दिलेल्या म्हणजे लिहिलेल्या लेंकरांस बाप्तिस्मा दिला. १ कृपा दाजीबा जाधव. २ सुमित्र आनंदराव मगर. ३ जाई आनंदराव मगर.

ता. २८/८/१४ या दिवशीं मंडळीची बैठक बसली. आरंभीं रे० प्रसादराव मकासरे यांनीं प्रार्थना केली. मग चिटणीसानें मि. मिरपगार यांचें आलेलें परवानगी पत्र वाचून दाखविलें. सर्वानुमतें त्यास परवानगीपत्र द्यावें असें ठरलें.

मग उरतज्यास जें ऐक्य भरणार होतें तेथें जो मंडळीचा वार्षिक रिपोर्ट वाचून दाखवावयाचा तो चिटणीसानें वाचून दाखविला. बहुमतें तो रिपोर्ट कमेटीनें होतां होईल तेवढा लहान करावा असें ठरलें. या कमेटींत १ रे. प्रसादराव मकासरे २ रे. हरिबा गायकवाड ३ मि. डानिएलराव सूर्यवंशी व चिटणीस म्हणजे नानाजी कांबळे हे असावेत असें ठरलें.

उरतज्यास आपल्या मंडळीकडून मि. हणमंतराव गायकवाड व चिटणीस मि. नानाजी कांबळे हे प्रतिनिधी असावेत. व उरतज्यास जाण्यासाठीं मंडळीकडून दोन गाड्या द्याव्यात व त्यांच्यासाठीं पांच रुपायांपर्यंत खर्च करावा असें ठरलें. एक गाडी बायासाठीं व एक प्रतिनिधींसाठीं व इतर जाणारे जे असतील त्यांसाठीं.

तारीख ११/१०/१४ या दिवशीं मंडळीचे पाळक रे० प्रसादराव मकासरे यांनीं गणू भिवा ठिके याचा बाप्तिस्मा केला. गणू भिवा ठिके हा परधर्मी मनुष्य वय अजमासें २७ असून ख्रिस्ती धर्माविषयीं बऱ्याच दिवसापासून विचार करीत होता, व त्याच दिवशीं त्यास मंडळींत घेतलें.

१८/१०/१४ प्रिस्कीला डानिएल दिवे हीचा बाप्तिस्मा रे. प्रसादराव मकासरे यांनीं केला.

'अमेरिकन मिशन सातारा येथील ख्रिस्ती मंडळीची
१९१४ सालाची हकीकत.'

1914 Report

आपल्या मंडळीमध्यें प्रभुभोजन घेणारे पुरुष ४५ व स्त्रिया ५२ एकूण ९७ आहेत. यंदां मंडळीमध्यें परवानगी पत्रद्वारें आलेला १. व परधर्मी ख्रिस्ताचा स्विकार करून मंडळींत आलेला १. एकूण २. परवानगी पत्रद्वारें गेलेले २. मंडळींतील लोक ४ स्थळीं राहतात. वाचणारे पुरुष व स्त्रिया मिळून ८० आहेत. बाप्तिस्मा पावलेल्या लेंकरांची संख्या ६७ आहे. यंदां १२ लेंकरांचा बाप्तिस्मा झाला. या सालीं मृत्यूचें बोलावणें आमच्या मंडळींत कोणास झालें नाहीं म्हणून ईश्वराचे उपकार मानितों.

१९१३ सालाची शिल्लक. १०५ रुपये १ आ. ३ पै. व आजपर्यंतची जमा ८४८ रु. १ आ. १० पै. एकूण ९५३ रु. ३ आ. १ पै. आहे.

मंडळीच्या उपासनेच्या संस्था शाब्बाथशाळा, रविवारची संध्याकाळची भक्ति मंगळवारची संध्याकाळची प्रार्थनेची मंडळी, शा. शाळेच्या शिक्षकांचा वर्ग, गायनाचा वर्ग, शुक्रवारची यत्न करणारी सभा, मुलांमुलींच्या सभा, शनिवारचा उमेदवाराचा वर्ग इत्यादि संस्था नियमाप्रमाणें चालू आहेत.

शाब्बाथ शाळा:– आमच्या इकडे ५ शाब्बाथशाळा अगदीं नियमाप्रमाणें चालत आहेत. त्या अनुक्रमें स्टेशनस्कूल, मल्हारपेठ स्कूल, शनिवार पेठ स्कूल व करंजें या ठिकाणीं भरत असतात. स्टेशनस्कूलमध्यें विद्यार्थ्यांची संख्या ७१ आहे. तिची जमा २८ रुपये आहे. या शाब्बाथ शाळेची ख्रिस्तसेवेंत प्रगति व्हावी म्हणून मिसेस ली मडमसाहेब मनापासून झटतात. शाब्बाथ शाळेंतील मुलांमुलींनीं सतत हजर राहावें व त्यांस उत्तेजन प्राप्त व्हावें म्हणून त्यांनीं कांहीं योजना केल्या आहेत. त्याचप्रकारें मल्हारपेठ व शनिवारपेठ या ठिकाणीं परधर्मी मुलांमध्यें शाब्बाथ शाळेचें काम चालू आहे. या शाब्बाथ शाळेस मिस न्युजंट सतत जाऊन चित्रद्वारें मदत करतात व मुलांमुलींस शाब्बाथ शाळेची आवड व गोडी लागावी म्हणून उपाय योजतात. या शाब्बाथ शाळांमध्यें मुलांमुलींची संख्या अनुक्रमें ८५ व ४५ आहे. शाब्बाथ शाळेच्या संबंधांत जे शिक्षक व शिक्षिका आहेत तीं आपापलीं कामें मोठ्या दक्षतेनें करितात. स्टेशनस्कूलच्या शाब्बाथ शाळेचे पुढारी मंडळीचे पाळक रे. पी. व्ही. मकासरे, मल्हारपेठेंतील मुलांच्या शाब्बाथ शाळेचे पुढारी मि. डी. डी. सूर्यवंशी व मुलींच्या शाब्बाथ शाळेचे पुढारी मिसेस सावित्राबाई साळवे. शनिवारपेठेंतील शा. शाळेचे पुढारी रे. हरिबा गायकवाड हे आहेत. या शाब्बाथ शाळांची आत्मिक जिण्यांत वाढ व्हावी व विद्यार्थीजनांस ख्रिस्तसेवेची अभिरुचि लागावी म्हणून पुढाऱ्यांची योजना असते.

रविवारची संध्याकाळची उपासना:– ही नियमाप्रमाणें चालत असते. मंडळीचे पाळक आपल्या उपदेशानें मंडळींतील लोकांस सतत उत्तेजीत व जागृत ठेवतात.

मंगळवारची प्रार्थनेची मंडळी:– हीही नियमाप्रमाणें भरत असते. या प्रसंगीं मंडळीचे पाळक निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर भाषणें करून भावांस प्रार्थना करण्यास वेळ देत असतात.

शा. शाळेच्या शिक्षकांचा वर्ग:– हा मंगळवारची प्रार्थनेची मंडळी आटोपल्यानंतर मिसेस ली मडमसाहेब घेत असतात. हा पाठ उपयुक्त सूचनांचा व भरपूर माहितींचा असतो.

गायनाचा वर्ग:– आमचे रविवारचे प्रसंग अधिक भक्तीशीलतेचे व्हावेत म्हणून मिसेस ली मडमसाहेब आपला अमोल्य वेळ खर्चून हा वर्ग चालवीत असतात. या त्यांच्या साह्याबद्दल मंडळी त्यांची आभारी आहे.

यत्न करणारी सभा:– ही नियमाप्रमाणें दर शुक्रवारीं ७ वाजतां स्टेशनस्कूलमध्यें भरत असते. या सभेनें एक शाब्बाथ शाळा करंजें मुक्कामीं परधर्मी लेंकरांमध्यें काढली आहे. तसेंच या सभेकडून करंजें, गोलवडी व शनवार पेठ, या ठिकाणांतील लोकांस मॅजीक ल्यांटर्न दाखविण्यांत आलें. त्यावेळीं मिसेस ली मडमसाहेबानें या सभेस मॅजीक ल्यांटर्नचें व फोनोग्राफचें सामान पुरविलें म्हणून सभा त्यांची आभारी आहे.

मुलांची बालसभा :— ही मुलांची सभा दररविवारीं स्टेशनस्कूलच्या हॉलमध्यें शाब्बाथ शाळा सुटल्यानंतर मिस् न्युजंट यांच्या देखरेखेखालीं भरत असते. या सभेचे सभासद आपापलीं कामें चांगलीं करितात. या सभेची आत्मीक गुणांत व ख्रिस्ती सद्गुणांत प्रगति व्हावी म्हणून मिस् न्युजंट फार परिश्रम घेतात व स्वतः हजर राहून मुलांस ख्रिस्त सेवेचें शिस्तवार वळण लावून देतात.

मुलींची सभा :— ही दररविवारीं मुलांच्या शाळेंत मिसेस हिंवाळे यांच्या देखरेखेखालीं भरत असते. या सभेंतील सभासद सभेमध्ये भाग घेऊन एकमेकांस उत्तेजीत करितात. या सभेचें ख्रिस्त मार्गांत पाऊल पुढें पडावेत म्हणून मिसेस हिंवाळे उपयुक्त व उत्तेजनपर भाषणें करून सभासदांस लायक करितात. या सभेकडून अहमदनगरच्या संमेलनास एक सभासद पाठविण्यांत आला.

यत्न करणाऱ्या सभांमध्यें एक नवीन स्फूर्ति देवाच्या आत्म्यानें झाली आहे. आणि ती अशा धोरणानें झाली आहे कीं सातारा येथील ख्रिस्ती समाजांस ख्रिस्तसेवेंत व ख्रिस्ती कार्यांत सहभागी करावें म्हणून सातारा येथील यत्न करणाऱ्या तीन सभांच्याद्वारें कांहीं प्रतिनिधि यांची बैठक झाली. या बैठकीमध्यें ख्रिस्ती यत्न करणाऱ्यासाठीं व ख्रिस्त संघशक्ति होण्यासाठीं कांहीं सामाजिक प्रेमवृद्धीचे प्रसंग घडावेत व यत्न करणाऱ्या सभांचे संमेलनाचे प्रसंग घडावेत म्हणून योजना करण्यांत आल्या. या बाबीमध्यें आमची तरुण मंडळी पुढाकार करीत आहेत.

या वर्षी रे. इमामबक्ष बावा यांची फेरी आली होती. त्यावेळेस आमच्या मंडळीस त्यांच्या आवेशयुक्त उपदेशावरून देवाची थोरवी समजून फार आत्मीक लाभ झाले. त्यांच्याबरोबर आमच्या मंडळींतील भाऊ मेढें मुक्कामीं गेले होते. त्या ठिकाणीं शुभवर्तमान चांगल्या रीतीनें गाजविण्यांत आलें. निदान १००० लोकांस ख्रिस्तवार्ता कळली. संध्याकाळीं त्या ठिकाणीं मॅजीक ल्यांटर्न दाखविण्यांत आलें. तसेंच करंजे, आंबवडें या ठिकाणींही ख्रिस्ताचें शुभवर्तमान गाजविण्यांत आलें. त्यांच्या या फेरीवरून आम्हांस ख्रिस्त सेवेची विशेष गोडी लागली.

तसेंच वाय्. एम्. सी. चे सेक्रेटरी मि० डब्ल्यू. बी. स्मिथ कांहीं महिन्याकरितां येथें आले होते. त्यांनीं आम्हां तरुणामध्यें एक शास्त्रवर्ग काढला. त्यांच्या या वर्गानें आम्हां सर्व तरुणांस शास्त्राभ्यासाची आवड लागली म्हणून मंडळी त्यांचे उपकार मानिते.

रे० हिंवाळे साहेब यांची सातारा मंडळी संबंधानें सहानुभूति आहे. आमच्या पाळकाच्या विनंतीवरून रे० हिंवाळे साहेब आम्हांस स्फूर्तिदायक देवाचा निरोप देतात. व मंडळीची द्रव्यद्वारा मदत करून आपलें प्रेम व्यक्त करतात या बद्दल मंडळी मनापासून त्यांचे उपकार मानिते.

यावर्षीं विशेष प्रसंग एक उडतरें मुक्कामीं झाला. यावेळीं वांई, कोरेगांव व सातारा येथील सर्व शिक्षक व शिक्षिका, उपदेशक व उपदेशिका, व प्रत्येक मंडळी कडून पाळक व प्रतिनिधी व प्रेषितीय वर्ग, आले होते. तेथील प्रसंग उत्तम झाला.

नाताळाचे प्रसंग फारच उत्तम रीतीनें झाले. परधर्मी लेंकरांनीं उत्तम तऱ्हेनें गायनें गाऊन ख्रिस्त जयंतीविषयींचा आनंद प्रदर्शीत केला. संध्याकाळीं यत्न करणाऱ्या सभेकडून कांहीं खेळ झाले. नाताळाच्या व नवीन वर्षाच्या दरम्यान

लोकांस विशेष आत्मीक लाभ व्हावेत, म्हणून मिस् न्युजंट व मिसेस ली मडम साहेब यांनी फार मेहनत घेउन यात्रिक क्रमणाच्या पुस्तकांतील चित्रें मिळविलीं, व त्या चित्रांवर निरनिराळे बोलणारे नेमून मॅजीक् ल्यांटर्नच्यायोगें सर्व लोकांस दाखविलीं, ते प्रसंग फार गंभीर रीतीनें झाले. मिस् न्युजंट यांनी प्रसंगांस उपयोगीं पडतील अशाच गायनांची योजना केलेली होती. या त्यांच्या खटपटीबद्दल मंडळी त्यांचे उपकार मानिते. मॅजीक् ल्यांटर्न दाखविण्याच्या कामीं रे. हेलन साहेब यांनींही साह्य केलें म्हणून त्यांचेही आभार मानिते.

या वर्षी मंडळीनें एक विशेष महत्त्वाचें व जबाबदारीचें काम हातीं घेतलें आहे. तें काम हें कीं, मंडळीसाठीं नवीन मंदिर बांधणें. या कामासाठीं स्टांडींग कमेटीनें पुष्कळ विचार करून या मंदिरासाठीं पैसा कैसा मिळेल याविषयीं योजना केल्या. मग मि॰ धनाजी चांदेकर, मि॰ हणमंतराव गायकवाड व मि॰ आनंदराव कांबळे यांची कमेटी नेमली. ती अशासाठीं कीं, त्यांनीं ज्यांचा या मंडळीशीं संबंध होता अशांशीं पत्रव्यवहार करून पैसा मिळवावा. या बाबतींत मिस् न्युजंट व मिसेस् ली मडम साहेब पुष्कळ खटपट करितात. नवीन मंदिरासाठीं २३८ रु. २ आ. २ पै. इतकी रक्कम जमली आहे. हें जें मंडळीनें हातीं काम घेतलें आहे तें परमेश्वरानें निर्विघ्नपणें पार पाडावें अशी त्याच्याजवळ विशेषेंनी प्रार्थना आहे.

आमच्या ख्रिस्ती सेवेमध्यें व कार्यामध्यें जर कांहीं सद्गुण आहेत तर ते सद्गुण आम्हां व्यक्तींचे नव्हेत पण आमच्या प्रभुचे आहेत. व त्याच सद्गुणांची प्रगति आमच्या ख्रिस्तसेवेंत व कार्यांत व्हावी व आम्ही सर्व ख्रिस्तासाठीं ख्रिस्ताबरोबर सेवा करणारे सेवक व सेविका बनाव्यात अशी आमची महत्त्वकांक्षा आहे. लिहिण्यास आनंद वाटतो कीं, त्या वर्षामध्यें सातारा मंडळी व जो त्यांच्यामध्यें मिशनेरी वर्ग आहे त्या आम्हांमध्यें परस्पर ख्रिस्ती सेवेंत व कार्यांत विशेष ऐक्याचें जाणीव दिवसानुदिवस होत आलें आहे. आम्हां एतद्देशीय लोकांना प्रेषितीय वर्गाच्या हरएक सहानुभूतीची व मसलतीची जरूरी वाटत आहे. व ही सहानुभूति व मसलत घेऊन हरएक सेवेमध्यें आम्ही पुढाकार करावा अशा प्रकारची स्फूर्ति आम्हांमध्यें होत आहे म्हणून आम्ही परमेश्वराचें मनापासून अभिनंदन करितों. आम्हांला फार मोठी आशा आहे कीं, आमचीं सर्व कामें देवाच्या साह्यानें व पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शकतेनें मंडळीच्या प्रगतीसाठीं व ख्रिस्त राज्याच्या गौरवासाठीं सफळ होतील. या कामासाठीं देवानें प्रेषितीय वर्गास, पाळकास व मंडळींतील बंधुभगिनींस विशेष शक्ति व सामर्थ्य द्यावें अशी त्याची करुणा भाकून हा रिपोर्ट संपवितों.

मंडळीचा चिटणीस. M. Kamble

१९१५ साल. सातारा मंडळींतील प्रभुभोजन घेणाऱ्या लोकांची याद.

1915 Communicants

१ प्रसादराव विठ्ठल मकासरे
२ वेणाबाई कृष्णाजी भोंसले ✓
३ विठोबा गुजाजी गायकवाड ✓
४ सावित्राबाई विठोबा गायकवाड ✓
५ दाविदराव कासमभाई टाळवणी ✓
६ कृष्णाजी पिराजी भोंसले ✓
७ शेवंतीबाई टी. आढाव
८ सुजानराव कासमभाई टाळवणी ✓
९ सखारामजी हणगु कांबळे ✓ मृत्यु पावला
१० आलिसाबेत वि. मकासरे ✓
११ गोविंदराव परशराम भागवत
१२ निलकंठराव का. टाळवणी ✓
१३ नानूबाई पर्वतराव कांबळे
१४ रत्नाकरराव का. टाळवणी ✓ [illegible] गेले
१५ बाबाजी लक्ष्मण काकडे
१६ गोजराबाई विठोबा गायकवाड ✓
१७ विठाबाई सखाराम कांबळे ✓
१८ आनंदराव पर्वतराव कांबळे ✓
१९ आबाबाई लक्ष्मण काकडे
२० भागुबाई सखाराम जगताप
२१ बाबुराव पिराजी जाधव ✓
२२ हणमंतराव जो. गायकवाड
२३ यमनुबाई ह. गायकवाड
२४ साविश्राबाई बी. जाधव ✓
२५ मुक्ताबाई देवजी कांबळे ✓
२६ हिरा सुलेमान शेख ✓
२७ सायरस वि. मकासरे ✓
२८ आनंदी गणपत काकडे ✓
२९ रत्नाकरराव एच. गायकवाड ✓
३० जाईबाई पिराजी जाधव ✓
३१ मारुतीराव लक्ष्मण काकडे
३२ कुंडलीक देवजी कांबळे
३३ भाऊराव जनोबा पवार
३४ गंगू पिराजी सपाळ
३५ सुमतीबाई शाहूराव गायकवाड
३६ ग्रेस हणमंतराव गायकवाड
३७ गया नानाजी गायकवाड

३८ आकू पर्वतराव कांबळे ✓
३९ केचर पिराजी
४० वाघला पुंजाजी
४१ बेचर रणछोडजी
४२ सिताम्मा नंदी पोचारी
४३ हरिबा ग्यानोबा गायकवाड
४४ येसाबाई ह. गायकवाड
४५ बाबु बापूजी भालेकर ✓
४६ मालती बाई शि. आल्हाट ✓
४७ लिया सदोबा खंडागळे ✓ मेलो
४८ एस्तेर बेचरलाल
४९ भागुबा पांडोबा मगर ✓
५० कोंडीराम पांडुरंग छिंदर ✓
५१ रंभा ग्यानोबा कांबळे
५२ कमळावती राजीबा जाधव ✓
५३ शाहूराव गायकवाड
५४ शेवंतीबाई पवार
५५ एकनाथराव साळवे
५६ ताईबाई ए. हिंवाळे
५७ सावित्राबाई ए. साळवे
५८ सुंदराबाई पंडीत
५९ यशवंतराव धोंडीबा सूर्यवंशी ✓
६० लिलावतीबाई य. सूर्यवंशी
६१ धनाजी चांदेकर
६२ शेवंतीबाई ध. चांदेकर
६३ आनंदराव पां. मगर
६४ सिताबाई उंदरे.
६५ दानीएल दिवे
६६ सुवार्ताबाई दिवे
६७ लिलावती एच. गायकवाड ✓
६८ तारा कृष्णाजी हिंवाळे ✓
६९ मनोरमा एस. पवार ✓
७० गीता भास्कर फेणसाळकर
७१ मालती गंगाधर गायकवाड
७२ मालन गोविंदराव भागवत ✓
७३ बायजाबाई जी. भोसले
७४ गुलाब हुसेन शेख ✓
७५ सात्विक कृष्णाजी हिंवाळे
७६ प्रभाकर गोविंद भागवत

१९७५ सातारा मंडळीतील प्रभु भोजन घेणाऱ्या लोकांची याद.

७७ डेव्हिड धनाजी चांदेकर — मरण पावला.
७८ विल्सन डानिएल दिवे ✓
७९ वामन केरोबा गायकवाड
८० चंद्रिकाबाई केरोबा गायकवाड
८१ जोजेफ पिले
८२ नानाजी टी. कांबळे
८३ दादाजी एम. सगळागीळे
८४ गणू भिवा डिगे
८५ अमृतराव भागाजी त्रिभुवन.
८६ जीवनराव टी. चांदेकर
८७ जोजेफराव बी. साळवे
८८ पुरुषोत्तम प्रसादराव मकासरे
८९ शांतीबाई जोजेफराव साळवे
९० ग्रेस यशवंतराव सूर्यवंशी
९१ प्रीता केरोबा गायकवाड
९२ एम. डी. गायकवाड
९३ शाहूराव टी. चांदेकर
९४ ३

1915 List of Baptized Children.

१९१५. बाप्तिस्मा पावलेल्या लेकरांच्या नांवांची याद.

	जन्मतारीख.		बाप्तिस्म्याची तारीख
१		वामन विठोबा गायकवाड	
२		जयवंत विठोबा गायकवाड	
३		वसंत अर्नेस्ट आढाव	
४		मनोरमा प्रेम सूर्यवंशी	
५		गफूर हुसेन शेख.	
६		प्रेमा हणमंतराव गायकवाड	
७		शारदा एलन आढाव	
८		प्रभाकर हणमंतराव गायकवाड	
९		सुंदर कृष्णाजी हिंवाळे	
१०		सुमंत कृष्णाजी हिंवाळे	
११		कमला फ्लोरा आढाव	
१२		शरत सेरील आढाव	
१३		सुमती आलीस एच्. गायकवाड	
१४		फुलवंती वाघला	
१५		शांतवन वाघला	
१६		भास्कर बाबुराव जाधव	
१७		शामसन चंद्रसेन सूर्यवंशी	
१८		पुरुषोत्तम मसादराव मकासरे	
१९		सुंदर " "	
२०		वसंत " "	
२१		भास्कर " "	
२२		मनोरमा " "	
२३		रत्नमाला " "	
२४		शारदा " "	
२५		उषा " "	
२६		चार्लस दानिएल दिवे	
२७		भास्कर " "	
२८		जॉनसन " "	
२९		कुसुमावंती " "	
३०		जयवंती गंगाराम गायकवाड	
३१		गोपाळ " "	
३२		शामुवेल धनाजी चांदेकर	
३३		दानिएल " "	
३४		इहेज्केल " "	
३५		मंजुळा " "	
३६		शेवंती सुलोचना बेचरलाळ	
३७		सोनू बेचरलाल.	
३८		मालन बाबुराव जाधव	

१९१५. बाप्तिस्मा पावलेल्या लेंकरांच्या नांवांची याद.

		जन्मतारीख		बाप्तिस्म्याची ता.
३९	३९		सोनू नानाजी साळवे	
	४०		दौलत नानाजी साळवे	
	४१		आनंदी नानाजी साळवे	
	४२		डायना जयवंतराव भाक्रे	४/१/१४
	४३		जेम्स हिरालाल सूर्यवंशी	१५/२/१४
	४४		वसंत बाबुराव जाधव	१५/२/१४
	४५		प्रकाश शिवाजी भोंसले	८/३/१४
	४६		भास्कर नारायण मनोलकर	८/३/१४
	४७		गंगू गोघाजी जाधव	८/३/१४
	४८		विमला प्रसादराव मकासरे	८/३/१४
	४९		कृपा दाजीबा जाधव	२८/९/१४
	५०		सुमीत्र आनंदराव मगर	२७/९/१४.
	५१		पांडुरंग आनंदराव मगर	
	५२		जाई " "	२७/९/१४
	५३		रत्नमाला धनाजी चांदेकर	२९/३/१९१४
	५४		प्रिस्किला दानिएल दिवे	१८/१०/१९१४
	५५		वामन शामुवेल कांबळे	
	५६		शकुंतला रूथ सूर्यवंशी	
	५७		शांती "	
	५८		सोनी "	
	५९		उत्तम आनंदराव हिंवाळे	२६/९/१९१५
	६०		चंद्रकोर आनंदराव हिंवाळे	२६/९/१९१५

Minutes

५/१/१९१५
5/1/1915

या रोजीं मंडळीची बैठक बसली. आरंभीं रे. हरिबा गायकवाड यांनीं प्रार्थना केली. मग चिटणीस नानाजी कांबळे यानें वार्षिक रिपोर्ट वाचून दाखविला. हा रिपोर्ट पास करून घ्यावा (चुकी दुरुस्ती) अशी सूचना मि. हणमंतराव गायकवाड यांनीं केली या सूचनेस रे. हरिबा गायकवाड यांनीं अनुमोदन दिल्यावरून सर्वानुमतें रिपोर्ट पास करून घ्यावा असें ठरलें. मग खजीनदार मि. डानिएल सूर्यवंशी यानें वार्षिक रिपोर्ट (खजिन्याचा) वाचून दाखविला. तोही सर्वानुमतें पास झाला. मग मंडळीच्या खजिन्याचा रिपोर्ट तपासण्यासाठीं मिसेस हिंवाळे ह्या ऑडिटर असाव्यात अशी सूचना मिस न्युजंट यांनीं दिली त्या सूचनेस धनाजी चांदेकर यांनीं अनुमोदन दिल्यावरून सर्वानुमतें मिसेस हिंवाळे ऑडिटर ठरल्या. मग पुढील वर्षासाठीं चिटणीस व खजिनेदार हल्लीं जे आहेत तेच असावेत असें बहुमतें ठरलें. म्हणजे चिटणीस नानाजी कांबळे व खजीनदार यशवंतराव सूर्यवंशी.

मग शाब्बाथ शाळेच्या प्रेसिडेंट संबंधानें प्रश्न आला होता तो असा- कीं, शा. शा. प्रेसिडेंटाची नेमणूक मंडळीकडून होते किंवा नाहीं! तर हा प्रश्न पुढील बैठकीपर्यंत तहकूब ठेवावा असें ठरलें.

मंडळीसाठीं आणखी एक कारभारी असावा असें बहुमतें ठरलें. कारभारी मि. धनाजी चांदेकर यास नेमिलें.

३१/१/१९१५

प्रभु भोजनाचा विधी करण्यांत आला.

१६/२/१९१५

या दिवशीं मंडळीची बैठक बसली. आरंभीं मि. डानिएल सूर्यवंशी यांनीं प्रार्थना केली. मग चिटणीसानें श्रावण धोंडीबा कांबळे यानें पाठविलेलें विनंतीपत्र वाचून दाखविलें. त्यावर विचार होऊन असें ठरलें कीं, 'ज्या अर्थी यांचा सातारा मंडळीशीं ३/३॥ वर्षें संबंध नाहीं, व त्यास या संबंधानें पत्र पूर्वी पाठविलें असतांही त्याचें उत्तर नाहीं म्हणून त्यांचें नांव मंडळीच्या बुकांतून कमी आहे' अशा अर्थाचें चिटणीसानें पत्र लिहावें. शेवटीं रे. मकासरे यांनीं प्रार्थना केली. व बैठक संपली.

४/३/१९१५

या रोजीं माधव फकीरा शिंदे याचा विवाह गयाबाई नानाजी गायकवाड इजबरोबर झाला. हा विधी रे. प्रसादराव मकासरे यांनीं केला.

२/३/१९१५

या रोजीं मंडळीची बैठक बसली. त्यावेळीं उडतऱ्यास जें ऐक्य भरणार आहे त्यासाठीं सातारा मंडळींतून मि. हणमंतराव गायकवाड व मि. डानिएल सूर्यवंशी यांस प्रतिनिधी नेमण्यांत आले. व गाड्या २ करावात. त्या साठीं मंडळींतून ४ रुपये द्यावेत असें ठरलें.

30/3/१९१५ र. या दिवशीं मंडळीची बैठक बसली. अध्यक्ष रे॰ हरिबा गायकवाड असावेत, अशी सूचना मि॰ ह॰ धनाजी चांदेकर व अनुमोदन मि॰ हणमंतराव गायकवाड यांनीं दिल्यावरून बहुमतें ठरलें. मग चिटणीसानें अमृतराव त्रिभुवन यांचें परवानगीपत्र म्हणजे नगराहून आलेलें वाचून दाखविलें. त्यास मंडळींत घ्यावें असें ठरलें. त्यास मंडळींत घेण्याविषयीं सूचना मि॰ चांदेकर व अनुमोदन नानाजी कांबळे यांनीं दिलें. मग रे॰ मसाहराव मकासरे यांनीं अर्ज पाठविला तो वाचून दाखविला. 'तो रजेसंबंधी होता' 'यांना रजा एक महिन्याची म्हणजे ता॰ १ एप्रील पासून 30 एप्रील पर्यंत द्यावी व यांच्या कामाची व्यवस्था स्थांडींग कमेटीनें करावी.' अशी सूचना मि॰ धनाजी चांदेकर यांनीं व अनुमोदन मि॰ हणमंतराव गायकवाड यांनीं दिल्यावरून बहुमतें तें ठरलें. पाळकांना रजा मंडळीकडून मिळाली असें पत्र चिटणीसानें पाळकांस पाठवावें.

४/४/१९१५ या रोजीं प्रभूभोजनाचा विधि करण्यांत आला.

१३/४/१९१५ या रोजीं लियाबाई खंडागळे यांस देवाज्ञा झाली.

२०/६/१९१५ या रोजीं प्रभूभोजनाचा विधि करण्यांत आला.

3/८/१९१५ या रोजीं मंडळीची बैठक बसली. आरंभी रे॰ हरिबा गायकवाड यांनी प्रार्थना केली व कामास सुरुवात झाली. मग मि॰ जिवनराव चांदेकर यांचें आलेलें परवानगी पत्र वाचून दाखविलें. मग सर्वानुमतें ठरलें कीं, त्यास मंडळींत घ्यावें. नंतर मि॰ रत्नाकरराव दाळवी यांचें पत्र वाचलें. सर्वानुमतें ठरलें कीं, त्यास त्या मंडळींत मिळण्याविषयीं परवानगी द्यावी.

१४-८-१९१५ या रोजीं मंडळीची बैठक बसली. आरंभी मि॰ त्रिभुवन यांनीं प्रार्थना केली नंतर कामास आरंभ झाला. मग सातारा स्थानिक ऐक्याच्या चिटणीसाकडून आलेलें पत्र वाचलें. उउतारा मुक्कामीं भरणाऱ्या ऐक्यासाठीं प्रतिनिधी कोण असावेत असा प्रश्न पुढें आला. मि॰ त्रिभुवन व मि॰ कुंडलीकराव हे प्रतिनिधी असावेत असें बहुमतें ठरलें. नेहमींप्रमाणें यांचा गाडीचा खर्च मंडळीनें द्यावा असें ठरलें.

२६/८/१९१५ या रोजीं बैठक बसली. त्यावेळीं १ पुरुषोत्तम मकासरे २ ग्रेस सूर्यवंशी ३ प्रीता गायकवाड यांची स्थांडिंग कमेटीनें परीक्षा घेतली असून त्यास मंडळींत घ्यावें असें स्थांडींग कमेटीनें ठरविलें आहे, तर त्याविषयीं मंडळीचें काय म्हणणें आहे? मग रे॰ हरिबा गायकवाड यांनीं सूचना दिली व यांच्या सूचनेस मि॰ हणमंतराव गायकवाड यांचें अनुमोदन ठरल्यावरून यांस मंडळींत घ्यावें असें सर्वानुमतें ठरलें. त्यासोबत मि॰ जोजेफराव साळवे व यांचे कुटुंब सौ॰ शांतीबाई यांसही मंडळींत घ्यावें असें ठरलें.

२६/९/१९४५ उत्तम आनंदराव हिंवाळे व चंद्रकोर आनंदराव हिंवाळे यांचा बाप्तिस्मा रे. डा. ह्युमसाहेब यांनीं केला.

२६/८/१९४५ डेविड धनाजी चांदेकर याचा मृत्यु झाला.

५/१०/१९४५ या दिवशीं मंडळीची बैठक बसली. ह्यावेळीं मि. मारुतराव यांचें आलेलें परवानगी पत्र चिटणीसानें वाचून दाखविलें. मग मि. धनाजी चांदेकर यांनीं अशी सूचना केली कीं, मि मारुतराव गायकवाड यास मंडळींत घ्यावें या सुचनेस रे. हरिबा गायकवाड यांनीं अनुमोदन दिल्यावरून सर्वानुमतें ठरलें कीं, ह्यास मंडळींत घ्यावें.

त्याच वेळीं मि. डानिएलराव सूर्यवंशी यांनीं नगराहून पाठविलेलें पत्र वाचून दाखविलें. ह्यास एक आभार दर्शक पत्र चिटणीसानें पाठवावें असें ठरलें. शेवटीं रे. हरिबा गायकवाड यांनीं प्रार्थना केली. व बैठक आटोपली

१६/१२/१९४५ मि. कुंडलीकराव व बायजाबाई यांचा लग्नविधी रे. प्रसादराव मकासरे यांच्या हस्तें झाला.

२१/१२/१९४५ या दिवशीं मंडळीची बैठक बसली. आरंभी रे. हरिबा गायकवाड यांनीं प्रार्थना केली नंतर कामास आरंभ झाला. मग शाहूराव टी. चांदेकर यांचें वडाळे मंडळीहून आलेलें परवानगीपत्र चिटणीसानें वाचून दाखवलें. त्यांना मंडळींत घ्यावें अशी सूचना मि. हणमंतराव गायकवाड यांनीं केली. या सुचनेस अनुमोदन रे. हरिबा गायकवाड यांनीं दिल्यावरून सर्वानुमतें त्यांस मंडळींत घ्यावें असें ठरलें.

त्याच वेळीं १९४६ साला साठीं कामदार निवडण्यांत आले:— आरंभी चिटणीसाची निवडणूक व्हावी. अशी अध्यक्षाकडून (पाळकाकडून) सूचना होतांच मि. ए. बी. त्रिभुवन यांनीं सूचना केली कीं, पुढील वर्षासाठीं मि. मारुतराव गायकवाड हे चिटणीस असावेत या सुचनेस मि. कुंडलीकराव कांबळे यांनीं अनुमोदन दिल्यावरून सर्वानुमतें मि. मारुतराव गायकवाड हे चिटणीस असावेत असें ठरलें.

मग खजिनदाराची निवड झाली. मि. योसेफराव साळवे हे पुढील वर्षासाठीं खजीनदार असावेत अशी सूचना मि. डानिएल सूर्यवंशी यांनीं दिली. या सुचनेस मि. नानाजी कांबळे यांनीं अनुमोदन दिल्यावरून सर्वानुमतें मि. योसेफराव साळवे हे खजीनदार असावेत असें ठरलें.

मग स्टांडिंग कमेटीमध्यें दोन मेंबर्स जास्त असावेत याविषयीं बरीच वाटाघाट झाली. सर्वानुमतें दोन मेंबर्स स्टांडींग कमेटीमध्यें आणखी असावेत असें ठरलें. मग त्यांची निवड झाली. ज्यांची यांनें सर्वानुमतें स्टांडींग कमेटीचे सभासद असावींत म्हणून ठरलीं तीं हीं: १ मि. ए. बी. त्रिभुवन. २ मि. एन. टी. कांबळे. म्हणजे एकंदर स्टांडींग कमेटीचे सभासद येणें प्रमाणें:— १ रे. पी. डी. मकासरे. २ रे. हरिबा गायकवाड. ३ मि. हणमंतराव गायकवाड ४ मि. धनाजी चांदेकर ५ मि. एम. डी. गायकवाड ६ मि. योसेफराव साळवे. ७ मि. ए. बी. त्रिभुवन. ८ मि. एन. टी. कांबळे

MKamble

२१/१२/१८९५

त्याच वेळीं श्रावण धोंडीबा यांचें पत्र चिटणीसानें वाचलें. यावरून असें ठरलें कीं चिटणीसानें त्यास एक पत्र पाठवावें कीं, तुमचा संबंध एक वर्षभर या मंडळीशीं नाहीं. सबब तुमचें नांव कमी केलें आहे. आम्हांस परवानगी देतां येत नाहीं.

२८/१२/१८९५

रा. रा. सखारामजी हणमु कांबळे यांचा मृत्यु शिवपर मुक्कामीं झाला.

NMamble

१९१६ साल. सातारा मंडळींतील प्रभुभोजन घेणाऱ्यांची याद.

1916

Communicants' list

१. प्रसादराव वि. मकासरे. + wife
२. वेणूबाई कृष्णाजी भोंसले.
३. विठोबा गुजाजी गायकवाड.
४. सावित्राबाई विठोबा गायकवाड.
५. दाविदराव कासमभाई दालवणी.
६. कृष्णाजी पिराजी भोंसले.
७. शेवंतीबाई टी. आढाव.
८. सुद्धानराव कासमभाई दालवणी. ✓
९. आलिसाबेत वि. मकासरे.
१०. गोविंदराव परशराम भागवत.
११. नानूबाई पर्वतिराव कांबळे.
१२. बाबाजी लक्ष्मण काकडे.
१३. गोजराबाई विठोबा गायकवाड. ✓
१४. विठाबाई सखाराम कांबळे.
१५. आनंदराव पर्वतिराव कांबळे
१६. आबाबाई लक्ष्मण कांबळे. ✓
१७. भागुबाई सखाराम जगताप. ✓
१८. बाबूराव पिराजी जाधव.
१९. हणमंतराव जो. गायकवाड.
२०. यमुनाबाई ह. गायकवाड.
२१. सावित्राबाई बी. जाधव.
२२. मुक्ताबाई देवजी कांबळे.
२३. हिरा सुलेमान शेख. ✓
२४. सायरस वि. मकासरे.
२५. आनंदी गणपत काकडे. ✓
२६. रत्नाकर एच् गायकवाड.
२७. जाईबाई पिराजी जाधव.
२८. मारुतिराव लक्ष्मण काकडे.
२९. कुंडलिकराव देवजी कांबळे.
३०. भाऊराव जनोबा पवार. ✓
३१. गंगू पिराजी समाके. ✓
३२. सुमतीबाई शाहूराव गायकवाड.
३३. ग्रेस्बाई हणमंतराव गायकवाड. died 1916
३४. गया नानाजी गायकवाड.
३५. आकु पर्वतिराव काम्बळे.
३६. केचेर पिराजी. ✓
३७. बाधला पुंनाजी ✓

३८. बेचर रणछोडजी.
३९. सिताम्मा नंदी पोचाटी.
४०. हरिबा ग्यानोबा गायकवाड.
४१. यसाबाई ह. गायकवाड.
४२. बाबू बापूजी भालेकर. ✓
४३. मालतीबाई शि. आल्हाट.
४४. एस्तेर बेचर छाळ.
४५. भागुशा पांडोबा मगर. ✓ Letter to Sirur voted in 1916.
४६. कोंडिराम पांडुरंग छिडदार. ✓
४७. रंभा ग्यानोबा कांबळे. ✓ घोडनदी मंडळीत [illegible] परवानगी पत्र दिले १८/६/७०
४८. शाहुराव के. गायकवाड.
४९. शेवंतीबाई पवार.
५०. एकनाथराव साळवे.
५१. ताईबाई ए. हिंवाळे. ✓ घोडनदी मंडळीत मिळण्यासाठी पत्र दिले १८/६/७६
५२. सावित्राबाई ए. साळवे.
५३. सुंदराबाई पंडित.
५४. लिलावतीबाई य. सूर्यवंशी.
५५. धनाजी चांदेकर.
५६. शेवंतीबाई ध. चांदेकर.
५७. आनंदराव पांडोबा मगर ✓
५८. सिताबाई उंदरे.
५९. दानिएल दिवे. परवानगी पत्रद्वारे दुसऱ्या मंडळीत मिळे
६०. सुवार्ताबाई दिवे. " " "
६१. लिलावती एच. गायकवाड. " "
६२. तारा कृष्णाजी हिंवाळे.
६३. मनोरमा एस्. पवार.
६४. गीता भास्कर फणसाळकर.
६५. मालती गंगाधर गायकवाड.
६६. मालन गोविंदराव भागवत.
६७. बायजाबाई जी. भोसले Kamble
६८. गुलाब हुसेन शेख
६९. सालिक कृष्णाजी हिंवाळे.
७०. प्रभाकर गोविंद भागवत.
७१. विल्सन दानिएल दिवे. परवानगी पत्रद्वारे दुसरीकडे गेला.
७२. वामन केरोबा गायकवाड.
७३. चंद्रिकाबाई केरोबा गायकवाड. ✓
७४. जोजेफ पिठे.
७५. नानाजी टी. कांबळे.

७६. दादाजी एम्. सगळगिळे.
७७. गणू भिवा डिंग.
७८. अमृतराव भागाजी त्रिभुवन.
७९. जिवनराव टी. चांदेकर.
८०. पुरुषोत्तम प्रसादराव मकासरे.
८१. शांताबाई जोजेफराव साळवे.
८२. ग्रेस यशवंतराव सूर्यवंशी.
८३. प्रीता केसोबा गायकवाड.
८४. एम्. डी. गायकवाड.
८५. शाहुराव टी. चांदेकर.
८६. अनसुयाबाई गायकवाड.
८७. रंभाबाई पुरंदरे
८८. रूथबाई
८९. विश्रामजी मीरपगार.
९० चंद्रसेनराव गायकवाड.
९१ गफूर शेख.
९२. गोपाळ गायकवाड.
९३. सुंदर मकासरे.
९४. वसंत मकासरे.
९५ पिराजी.
९६ शंकरराव कुळकर्णी.
९७. जयवंती गायकवाड.
९८ हेलन देवकालीकर.
९९ शिवरामजी बनसोडे.
१०० बनुबाई बनसोडे.
१०१ गोदूताई कुळकर्णी.

१८१५-

बाप्तिस्मा पावलेल्या लेंकरांच्या नांवांची याद.

वामन विठोबा गायकवाड-
जयवंत विठोबा गायकवाड-
वसंत अर्नेस्ट आढाव-
मनोरमा ग्रेस सूर्यवंशी. ? मंडळीत मिळाली
गफूर हुसेन शेरर. × " "
प्रेमा हणमंतराव गायकवाड. " "
शारदा एलन आढाव.
प्रभाकर हणमंतराव गायकवाड-
सुंदर कृष्णाजी हिंवाळे.
सुमंत कृष्णाजी हिंवाळे.
कमळा फ्लोरा आढाव-
शरद सेरील आढाव.
सुमती आलिस गायकवाड.
फुलवंती वाघळा.
शांतवन वाघळा.
भास्कर बाबूराव जाधव-
शामसन् चंद्रसेन सूर्यवंशी.
सुंदर प्रसादराव मेकासर. × मंड
वसंत " " × मंड
भास्कर " "
मनोरमा- " "
रत्नमाला " "
शारदा " "
उषा " "
चार्लिस दानिएल दिवे- gone
भास्कर " " ×
जॉनसन् " " ×
कुसुमावती " " ×
जयवंती गंगाराम गायकवाड- × मंड
गोपाळ गंगाराम गायकवाड. मंड
शमुवेल धनाजी चांदेकर-
दानिएल " "
इहेज्केल " "
शेवंती सुलोचना बेचरलाल.
सोनु बेचरलाल-
मालन बाबूराव जाधव-
सोना नानाजी साबळे.

दौलत नानाजी साळवे.
आनंदी " "
डायना जयवंतराव भाकरे. x gone
जेम्स हिरालाल सूर्यवंशी.
वसंत बाबूराव जाधव.
प्रकाश शिवाजी भोसले.
भास्कर नारायण मनोळकर-
गंगू गोधाजी जाधव.
विमला प्रसादराव मकासरे.
कृपा दाजीबा जाधव-
सुमित्र आनंदराव मगर.
पांडुरंग आनंदराव मगर.
जाई " "
रत्नमाला धनाजी चांदेकर.
प्रिस्किल्ला दानिएल दिवे.) gone
वामन शमुवेल कांबळे.
शकुंतला रूथ सूर्यवंशी.
शांती सूर्यवंशी.
सोनी "
उत्तम आनंदराव हिंवाळे. gone
चंद्रकोर " " "
सोना चव्हाण. Died
वसंत " gone
रतन कांबळे.
चंद्रिका खरात.
सुमंत खरात.
वसंत केचरलाल. gone

२५-१-१९१५.

या रोजीं मंडळीची बैठक बसली. प्रथम. मि. हणमंतरावांनीं प्रार्थना केली. कामास आरंभ झाला.

दोन परवानगी पत्रें आलीं होतीं. तीं वाचण्यांत आलीं. त्यावरून मि. नानाजी कांबळे यांनीं सूचना आणली कीं, अनुसुयाबाई गायकवाड रंभाबाई व रूथबाई या तीन बहिणींनां आपल्या मंडळींत घ्यावें. मि. दानियलनें अनुमोदन दिलें. व त्यांनां मंडळींत घ्यावें असें सर्वानुमतें ठरलें.

२८-२-१९१५.

या रोजीं मंडळीची बैठक बसली. मि. हणमंतरावांनीं प्रार्थना करून बैठकीस आरंभ झाला. आमच्या लोकांमध्यें प्रार्थनेचीं चक्रें असावींत असा विचार पाळकानें पुढें आणिला.

प्रार्थनेचीं चक्रें असावींत अशी सूचना मि. हणमंतरावांनीं आणिली. त्याला रे. हरिबा गायकवाड यांनीं अनुमोदन दिलें. व सर्वानुमतें ठरलें.

हीं चक्रें कोठें कोठें भरावींत असा प्रश्न पुढें आला. त्यावरून पाळकानें पुढील ठिकाणीं भरावींत असें सुचविलें. १ वाडी. २ माडी ३ मि. धनाजीचें घर. ४. मि. दाळवणीचें घर. ५. पाळकाचें घर. ६ ढोरवाडी. ७. मि. आढावांचें घर. ८ मि. हिवाळ्यांचें आवार. सर्वानुमतें ठरलें.

शुभवर्तमान प्रसाराच्या मोहिमेचें कान्फरन्स नगरला भरणार आहे. (ता. १५-१६). सबब आपले प्रतिनिधी तिकडे पाठवावेत अशी पाळकानें मसलत दिली.

